इतिहास

सांक्षिप

The Department of Public Instruction, Bombay.

मराठी ग्रंथ संग्रहालय

# A SHORT HISTORY OF MAHÁRÁSHTRA,

BY

RÁWAJI SADÁSHIV GÓDBÓLÉ.

6TH EDITION, REVISED.

40,000 COPIES.

*Registered for Copyright under the Government of India's Act XXV. of 1867.*

Bombay:

GOVERNMENT CENTRAL BOOK DEPÔT.

1888.

[ All Rights Reserved.]

*Price One Anna & Nine Pies.*

# भाग पहिला.

## महाराष्ट्र-देशाचा संक्षिप्त प्राचीन इतिहास.

दक्षिणहिंदुस्थानाच्या ज्या भागांत मुख्यत्वेंकरून मराठे लोक राहतात व जेथें मुख्यत्वेंकरून मराठी भाषा चालते, त्या भागास महाराष्ट्र-देश ह्मणतात. हा देश दक्षिणहिंदुस्तानाचा वायव्यदिशेकडचा भाग आहे. त्याच्या मर्यादा एणेंप्रमाणें:—

उत्तरेस दमणगंगा ही नदी व सातपुडा नांवाची डोंगरांची ओळ हीं आहेत; पूर्वेस वाईनगंगा आणि वर्धा ह्या नद्या आहेत; आग्नेयी दिशेस माहूर-गांवापासून गोव्यापर्यंत ह्याची मर्यादा वांकडी आहे; आणि पश्चिमेस अरबी-समुद्र आहे.

२. रामायण, महाभारत इत्यादि ग्रंथांत दंडकारण्य हें नांव हिंदुस्तानाच्या ज्या भागास दिलेलें आढळतें, त्यांत ज्याला आतां महाराष्ट्र-देश अशी संज्ञा आहे त्याचा बहुतेक समावेश होतो. ह्यावरून पहातां फार प्राचीनकाळीं हा देश केवळ अरण्यमय असून ह्यांत मनुष्यांची फारशी वस्ती नव्हती असें दिसून येतें. एथें फक्त कांहीं रानटी लोकांच्या जाती रहात असत. त्यांपैकीं एका जातीचें नांव **मातंग** असें होतें. ह्या **मातंग** शब्दाचा अपभ्रंश होऊन हल्लीं **मांग** ही संज्ञा प्रचारांत आली आहे. पुढें उत्तरहिंदुस्तानांतून त्रैवर्णिक (ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य अशा तीन

BOMBAY:
PRINTED AT THE EDUCATION SOCIETY'S PRESS, BYCULLA.

मुंबई-इलाख्यांतील सरकारी विद्या-खातें.

# महाराष्ट्र-देशाचा संक्षिप्त इतिहास.

हा ग्रंथ,

रावजी सदाशिव गोडबोले

ह्यांनीं तयार केला.

सहावी आवृत्ति— ४०,००० प्रती.

ह्या ग्रंथाची मालकी इसवी सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदिली असे.

मुंबई:
गवर्नमेंट सेंट्रल बुक-डिपो.

इसवी सन १८८८.

ह्या ग्रंथासंबंधी सर्व अधिकार सरकारानें आपल्याकडे ठेविले आहेत.

किंमत एक आणा नऊ पई.

मुंबईमध्यें
एज्युकेशन सोसायटीच्या छापखान्यांत छापिलें.

# प्रस्तावना.

महाराष्ट्र-देशाचें वर्णन आणि इतिहास ह्या नांवाचा जो प्रश्नोत्तरावलिरूप ग्रंथ आजपर्यंत विद्याखात्यांत चालू आहे, त्याचें तें रूप बदलून दुसरा त्याच विषयावर एक लहानसा ग्रंथ तयार करण्याविषयीं मेहेरबान देरेक्तर आफ् पब्लिक् इनस्ट्रक्शन् ह्यांचा हुकूम झाला. त्यावरून हा ग्रंथ तयार केला आहे. वरील ग्रंथांतल्यापेक्षां ह्या ग्रंथाची रचना प्रायः निराळी आहे, व बहुतेक ठिकाणीं ज्यास्त मजकूर घातला आहे.

जुन्या ग्रंथाचे एकंदर तीन भाग होते. त्यांपैकीं पहिला भाग नसावा, असें विद्याखात्यांतील कांहीं अधिकाऱ्यांचें मत पडल्यावरून तो भाग गाळला आहे.

ह्या नवीन ग्रंथाचे दोन भाग केले आहेत. त्यांपैकीं पहिल्या भागांत महाराष्ट्र-देशाचा प्राचीन ( ह्मणजे इसवी सनाच्या १७व्या शतकाच्या पूर्वींचा ) इतिहास, आणि दुसऱ्या भागांत त्याचा अर्वाचीन (ह्मणजे इसवी सनाच्या १७ व्या शतकापासून पुढील ) इतिहास, असे संक्षिप्त रूपानें लिहिले आहेत. दुसऱ्या भागाचीं दोन प्रकरणें केलीं आहेत. त्यांपैकीं पहिल्या प्रकरणांत शिवाजी राजा आणि त्याच्या वंशांतले दुसरे राजे ह्यांचें वर्णन केलें आहे; आणि दुसऱ्या प्रकरणांत पेशव्यांचें वर्णन केलें आहे. ह्या दोन्ही भागांस मुख्यत्वेंकरून ग्रांत दफ् साहेबांनीं केलेल्या मराठ्यांच्या इतिहासाचा आधार घेतला आहे.

मेहेरबान मेजर क्यांदी साहेब ह्यांनीं हा ग्रंथ तपासून त्यांतील पुष्कळ चुका दुरुस्त केल्या, त्याबद्दल ग्रंथकर्ता त्यांचा परम आभारी आहे.

रा० स० गो०.

तारीख २७ माहे सप्तंबर इसवी सन १८७५.
मुक्काम पुणें.

---

इ० स० १८७८ त ह्या पुस्तकाची दुसरी आवृत्ति निघाली, त्या वेळीं पहिल्या आवृत्तींत दाखल नाहीं असा पुष्कळ उपयुक्त मजकूर तींत आवश्यक वाटला तेथें नवीन घातला; आणि सनांचीं कित्येक वर्षें चुकलीं होतीं तीं दुरुस्त केलीं; व तीं सर्व सहज लक्ष्यांत यावीं ह्मणून बाहेर कलमांचे बाजूस लिहिलीं. ह्याशिवाय अनवधानतेमुळें चुकून राहिलेले दोष लक्ष्यांत आले तितके नाहींतसे केले.

त्याप्रमाणेंच आतां तिसऱ्या आवृत्तींतही कित्येकस्थळीं अर्थाची संदिग्धता दूर करण्यासाठीं मधून मधून थोडथोडी पालट केली आहे; व अखेरीस सातारचे राजे व पेशवे ह्यांच्या कारकीर्दीचे आरंभ व शेवट, ह्यांच्या यादी दिल्या आहेत. त्या मुलांस ध्यानांत धरण्यास विशेष उपयोगी पडतील.

तारीख १८ माहे दिसेंबर इसवी सन १८८०.
मुक्काम पुणें.

रा० स० गो०.

ह्या चवथ्या आवृत्तींत वर्नाक्युलर बुक-कमिटीनें केलेल्या सूचनांप्रमाणें फेरफार करून शेवटीं ह्या पुस्तकांत लिहिलेल्या प्रसिद्ध गोष्टींचें कालानुक्रमाप्रमाणें टिपण दिलें आहे: ह्याखेरीज स्थलविशेषीं अवश्य वाटली अशी ज्यास्त माहिती देऊन मागील आवृत्तींत छापतांना वगैरे ज्या चुका पडल्या होत्या त्या हींत दुरुस्त केल्या आहेत.

ह्या पुस्तकाचा भाग १ ला कलमें २ । ३ ह्यांतील मजकूर डेक्कन कालेजांतील प्राच्य भाषांचे गुरु डा० रामकृष्ण गोपाळ भांडारकर ह्यांनीं सुचविलेला आहे; त्याबद्दल ग्रंथकर्ता त्यांचा फार आभारी आहे.

तारीख २० दिसेंबर इ० स० १८८२.
मुक्काम पुणें.

रा० स० गो०

---

मागील ४ थे आवृत्तींत राहिलेल्या बारीकसारीक चुका दुरुस्त करून ही आवृत्ति छापिली आहे.

तारीख १२ माहे अक्टोबर, इ० स० १८८५.
मुक्काम पुणें.

रा० स० गो०

---

मागील ५ वे आवृत्तींत राहिलेल्या बारीकसारीक चुका दुरुस्त करून ही आवृत्ति छापिली आहे.

तारीख १ माहे आगष्ट, इ० स० १८८८.
मुक्काम पुणें.

रा० स० गो०.

मुंबईमध्यें:
एज्युकेशन सोसायटीच्या छापखान्यांत छापिलें.

उर्दू ११२
सं. ११२

# प्रस्तावना.

महाराष्ट्र-देशाचें वर्णन आणि इतिहास ह्या नांवाचा जो प्रश्नोत्तरावलिरूप ग्रंथ आजपर्यंत विद्याखात्यांत चालू आहे, त्याचें तें रूप बदलून दुसरा त्याच विषयावर एक लहानसा ग्रंथ तयार करण्याविषयीं मेहेरबान देरेक्तर आफ् पब्लिक् इनस्त्रक्शन् ह्यांचा हुकूम झाला. त्यावरून हा ग्रंथ तयार केला आहे. वरील ग्रंथांतल्यापेक्षां ह्या ग्रंथाची रचना प्रायः निराळी आहे, व बहुतेक ठिकाणीं ज्यास्त मजकूर घातला आहे.

जुन्या ग्रंथाचे एकंदर तीन भाग होते. त्यांपैकीं पहिला भाग नसावा, असें विद्याखात्यांतील कांहीं अधिकाऱ्यांचें मत पडल्यावरून तो भाग गाळला आहे.

ह्या नवीन ग्रंथाचे दोन भाग केले आहेत. त्यांपैकीं पहिल्या भागांत महाराष्ट्र-देशाचा प्राचीन ( ह्मणजे इसवी सनाच्या १७व्या शतकाच्या पूर्वींचा ) इतिहास, आणि दुसऱ्या भागांत त्याचा अर्वाचीन (ह्मणजे इसवी सनाच्या १७ व्या शतकापासून पुढील ) इतिहास, असे संक्षिप्त रूपानें लिहिले आहेत. दुसऱ्या भागाचीं दोन प्रकरणें केलीं आहेत. त्यांपैकीं पहिल्या प्रकरणांत शिवाजी राजा आणि त्याच्या वंशांतले दुसरे राजे ह्यांचें वर्णन केलें आहे; आणि दुसऱ्या प्रकरणांत पेशव्यांचें वर्णन केलें आहे. ह्या दोन्ही भागांस मुख्यत्वेंकरून ग्रांत दफ् साहेबांनीं केलेल्या मराठ्यांच्या इतिहासाचा आधार घेतला आहे.

वर्णांचे) आर्य लोक आले आणि त्यांनीं ह्या देशांत वसाहती केल्या; आणि राष्ट्रिक अथवा रट्ट, किंवा महाराष्ट्रिक अथवा महारट्ट, आणि भोज किंवा महाभोज ह्या दोन जातींच्या क्षत्रियांनीं एथें राज्यें स्थापिलीं.

३. ह्यानंतर ख्रिस्ती शकाच्यापूर्वी सुमारें पन्नास पाउणशें वर्षांपासून तों त्या शकाच्या दुसऱ्या शतकाच्या शेवटापर्यंत हा देश शातवाहन अथवा शालिवाहन ह्या कुळांतील राजांच्या स्वाधीन होता. मध्यंतरीं ४०।५० वर्षेंपर्यंत शक ह्या नांवाच्या कुळांतील कांहीं परदेशी राजांनीं शातवाहन-कुळाचा पराभव करून आपल्या राज्याची स्थापना केली; परंतु कांहीं काळानें त्या कुळांतील गौतमीपुत्र आणि त्याचा पुत्र पुलोमवि ह्या दोन राजांनीं शककुळांतील राजांचें पारिपत्य करून आपलें राज्य पुनः त्यांजपासून घेतलें. शातवाहन-कुळांतील राजांची पैठण (प्रतिष्ठान) ही राजधानी होती. पुढें ख्रिस्ती शकाच्या सुमारें पांचव्या शतकाच्या शेवटापासून तों सुमारें इ० स० ७६० पर्यंत चालुक्य-कुळांतील पुरुषांनीं महाराष्ट्र व कर्नाटक ह्या देशांचें राज्य केलें. ह्या कुळाचा मूळपुरुष जयसिंह ह्या नांवाचा राजा होता. ह्याच्च कुळांत सत्याश्रय पुलकेशि ह्मणून एक महाप्रतापी राजा होऊन गेला. त्यानें, हर्षवर्धन ह्या नांवाचा उत्तरहिंदुस्तानाचा महाराजाधिराज होता, त्याचा पराजय करून त्याची सत्ता आपल्या देशावर बसूं दिली नाहीं, आणि महाराजाधिराज हें पद आपण संपादिलें. सत्याश्रय पुलकेशि शके ५३२ ह्मणजे इ० स० ६१० ह्या वर्षीं सिंहासनावर बसला. चालुक्य-कुळाच्या राजधानीचें नांव वातापी-नगरी असें होतें. ती

बहुधा हल्लीं कलादगी-जिल्ह्यांत बदामी ह्मणून शहर आहे तीं असावी. इ० स० ७६० च्या सुमारास राष्ट्रकूट अथवा राठोड ह्या कुळांतील दंतिदुर्ग आणि त्याचा चुलता कृष्णराज ह्या नांवांच्या राजांनीं चालुक्य-कुळांतील पुरुषांचा पराभव केला आणि महाराष्ट्र-देशाचें आधिपत्य मिळविलें. ह्या वंशांतील पुरुषांनीं सुमारें इ० स० ९७५ पर्यंत राज्य केलें. मोंगलाईंत मालखेड ह्मणून जें शहर आहे तीं राठोड-कुळाची राजधानी होती. पुढें तैलप ह्मणून चालुक्य-वंशांतील एक सरदार होता त्यानें राठोडांचा पराभव करून आपल्या पूर्वजांचें राज्य संपादिलें. ह्या नवीन चालुक्यांनीं इ० स० ९७५ पासून तों सुमारें इ० स० ११९० पर्यंत राज्य केलें. त्यांची राजधानी मोंगलाईंत कल्याण ह्मणून एक गांव आहे तीं होती. चालुक्यांचें वैभव नष्ट झाल्यावर महाराष्ट्र-देशाचें आधिपत्य यादव ( जाधव ) कुळांतील पुरुषांस प्राप्त झालें. त्यांच्या राजधानीचें नांव देवगिरी हें होतें. त्यास हल्लीं दवलताबाद असें ह्मणतात. ह्याच कुळांत रामदेव नांवाचा राजा झाला; मुसलमान लोकांनीं त्याचा पराभव करून आपला अम्मल महाराष्ट्र-देशांत बसविला.

दक्षिणेंत मुसलमान लोकांच्या स्वाऱ्या.

४. ह्यानंतरची माहिती मुसलमान इतिहासकर्त्यांच्या लेखांवरून अशी कळते कीं, इसवी सनाच्या सुमारें १३ व्या शतकाच्या अखेरीस अल्लाउद्दीन खिलजी ह्या नांवाच्या एका मुसलमान बादशाहानें नर्मदेच्या दक्षिणेस प्रथम स्वारी केली. त्या स्वारींत त्यानें देवगड (ह्यालाच आतां दवलताबाद ह्मणतात) एथील रामदेव नांवाच्या हिंदु

राजाचा पराभव करून त्याचें सर्व द्रव्य हरून नेलें. त्यानंतर दिल्लीच्या राजांच्या सैन्यांनीं नर्मदेपासून कन्याकुमारीकेपावेतों सर्व दक्षिणदेश जिंकून व लुटून फस्त केला.

९. दिल्ली एथें महंमद तघलख नांवाचा बादशाह राज्य करीत असतां दक्षिणप्रांतीं त्याच्या सरदारांनीं मोठें बंड केलें. तें मोडण्याकरितां बादशाहानें पुष्कळ यत्न केला, परंतु तो व्यर्थ गेला. शेवटीं त्या बंड करणाऱ्या सरदारांनीं दवलताबादेस मुसलमानांची एक नवी गादी स्थापिली; आणि त्यांच्यापैकींच जाफरखान नामें महापराक्रमी सरदार होता, त्याचें नांव सुलतान अल्लाउद्दीन हुसेन कांगो ब्राह्मणी असें ठेवून त्यांनीं तो दवलताबादेच्या तक्तावर बसविला. ही गोष्ट इ० स० १३४७ ह्या वर्षी झाली.

ब्राह्मणी राज्याचा आरंभ, इ.स.१३४७.

जाफरखान ह्याच्या नांवास कांगो ब्राह्मणी हीं अक्षरें जोडण्याचें कारण असें झालें कीं, तो पूर्वी दिल्ली-शहरांत कांगो नांवाच्या एका ब्राह्मणाजवळ गुलाम होता. त्या ब्राह्मणानें त्याचे उत्तम गुण पाहून गुलामगिरींतून त्याची सुटका केली होती; व दुसरेही त्यावर अनेक उपकार केले होते. ह्मणून पुढें जाफरखानानें वर लिहिल्याप्रमाणें स्वतंत्र राज्याची स्थापना केल्यावर त्या ब्राह्मणाचे उपकार स्मरून आपल्या नांवास कांगो ब्राह्मणी अशीं अक्षरें जोडिलीं; आणि त्या ब्राह्मणास आपल्या जामदारखान्याचें काम सांगून सुखी केलें. त्याच्यामागें त्याच्या वंशांत जे बादशाह झाले, त्यांनींही आपणांला ब्राह्मणी हेंच नांव पुढें चालविलें. ह्या कारणावरून त्या राज्यास इतिहासामध्यें दक्षिणेंतील

ब्राह्मणी राज्य असें ह्मटलें आहे. ह्या राज्याची राजधानी प्रथम कलबुरगें-शहर होतें, नंतर बेदर-शहर झालें.

महाराष्ट्र-देशांत दुष्काळ; इ.स.१३९६.

६. ब्राह्मणी राजे राज्य करीत असतां इ० स० १३९६ ह्या वर्षीं महाराष्ट्र-देशांत मोठा दुष्काळ पडला. तो १२ वर्षेंपर्यंत होता. त्यास दुर्गादेवी असें ह्मणतात. त्या बारा वर्षांमध्यें महाराष्ट्र-देशांत पाऊस अगदीं पडला नाहीं, असें सांगतात. ह्या दुष्काळामुळें महाराष्ट्र-देशाचा बराच भाग ओस पडून गेला, आणि पुढें सुमारें तीस वर्षेंपर्यंत तेथें चांगलीशी वस्ती झाली नाहीं.

शिरके.

७. ब्राह्मणी राजांच्या कारकीर्दींत रत्नागिरि-जिल्ह्यांत कोट्टें एथें शिरके उपनांवाचा एक मोठा बलाढ्य मराठा सरदार होता. त्यानें मात्र त्या वेळीं मुसलमान लोकांबरोबर लढाया मारून आपलें संरक्षण केलें.

वास्कोदिगामा.

८. ब्राह्मणी राज्य बुडण्याच्या सुमारास पोर्तुगाल-देशचा वास्कोदिगामा नांवाचा सरदार इ० स० १४९७ ह्या वर्षीं कांहीं लोकांसहित जलमार्गानें प्रथम कालीकोट-बंदरांत आला. पुढें इ० स० १५१० ह्या वर्षीं आल्फन्सो अलबुकर्क नांवाच्या पोर्तुगाल—देशच्या सरदारानें गोवें-शहर हस्तगत करून घेतलें. तें शहर अद्यापि पोर्तुगीज लोकांच्या ताब्यांत आहे.

ब्राह्मणी राज्याचा नाश.

९. ब्राह्मणी राज्य इ० स० १३४७ पासून इ० स० १५२६ पर्यंत चाललें, व त्या घराण्यांत एकंदर अठरा राजे झाले. ह्या राज्याला

इ० स० १४७८ ह्या वर्षापासून उतरती कळा लागली; ह्याचें कारण असें झालें कीं, तें राज्य अमर्याद वाढल्यामुळें मुलखाच्या बंदोबस्ताकरितां नेमिलेले सुभेदारच आपापल्या सुभ्यांमध्यें प्रबळ होऊन बादशहाची आज्ञा जुमानीनातसे झाले, व स्वतंत्र रीतीनें राज्यकारभार पाहूं लागले. असें होतां होतां इ० स० १५०० ह्या वर्षाच्या सुमारास तें राज्य मोडून विजापूरचें राज्य, गोवळकोंडचें राज्य, अहमदनगरचें राज्य, वऱ्हाडचें राज्य आणि बेदरचें राज्य, अशीं त्याचीं वेगळालीं पांच राज्यें झालीं. त्या राज्यांस अनुक्रमें आदिलशाही, कुतुबशाही, निजामशाही, इमादशाही आणि बुरीदशाही, अशीं उपनांवें पडलीं होतीं. ह्या पांच राज्यांपैकीं पहिल्यानें बुरीदशाही विजापूरच्या बादशहानें बुडविली. इमादशाही ही इ० स० १४८४ पासून इ० स० १५७४ पर्यंत चालली. पुढें ती अहमदनगरच्या बादशहानें बुडविली. बाकीचीं तीन पुढें बलिष्ठ झालीं.

अहमदनगरच्या राज्याचा परिणाम.

१०. इसवी सनाच्या सोळाव्या शतकाच्या अखेरीस दिल्लीचा बादशाह अकबर ह्यानें वरील राज्यें बुडविण्याचा यत्न चालविला. त्या वेळीं त्या राज्यांचे एकमेकांशीं तंटे सुरू होऊन त्यांत अव्यवस्था झाली होती; व अहमदनगरचा बादशाह बहादर निजामशाह हा केवळ मूल असून त्याच्या दरबारी लोकांतही दोन फळ्या झाल्या होत्या; तेणेंकरून अहमदनगरच्या राज्यांत तर फारच अव्यवस्था झाली होती; त्यामुळें तें राज्य सहज हस्तगत होईल, असें पाहून तेंच घेण्याविषयीं अकबरानें प्रथम यत्न चालविला, व थोड्याच काळांत त्यानें त्या राज्याचा बहुतेक मुलूख घेतला.

शेवटीं खुद्द अहमदनगरावरही त्यानें सैन्य पाठविलें; त्या वेळीं त्या शहरांत चांदबिबी नांवाची कोणी एक स्त्री बादशाह बहादर निजामशाह ह्याची नातलग होती, तिनें त्या शहराच्या रक्षणाकरितां विलक्षण पराक्रम केला, त्यामुळें लोक अद्यापि तिची कीर्ति गातात. परंतु ती आपल्या शहराचा बचाव करण्याकरितां झटत असतां तिला कोणी दुष्टानें मारेकऱ्यांकडून मारविलें. त्यामुळें तें शहर मोंगलांच्या हातीं लागून त्यांनीं तेथील बादशाहास इ० स० १६०० मध्यें कैद केलें. तेव्हां अहमदनगरचें राज्य बुडण्याचा प्रसंग आलाच होता, पण त्या राज्यांत मलिकंबर नांवाचा एक अत्यंत बुद्धिमान् प्रधान होता, त्यानें दवलतावादेस दुसरा एक नवाच बादशाह करून तेथें निजामशाही राज्याची स्थापना केली, आणि त्या राज्यापैकीं जो मुलूख मोंगलांच्या हातीं लागला नव्हता, त्याची व्यवस्था करण्यास आरंभ केला. त्यानें दवलतावादेजवळ खिडकी नांवाचें मोठें शहर वसवून ती निजामशाहीची राजधानी केली. हेंच शहर पुढें अवरंगजेब बादशाहानें आपल्या एका सुभ्याची राजधानी करून त्याचें नांव अवरंगाबाद असें ठेविलें. मलिकंबरानें प्रांतांचा वसूल घेण्याचे वगैरे फार उत्तम नियम करून प्रजा सुखी केली. त्यामुळें लोक अद्यापि त्याचे गुण आठवितात. ह्याप्रमाणें तें राज्य पुनः कांहींसें आकारास येऊं लागलें, तों, इ० स० १६२६ ह्या वर्षी मलिकंबर मृत्यु पावला. त्यामुळें तेथें पुनः पूर्वीप्रमाणें अव्यवस्था सुरू झाली. शेवटीं इ० स० १६३७ ह्या वर्षी दिल्लीचा बादशाह शहाजहान ह्यानें तें राज्य अगदींच बुडवून टाकिलें. ह्याप्रमाणें अहमदनगरच्या राज्याचा शेवट झाला.

विजापूर आणि गोवळकोंडें एथील राज्यांचा परिणाम.

११. अहमदनगरचें राज्य बुडालें त्या वेळीं विजापूर व गोवळकोंडें ह्या दोन्ही राज्यांनाही उतरती कळा लागलीच होती. त्यांत विशेषेंकरून महाराष्ट्र-देशामध्यें स्वतंत्र राज्याची स्थापना करणारा शिवाजी राजा ह्याच्या पराक्रमामुळें तर तीं फारच मोडकळीस आलीं होतीं. शेवटीं अवरंगजेबानें तीं दोन्ही राज्यें इ० स० १६८७ ह्या वर्षी अगदींच मोडून टाकिलीं. ह्या राज्यांपैकीं विजापूरचें राज्य इ० स० १४८९ पासून स० १६८७ पर्यंत स्वतंत्र होतें; व गोवळकोंडचें राज्य इ० स० १५१२ पासून इ० स० १६८७ पर्यंत स्वतंत्र होतें.

मराठी ग्रंथ संग्रहालय नं.

# भाग दुसरा.

## महाराष्ट्र–देशाचा संक्षिप्त अर्वाचीन इतिहास.

### प्रकरण पहिलें.

### शिवाजी राजा आणि त्याच्या वंशांतील दुसरे राजे, ह्यांचें वर्णन.

# शिवाजी राजा ह्याचें वर्णन.

इ० स० १६२७ ह्या वर्षापासून इ० स० १६८० ह्या वर्षापर्यंत.

त्याच्या पूर्वजांची हकीगत.

१. शिवाजी हा मराठी राज्याचा मूळ पाया घालणारा होय. ह्याच्या पूर्वजांचें उपनांव भोंसले असें होतें. हे भोंसले दवलताबादेजवळ वेरूळ ह्मणून गांव आहे, तेथें पूर्वी रहात असत. भोंसल्यांच्या कुळामध्यें शिवाजीचा आजा मालोजी हा पहिल्यानें, शिंदकेरचा जाधवराव ह्मणून एक सरदार होता त्याच्या आश्रयानें, निजामशाही सरकारच्या चाकरीस राहिला. पुढें त्याच जाधवरावाची कन्या त्यानें आपला मुलगा शाहाजी ह्यास केली; ह्यामुळें त्याची योग्यता पुष्कळ वाढली; आणि त्याच सरकारांतून त्यास शिवनेरी व चाकण ह्या दोन्ही किल्ल्यांची व त्यांच्याखालीं असणाऱ्या मुलखाची मामलत मिळून पुणें व सुपें ह्या परगण्यांची जहागीर मिळाली.

शाहाजी व त्याचे पुत्र.

२. मालोजीचा मुलगा शाहाजी हा आपल्या बापाच्यामागें कांहीं दिवस निजामशाही सरकारच्या आश्रयास होता. पुढें दिल्लीचा बादशाह शहाजहान ह्यानें तें राज्य बुडविलें, तेव्हां तो शहाजहानाच्या पदरीं राहिला. परंतु त्या बादशाहानें त्यास दिलेल्या इनामांपैकीं कांहीं इनामें परत घेतलीं, तेणेंकरून त्यास फार वाईट वाटलें, आणि त्यानें मोंगलांची चाकरी सोडून देऊन विजापूरच्या बादशाहाचा आश्रय धरिला, व मरेतोंपर्यंत त्याच्याच पदरीं चाकरी केली. तो इ० स० १६६४ ह्या वर्षी मरण पावला. त्या वेळीं त्याच्या ताब्यांत पुणें, सुपें आणि तंजावर हे प्रांत होते. शाहाजीची पहिली बायको जाधवरावाची कन्या जिजाबाई हिजपासून त्याला दोन पुत्र झाले. त्यांपैकीं वडील पुत्र संभाजी, तो तरुण असतांच लढाईत मेला. धाकटा शिवाजी हा पुढें राजा झाला. शाहाजीची दुसरी बायको मोहित्यांची कन्या तुकाबाई ह्मणून होती, तिजपासून त्याला व्यंकोजी नांवाचा एक पुत्र झाला. तो तंजावर-प्रांतांत आपल्या बापाची जहागीर संभाळून असे.

शिवाजीचें जन्म (इ. सन १६२७) व त्याचें लहानपणचें शिक्षण.

३. शिवाजी इ० स० १६२७ च्या मे महिन्यांत जुनराजवळ शिवनेरी किल्ल्यांत जन्मला. शाहाजीनें कर्नाटकांत आपल्या जहागिरीवर जाते वेळीं, पुणें-प्रांतीं त्याचा एक दादोजी कोंडदेव नांवाचा मोटा चतुर आणि विश्वासू कारभारी होता, त्याच्या स्वाधीन शिवाजी व जिजाबाई ह्यांस केलें होतें. त्या दादोजीच्या सुसंगतीनें व त्याच्या उत्तम शिक्षणानें राज्यभार वाहण्यास योग्य

असे पुष्कळ गुण शिवाजीच्या अंगीं आले. परंतु त्याला लिहिणें, वाचणें वगैरे अगदीं आवडत नसे. लिहिणें, वाचणें हीं कामें कारकुनांचीं आहेत असें समजून मराठे सरदार बहुधा ह्या गोष्टींकडे दुर्लक्ष्य करीत. त्यांत शिवाजीला तर आपलें नांवहीं लिहितां येत नव्हतें असें ह्मणतात; तरी शूर सरदारास योग्य जे धनुर्विद्यादिगुण त्यांमध्यें तो प्रवीण होता. घोड्यावर बसण्यांत तर तो इतका पटाइत होता कीं, त्या वेळच्या सर्व मराठ्यांत तसा दुसरा कोणीही नव्हता. भारत, भागवत, रामायण इत्यादि पुराणांतील युद्धांच्या कथा त्यास अतिशय आवडत असत. तशीच त्याची हिंदुधर्मावर अत्यंत भक्ति असून तो मुसलमानांच्या धर्माचा लहानपणापासून तिरस्कार करी. सारांश, त्याच्या अल्पवयांतच पुढें त्यानें केलेल्या पराक्रमाचा अंकुर दिसूं लागला.

*त्याच्या पराक्रमाचा व सत्तेचा आरंभ.*

४. शिवाजी सोळा वर्षांचा झाला नाहीं तोंच त्यानें आडदांड लोकांची संगति धरून मुलखांत पुंडाई आरंभिली. हा त्याचा दुर्वृत्तपणा पाहून दादोजीनें तो सोडून देण्याविषयीं त्याला वारंवार उपदेश केला, व त्याचें मन अशा हलकट कामांतून निघावें ह्मणून शाहाजीच्या जहागिरीचा बंदोबस्त करण्याचें काम त्यावर सोंपविलें. त्यांत त्याची सुबुद्धि व पोक्त विचार हीं ढळढळीत दिसून आलीं. त्या कामाच्या संबंधानें कित्येक मराठे सरदारांशीं दळणवळण ठेवून त्यानें आपल्या सद्गुणांच्या योगानें त्या सरदारांची अत्यंत प्रीति संपादिली. लोकांमध्यें त्याची प्रतिष्ठा वाढत गेल्यामुळें मुसलमान लोकांच्या ताब्यांत न राहतां

स्वतंत्रपणें वागण्याविषयींचा त्याच्या बुद्धीचा अंकुर उत्त-रोत्तर वाढतच गेला, आणि त्यानें तदनुसार यत्नही सुरू केला. तो असा; त्यानें प्रथम घाटमाथ्यावरील मावळे लोक जमविण्याचा विचार केला. ते लोक अडाणी दिसत हें खरें, परंतु ते मोठे शूर व अत्यंत विश्वासू असून त्यांना सांगितलेलें काम ते फार जीव लावून करीत. हे त्यांच्या अंगचे गुण शिवाजीच्या उद्देशाला फार अनुकूळ असल्यामुळें त्यानें त्यांच्याशीं फारच स्नेह केला. त्या मावळे लोकांमध्यें मुख्यत्वेंकरून एसाजी कंक, तानाजी मालुसरा, आणि बाजी फसलकर असे तिघे असामी त्याचे परम स्नेही होते. त्यांनीं शिवाजीला मावळच्या चोरवाटा व आसपासचे डोंगरी किल्ले ह्यांची चांगली माहिती करून दिली. तेव्हां त्या डोंगरी किल्ल्यांपैकीं एखादा आपल्या ताब्यांत असावा असें मनांत आणून शिवाजीनें मावळे लोक जमा केले; आणि इ० स० १६४६ ह्या वर्षी विजापूरच्या ताब्यांतील तोरणा नांवाचा किल्ला, तेथील लोक वश करून, आपल्या स्वाधीन करून घेतला. पुढें त्या किल्ल्याची डागडुजी करण्याकरितां तो खणीत असतां त्यांत त्याला एक मोहरांचा हंडा सांपडला. एकाएकीं इतकें पुष्कळ द्रव्य त्याच्या हातीं लागल्यामुळें त्याची कुलस्वामिनी भवानी हीच प्रसन्न होऊन त्याला द्रव्य देते, असें लोकांस वाटूं लागलें, त्यामुळें त्यांच्या मनांत त्याजविषयीं अत्यंत पूज्यबुद्धि उत्पन्न होऊन पुष्काळ लोक त्याला अनुकूळ होऊं लागले. तेव्हां शिवाजीनें तोरणा-किल्ल्याच्या आग्नेयी दिशेस दीड कोसावर दुसरा एक राजगड नांवाचा किल्ला बांधिला; आणि दारूगोळा वगैरे युद्धाचें सामान खरेदी

करून दोन्ही किल्ल्यांवर यथास्थित बंदोबस्त केला. ही सर्व हकीकत विजापुरीं कळल्यावर बादशाहास राग येऊन त्यानें शाहाजीस आपल्या मुलाचा बंदोबस्त करावयास आज्ञा केली. शाहाजीनें ती मान्य करून दादोजीस लिहिलें कीं, हरएक युक्ति करून शिवाजीला वाटेवर आणा. त्याप्रमाणें दादोजीनें शिवाजीला पुष्कळ उपदेश केला. परंतु तो सर्व व्यर्थ गेला. दादोजी हा अगोदरच वार्धक्यानें पीडला होता, तितक्यांत शिवाजीचें असें आचरण पाहून, आपल्या धन्यावर मोठीं दुर्धर संकटें येतणार, अशी रात्रंदिवस काळजी लागल्यामुळें तर तो अगदीं खंगला आणि मरणोन्मुख झाला; शेवटीं मरते वेळीं त्यानें शिवाजीस सांगितलें कीं, तुम्ही कसेही वागा, पण एवढें करा कीं, गाई, ब्राह्मण व प्रजा ह्यांचें योग्य पालन करून मुसलमानांपासून हिंदूंचीं देवस्थानें राखा. ही त्याची शेवटची आज्ञा शिवाजीनें शिरसा मान्य करून मुसलमानांपासून मुलूख मिळविण्याकरितां मोठ्या झपाट्यानें उद्योग चालविला.

विजापूरकरांच्या मुलखामध्यें तो आपली सत्ता वाढवितो.

९. इ० स० १६४७ ह्या वर्षी दादोजी कोंडदेव वारला; त्यानंतर शिवाजीनें थोडक्याच दिवसांत चाकणचा किल्ला, व पुरंदर आणि कोंडाणें हे किल्ले, युद्धाचा प्रसंग न आणितां, केवळ शहाणपणाच्या बळावर घेतले. कोंडाणें-किल्ल्याचें त्यानें सिंहगड असें नांव ठेविलें. सुपें-परगण्याच्या मामलेदारावर छापा घालून तो परगणाही त्यानें घेतला. पुढें इ० स० १६४८ ह्या वर्षी त्यानें कल्याणचा सुभा व कोंकणपट्टींतील बरेच किल्ले घेतले. त्यामुळें कोंकणपट्टीचा बहुतेक भाग त्याच्या ताब्यांत येऊन त्याचें ऐश्वर्य वाढलें;

तेव्हां त्याला मोठी उमेद येऊन त्यानें विजापूरकरांच्या मुलखांत फारच उपद्रव मांडिला.

६. तेव्हां शाहाजीच्याच अनुकूलतेनें शिवाजीनें बंडावा माजविला असेल, असें विजापूरच्या बादशाहास वाटून त्यानें शाहाजीला धरून कैदेंत ठेविलें; आणि शिवाजी लवकर आपल्या अपराधाची क्षमा मागावयास न येईल तर तुझा जीव घेईन, असें बादशाहानें शाहाजीला भय घातलें. हें शिवाजीस कळतांच त्यानें दिल्लीचा बादशाह शहाजहान ह्याची चाकरी करण्याचें कबूल करून त्याजकडून विजापूरकरांस दहशत घालवून आपल्या बापाची सुटका करविली. नंतर त्यानें पुष्कळ फौज ठेवून आपल्या मुलखाचा बंदोबस्त चालविला. इ० स० १६५६ ह्या वर्षी त्यानें शामराजपंत नांवाच्या एका ब्राह्मणास पेशवा असें पद देऊन त्याला आपला मुख्य कारभारी केलें; आणि सारी कोंकणपट्टी हस्तगत करून घेण्याच्या इराद्यानें शामराजपंताबरोबर कांहीं फौज देऊन त्यास जंजिऱ्याच्या शिद्दीवर पाठविलें; परंतु तेथें त्याचा पराभव झाला. त्यावरून शिवाजीनें त्याजकडून पेशवाईचा अधिकार काढिला आणि मोरोपंत पिंगळे ह्यास तो अधिकार देऊन त्याला शिद्दीवर पाठविलें. ह्याप्रमाणें शिवाजीचा दंगा पुनः चालू झाला; तेव्हां विजापूरच्या दरबारांत त्याचें पारिपत्य करण्याचा निश्चय होऊन त्या कामावर आफजुलखान नामें सरदाराची नेमणूक झाली. आफजुलखान फौजेसहित इ० स० १६५९ ह्या वर्षी शिवाजीच्या मुलखांत शिरला. प्रतापगडाजवळ

विजापूरकरांचा आफजुलखान नामें सरदार शिवाजीवर येतो, व शिवाजी त्यास ठार मारतो. इ० स० १६५९.

शिवाजीनें प्रथम त्याशीं आर्जवानें वागून एकांतीं मसलत करण्याचा घाट घातला; आणि बोलण्याच्या गर्दीत अफजुलखान गैरसावध असतां त्याच्या पोटांत वाघनखें* खुपसून त्यानें त्यास ठार मारिलें.

विजापूरकरांचे रुस्तुमजमान व शिद्दीजोहार हे सरदार शिवाजीवर येतात. इ० स० १६६१

हें वर्तमान समजतांच बादशहानें रुस्तुमजमान नामें दुसरा एक सरदार शिवाजीवर पाठविला. त्याचा शिवाजीनें अगदीं मोड करून त्याला हांकून लाविलें, आणि विजापुरापर्यंत मुलखाची खंडणी घेतली. नंतर एकदम कोंकणांत जाऊन त्यानें दाभोळ-शहर लुटलें. हें समजतांच बादशाहानें शिद्दीजोहार नामें सरदार त्यावर पाठविला. त्यानें शिवाजी पन्हाळा-किल्ल्यावर आहे अशी संधी पाहून त्या किल्ल्यास चोहोंकडून वेढा घातला. त्या किल्ल्यामध्यें सुमारें चार महिनेपर्यंत शिवाजी अडकून राहिल्यामुळें त्याच्या मुलखांत फार अव्यवस्था होऊं लागली. तेव्हां त्यानें शिद्दीजोहाराशीं तह करण्याचा घाट घातला; त्यामुळें वेढा घालणारे लोक थोडे गैरसावधपणानें वागूं लागले. हें पाहातांच शिवाजी थोडे मावळे लोक बरोबर घेऊन रात्रीं काळोखामध्यें किल्ल्यावरून निसटून गेला. त्यामुळें, व कर्नाटकामध्यें त्याच वेळेस बंडें उत्पन्न झालीं होतीं तीं मोडण्याचें विजापूरच्या बादशाहास अगत्य पडल्यामुळें, शिवाजीचें पारिपत्य करण्याचें काम कांहींसें मागें पडलें.

* हें एक प्रकारचें पोलादी हत्यार आहे. ह्याला वाघाच्या नखांसारखीं वांकडीं तीन पातीं असतात; आणि दोहों अंगांस दोन कड्या असतात. त्या कड्या करांगुळी व तर्जनी ह्यांत घालून मूठ मिटली असतां तें हत्यार झांकलें जातें.

७. विजापूरकरांचें सैन्य कर्नाटकांत गुंतलें असें पाहून शिवाजीनें पुनः त्यांचे कितीएक किल्ले व सांवतांचा वाडी-प्रांत घेतला. असा त्याचा पराक्रम पाहून आपल्या हातून त्याचें पारिपत्य होणें कठीण असें विजापूरकरांस वाटलें. तेव्हां त्यांनीं इ० स० १६६२ ह्या वर्षीं त्याशीं तह केला. ह्या प्रसंगीं कल्याणापासून गोव्यापर्यंत सारी कोंकणपट्टी आणि भिमेपासून वारणेपर्यंत सुमारें १६० मैल लांबीचा घाटमाथा, इतका मुलूख शिवाजीच्या ताब्यांत होता. त्याच्या मुलखाची रुंदी सुप्यापासून जंजिऱ्यापर्यंत सुमारें १०० मैल होती. ह्या वेळीं त्याचें सैन्यही पन्नास हजार स्वार आणि सात हजार पायदळ इतकें होतें.

विजापूरकर निरुपाय होऊन त्याशीं तह करितात. इ० स० १६६२.

८. शिवाजीला विजापूरकरांपासून भीति नाहींशी होऊन तो कांहींसा मोकळा झाल्यामुळें इ० स० १६६२ ह्या वर्षीं तो दिल्लीच्या बादशाहाच्या मुलखांत स्वाऱ्या करूं लागला. प्रथमतः त्यानें अवरंगाबादेपर्यंत मोंगलांचा मुलूख लुटून पुष्कळ द्रव्य जमा केलें. हें वर्तमान दिल्लीचा बादशाह अवरंगजेब ह्याला समजतांच त्यानें शाइस्तेखान नांवाचा सरदार शिवाजीवर पाठविला. त्याचा शिवाजीनें अगदीं मोड करून त्याला आपल्या मुलखांतून हाकून लाविलें. नंतर इ० स० १६६४ ह्या वर्षीं शिवाजीनें मोंगलांच्या ताब्यांतील सुरत-शहर लुटून तेथून पुष्कळ द्रव्य आणिलें. त्या वेळीं सुरतेस कांहीं इंग्रज लोक व्यापार करीत होते. त्यांनीं मोठ्या शौर्यानें आपलें

शिवाजी मोंगलांच्या मुलखावर स्वाऱ्या करूं लागतो. इ० स० १६६२.

व शहरच्या दुसऱ्या कित्तीएक लोकांचें संरक्षण केलें, त्यामुळें त्यांचें मात्र द्रव्य शिवाजीस सांपडलें नाहीं.

शिवाजी आपणास राजा ह्मणवितो व आपल्या नांवाचें नाणें पाडितो. इ० स० १६६४.

९. सुरत-शहर लुटून शिवाजी माघारा रायगडास आला, तोंच त्याला शाहाजी वारल्याचें वर्त्तमान समजलें. तेव्हां तो कांहीं दिवस आपल्या मुलखाचा बंदोबस्त करीत तेथेंच राहिला. नंतर बापाच्या संबंधानें विजापूरकरांच्या पदरचा सरदार हें जें ह्या वेळेपर्यंत शिवाजीकडे नातें होतें, तें उघडपणें टाकून देऊन त्यानें आपल्या नांवास राजा हा किताब जोडिला, व आपल्या नांवाचीं नाणीं पाडण्याकरितां टांकसाळही घातली.

शिवाजीच्या पारिपत्याकरितां अवरंगजेबाचे दोघे सरदार येतात. इ० स० १६६५.

१०. पुढें इ० स० १६६५ ह्या वर्षी शिवाजीनें जलमार्गानें जाऊन मलबार-किनाऱ्यावरील बारशिलोर नांवाचें शहर लुटलें, आणि तेथून अपार द्रव्य आणिलें. ह्याच सुमारास त्याच्या लढाऊ गलबतांवरच्या लोकांनीं मक्केस जाणारे कित्तीएक मुसलमानांचे यात्रेकरू लुटले. त्यामुळें अवरंगजेबास फारच राग येऊन त्यानें दिल्लीरखान व जयसिंग ह्या नांवांच्या दोघां पराक्रमी सरदारांबरोबर मोठें सैन्य देऊन त्यांना शिवाजीवर पाठविलें. त्यांनीं एकाएकीं शिवाजीच्या मुलखांत शिरून मोठा अनर्थ मांडिला. त्यामुळें शिवाजीला तयारी करण्यासही अवसर सांपडला नाहीं. मराठी राज्याची स्थापना होत आहे तोंच त्यावर हें मोठें अरिष्ट आलें, त्यामुळें तें खचीत बुडेल असें दिसूं लागलें. परंतु कोणत्या

प्रसंगीं कसें वागावें हें शिवाजी फार चांगलें जाणत होता. तो आपण होऊन त्या सरदारांच्या भेटीस गेला, आणि कांहीं जाहगीर घेऊन मी बादशाहाची चाकरी करण्यास राजी आहें, असें त्यानें त्यांजपाशीं कबूल केलें. हें त्याचें ह्मणणें जयसिंगानें अवरंगजेब बादशाहास कळविल्यावर त्यानेंही तें मान्य केलें; आणि विजापूरकरांवर स्वारी करण्याच्या कामीं जयसिंगाला त्वां मदत करावी, अशी त्याला आज्ञा केली. अशा रीतीनें आपणावर आलेलें अरिष्ट शिवाजीनें टाळलें.

चौथाई व सर देशमुखी हे दोन हक्क मराठे लोकांत पहिल्यानें कसे उत्पन्न झाले, तो प्रकार.

११. अवरंगजेबाच्या आज्ञेप्रमाणें जयसिंगाबरोबर विजापुरावर स्वारी करायास निघण्याच्यापूर्वी, शिवाजीनें अवरंगजेबास विनंतीपत्र पाठवून विजापूरकरांच्या कांहीं मुलखाची *चौथाई आणि *सरदेशमुखी हे दोन हक्क मागितले. अवरंगजेबाच्या मनांत विजापूरचें राज्य अगदीं बुडवावयाचें होतें; सबब त्या कामांत शिवाजीचा फार उपयोग होईल असें मनांत आणून त्यानें शिवाजीचें मागणें कबूल केलें. तेव्हां तो कांहीं फौज घेऊन जयसिंगाबरोबर विजापूरकरांवर गेला; व त्यांशीं युद्ध करिते वेळीं त्यानें असा कांहीं विलक्षण पराक्रम केला कीं, तो ऐकून अवरंगजेब बादशाह फार खुष झाला आणि त्यानें त्याला बहुमानाचीं वस्त्रें पाठवून दिल्लीस भेटावयास बोलाविलें.

१२. बादशाहाचें बोलावणें कबूल करून शिवाजी

---

* चौथाई ह्मणजे प्रांताच्या एकंदर वसुलाचा चतुर्थांश; आणि सरदेशमुखी म्हणजे त्याच वसुलाचा दशांश.

आपला पुत्र संभाजी ह्यासहवर्तमान इ० स० १६६६ ह्या वर्षी दिल्लीस त्याला भेटावयास गेला. परंतु बादशाहानें त्याच्या इच्छेप्रमाणें त्याचा सन्मान केला नाहीं; त्यामुळें त्यानें राग आल्याचें चिन्ह दर्शविलें; तेवढ्यावरून बादशाहानें त्याला प्रतिबंधांत ठेविलें. असें त्याचें कपट पाहून शिवाजीनेंही त्याच्याशीं कपट लढविलें. तें असें कीं, दरबारच्या लोकांशीं स्नेह करून तो कित्येक दिवस मोठमोठ्या बुरडी पेटाऱ्यांत मिठाई वगैरे भरून त्यांजकडे नजराणे पाठवूं लागला. पुढें एके दिवशीं आपण व आपला पुत्र असे उभयतां दोहों पेटाऱ्यांत बसून माणसांकडून त्यानें ते पेटारे शहराबाहेर संकेताच्या जागीं नेवविले; आणि तेथें घोड्यावर बसून दोघे दक्षिणेंत पळून आले.

शिवाजी दिल्लीस जाऊन येतो. इ० स० १६६६.

१३. शिवाजी आपल्या हातांतून निसटला, हें पाहून अवरंगजेबास फार वाईट वाटलें; तेव्हां त्यानें अशी कृप्ति मनांत आणिली कीं, पुनः त्याला आपली कृपा दर्शवून प्रसंग येईल तेव्हां दगा करावा. अशा हेतूनें त्यानें इ० स० १६६७ ह्या वर्षी शिवाजीच्याच विनंतीवरून त्याला राजा हा किताब देऊन वऱ्हाड-प्रांतांत कांहीं जाहगीरही दिली.

त्याला अवरंगजेबापासून राजा हा किताब मिळतो. इ० स० १६६७.

१४. ह्याप्रमाणें अवरंगजेबानें बाह्यात्कारें शिवाजीस आपली कृपा दर्शविली, तरी शिवाजी त्याचें कपट ओळखूनच होता, ह्मणून त्यानें आपल्या सावधपणांत अंतर पडूं दिलें नाहीं. तेव्हां हा एखाद्या वेळीं घात करील असें

मोंगलांनीं घेतलेला मुलूख शिवाजी पुनः त्यांजपासून घेतो.

अवरंगजेबाला भय पडून त्यानें आपला दक्षिणेंतील सुभेदार सुलतान माजूम ह्यास शिवाजीला पकडण्याविषयीं हुकूम केला. हें शिवाजीला कळतांच तो सावध होऊन मोंगलांच्या ताब्यांत गेलेला आपला मुलूख पुनः घेण्याच्या उद्योगास लागला. इ० स० १६७० ह्या वर्षी प्रथमतः त्यानें तान्हाजी मालुसरा ह्यास फौजेसहित पाठवून सिंहगड किल्ला परत घेतला. पण लढाईंत तान्हाजी मालुसरा पडला; तेणेंकरून शिवाजीची मोठी हानि झाली. त्याच वर्षी त्यानें पुरंदर वगैरे पुष्कळ किल्ले घेऊन सुरतशहर पुनः लुटलें; आणि परत येते वेळेस त्याच्यामागें मोंगल लोकांचें एक सैन्य लागलें होतें, त्याची त्यानें अगदीं दाणादाण करून सोडिली. नंतर त्यानें आपला सेनापति प्रतापराव गुजर ह्याला फौज देऊन मोंगलांच्या ताब्यांतील खानदेश-प्रांत लुटावयास पाठविलें. त्यानें खानदेशांत जाऊन बहुत लुटालूट केली; आणि तेथील बहुतेक गांवच्या लोकांपासून आम्ही दरसाल शिवाजीस चौथाई देत जाऊं असा करार लिहून घेतला. हें सर्व वर्तमान अवरंगजेबास कळतांच त्यानें मोहबतखान नामें सरदार शिवाजीवर पाठविला. तो इ० स० १६७२ ह्या वर्षी दक्षिणेंत येऊन पोहोंचतांच शिवाजीनें प्रतापराव गुजर ह्यास त्यावर पाठविलें. त्यानें मोंगलांचा पराभव करून त्यांची अशी धांदल उडवून दिली कीं, ते जीव घेऊन अवरंगाबादेकडे पळत सुटले. ह्याप्रमाणें शिवाजीला कोणी शत्रु नाहींसा होऊन पूर्वी ज्या अवरंगजेबाच्या आज्ञेनें विजापूरकरांच्या मुलखावर त्यानें चौथाई बसविली होती त्याच अवरंगजेबाच्या मुलखावर त्यानें ती हल्लीं बसविली. ह्या

वेळेपासून पुढें मराठे लोक नेहमीं मोंगलांच्या मुलखीं चौथाई घेऊं लागले. ह्याखेरीज गोवळकोंडचा बादशाह आणि विजापूरचा बादशाह हेही शिवाजीपासून आपणांस उपद्रव न व्हावा ह्मणून दरसाल त्याला गुप्तरूपें अनुक्रमें पांच लक्ष आणि तीन लक्ष रुपये देत असत.

प्रतापरावाचा मृत्यु व हंबीरराव मोहित्याची हकीकत.

१५. इ० स० १६७३ ह्या वर्षी शिवाजीनें सैन्य पाठवून विजापूरकरांचें संपत्तीनें भरपूर असें हुबळी नामें मोठें शहर लुटलें, आणि तेथून मनस्वी द्रव्य आणिलें. ह्याखेरीज त्यानें सातारचा किल्ला अजीमतारा व दुसरे कांहीं त्यांच्या ताब्यांतील किल्ले घेतले. तेव्हां विजापुराहून त्याच्या पारिपत्यास लष्कर आलें, तें प्रतापराव गुजरानें पिटवून लाविलें. परंतु तें लष्कर लुटण्याची संधी सांपडली असतां त्यानें तें लुटलें नाहीं; ह्मणून शिवाजीला राग येऊन त्यानें प्रतापरावाची निर्भर्त्सना केली. तीमुळें प्रतापरावास त्वेष येऊन तो एकाएकीं पुनः विजापूरकरांच्या लष्करावर चालून गेला; पण फौजेचा बंदोबस्त बरोबर नसल्यामुळें तो प्राणास मुकला, आणि त्याच्या सैन्याची दुर्दशा झाली. इतक्यांत हंसाजी मोहिते नामें शिवाजीचा पांच हजार स्वारांचा सरदार होता, त्यानें विजापूरकरांच्या सैन्यावर पडून त्याचा अगदीं मोड केला, आणि प्रतापरावाचे लोक वांचविले. हें शिवाजीला समजतांच त्यानें हंसाजीचें हंबीरराव मोहिते असें नवें नांव ठेवून तो प्रतापरावाच्या जागीं सेनापति केला.

१६. ह्याप्रमाणें सर्वत्र विजयी होऊन शिवाजीनें इ० स०

तो आपणास राज्याभिषेक करवून राज्याची व्यवस्था करितो. इ. स. १६७४.

१६७४ ह्या वर्षी जून महिन्याच्या ६ व्या तारिखेस ह्मणजे शके १५९६ च्या ज्येष्ठ शुद्ध १३ स मोठ्या समारंभानें रायगडावर गागाभट्ट नामें काशीकर प्रसिद्ध शास्त्याकडून आपणास राज्याभिषेक करविला; आणि राज्याचा वसूल घेण्याचे वगैरे उत्तम प्रकारचे नियम ठरवून रयतेला सुख देण्याचा यत्न चालविला. त्यानें आपल्या राज्याच्या व्यवस्थेकरितां एकंदर आठ प्रधान नेमिले होते; ह्मणून त्यांस अष्टप्रधान अशी संज्ञा होती. त्यांचे किताब व कामें एणेंप्रमाणें:—

| * किताब. | कामें. |
|---|---|
| १ पेशवा अथवा मुख्य प्रधान. | मुख्य दिवाणगिरी. |
| २ पंत अमात्य. . . | जमाबंदी व खर्चाची चौकशी. |
| ३ पंत सचीव. . . . . | दप्तरदारी व वारनिशी. |
| ४ मंत्री. . . . . . . . . | खासगी दप्तर व खासगी शिबंदी ह्यांची व्यवस्था. |
| ५ सेनापति. . . . . | साऱ्या फौजेची व्यवस्था. |
| ६ सुमंत. . . . . . . | परराज्यांशीं वकिली करणें वगैरे. |
| ७ न्यायाधीश . . . . | न्याय करणें. |
| ८ पंडितराव. . . . . | शास्त्रार्थ सांगणें. |

* टीप. शिवाजीस राज्याभिषेक होण्याच्यापूर्वी न्यायाधीश खेरीजकरून सदर अष्टप्रधानांचीं नांवें निराळीं होतीं; तीं अशीं:- १ पेशवा, २ मजीनदार, ३ सुरनीस, ४ वाकनीस, ५ सरनोबत, ६ डबीर, ७ न्यायाधीश, ८ न्यायशास्त्री.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

१७. ह्याप्रमाणें राज्याचा बंदोबस्त केल्यावर शिवाजी तीस हजार स्वार आणि चाळीस हजार पायदळ बरोबर घेऊन इ० स० १६७७ ह्या वर्षी कर्नाटकांत शिरला आणि तेथें विजापूरकरांच्या मुलखांतून चौथाई व सरदेशमुखी ह्यांबद्दल ऐवज घेऊन, तंजावरास त्याचा भाऊ व्यंकोजी होता, त्याजपाशीं आपल्या बापाच्या जाहगिरीचा वांटा मागूं लागला. तो कबूल न करितां व्यंकोजीनें त्याच्या लष्करावर छापा घातला; परंतु शिवाजीचा बंदोबस्त कडेकोट असल्यामुळें त्याचाच पराभव होऊन त्याला जाहगिरीचा वांटा देणें प्राप्त झालें. शिवाजीनें तो सारा वांटा न घेतां ममताळूपणानें वडिलांची बहुतेक जहागीर त्याच्या स्वाधीन केली. नंतर कर्नाटकांतला बराच मुलूख काबीज करून शिवाजी रायगडास परत आला.

शिवाजीची कर्नाटकावर स्वारी. इ० स० १६७७.

१८. इ० स० १६७९ ह्या वर्षी अवरंगजेबानें दिलीरखान नामें सरदार विजापूरचें राज्य बुडविण्याच्या उद्देशानें पाठविला. तेव्हां विजापूरच्या बादशाहानें शिवाजीचें आर्जव करून त्याजपाशीं मदत मागितली. त्या वेळीं शिवाजीनें त्या दिलीरखानावर सैन्य पाठवून त्याचा अगदीं पराभव केला; आणि त्याला विजापूर-प्रांतांतून हांकून लाविलें. ह्याप्रमाणें विजापूरच्या बादशाहाचा बचाव करून शिवाजीनें त्याजपासून कर्नाटक व दुसरे कांहीं प्रांत ह्यांचें पूर्ण स्वामित्व मिळविलें.

शिवाजी मोंगलांपासून विजापूरकरांचा बचाव करितो. इ० स० १६७९.

१९. अशा रीतीनें आपला पराक्रम साऱ्या दक्षिणेंत गाजवून शिवाजी रायगडास येऊन राहिला. तेथें त्याला गुडघी नांवाचा रोग होऊन तो इ० स० १६८० च्या एप्रिलच्या ५ व्या तारखेस मृत्यु पावला.

शिवाजीचा मृत्यु (ता० ५ एप्रिल इ० स०१६८०) व त्याची संतति.

त्या वेळेस त्याचें वय ५३ वर्षांचें होतें. त्याला दोन पुत्र होते. वडील पुत्राचें नांव संभाजी आणि धाकट्या पुत्राचें नांव राजाराम. ह्याला ५।६ बायका* होत्या असें ह्मणतात. ह्यांपैकीं निंबाळकर ह्यांची मुलगी सईबाई ही शिवाजीची पहिली बायको, तिजपासून ह्याला संभाजी हा पुत्र झाला. मोहित्यांची मुलगी सोइराबाई ह्मणून जी ह्यानें आणखी एक बायको केली होती तिजपासून ह्याला राजाराम झाला.

२०. शिवाजीनें केवळ रानटी लोकांच्या मदतीनें एवढ्या मोठ्या राज्याची स्थापना केली, फक्त ह्याच गोष्टीवरून त्याच्या अंगचें चातुर्य व शौर्य हीं स्पष्ट दिसून येतात. तो

त्याचे गुण आणि वर्तन वगैरे.

महाशूर असून राज्यकारभारांतही मोठा दक्ष होता. त्यानें प्रजेच्या रक्षणाकरितां कितीएक नवे नियम केले. त्याला इतकी पुष्कळ संपत्ति मिळाली, तरी तो तिचा अयोग्य रीतीनें व्यय करीत नसे. तो आपल्या शिपाई लोकांस वगैरे वारंवार बक्षिसें देऊन त्यांस संतुष्ट राखीत असे; व आबालवृद्धांशीं अगदीं नम्रपणानें वागे. आतां तो कांहीं प्रसंगीं कपटानें वागला, ही गोष्ट त्याच्या इतर गुणांस बट्टा आणणारी होती खरी; तरी एकंदरांत त्याच्यामध्यें पुष्कळ

---

* काव्येतिहाससंग्रह–शिवछत्रपतींचें चरित्र, पृ० ५९।६०.

अलौकिक गुण होते ह्यांत संशय नाहीं; ह्मणूनच मराठे लोक त्याला अवतारी पुरुष समजतात.

त्याच्या राज्याचा विस्तार.

२१. शिवाजी मृत्यु पावला त्या वेळीं सारें कोंकण, पुणें-प्रांत, आणि कर्नाटकांतील व दुसरेकडील कांहीं प्रांत इतके त्याच्या स्वाधीन होते. त्याच्या प्रांतांत मूळचेच डोंगरी किल्ले पुष्कळ होते आणि त्यानेंही बरेच बांधिले. त्यांत राजगड आणि प्रतापगड हे मुख्य होते. ह्या सर्व डोंगरी किल्ल्यांवर शिबंदी लोक ठेवून त्यानें आपल्या मुलखाचा बंदोबस्त राखिला होता. त्याचें राहणेंही बहुतकरून डोंगरी किल्ल्यांत असे. त्याच्या गादीची जागा पहिल्यानें राजगड-किल्ला ही होती, आणि पुढें रायगड-किल्ला झाला.

त्याच्या वेळेस उत्कर्ष पावलेले सांप्रतचे मराठे वडे लोक.

२२. शिवाजीनें वसुलाच्या कामावर नेमिलेला *आबाजी सोनदेव ह्याच्या वंशांतील पुरुषांकडे साताराच्या राज्याच्या शेवटापर्यंत पंतअमात्याचें काम होतें. शिवाजीचा सेनापति हंबीरराव मोहिते ह्याच्या वंशांतील पुरुषांकडे त्याच राज्याच्या अखेरीपर्यंत तेथील स्वारांचा मुख्य अधिकार होता. शिरके ह्या उपनांवाच्या ज्या सरदाराचा उल्लेख पहिल्या भागांत केला आहे, त्याचा वंश हल्लीं कोंकणांत आहे. परंतु त्यांत कोणी आतां फारसा प्रसिद्ध नाहीं. मुधोळकर घोरपडे ह्मणून विजापूरकरांचा एक सरदार होता; त्याच्या सरंजामास जो मुलूख त्या वेळेस चालत होता, तो अद्यापि त्याच्या वंशाकडे तसाच चालत आहे.

* ह्याचें मूळचें आडनांव बहुतकर, व गांवावरून पडलेलें बावडेकर.

# संभाजी राजा ह्याचें वर्णन.

इ॰स॰१६८० ह्या वर्षापासून इ॰स॰१६८९ ह्या वर्षापर्यंत.

तो गादीवर बसतो; इ॰ स॰ १६८०.

१. शिवाजीच्यामागून त्याचा वडील पुत्र संभाजी हा त्याच्या गादीवर बसला. त्या वेळेस त्याचें वय तेवीस वर्षांचें होतें.

त्याचा स्वभाव.

२. संभाजी कांहींसा आपल्या बापासारखा शूर होता; परंतु स्वभावानें अत्यंत क्रूर व दुर्व्यसनी असल्यामुळें तो राज्याधिकारास मुळींच लायक नव्हता, ह्मणून त्यानें गादीवर बसूं नये असें प्रधानमंडळींपैकीं कित्येकांच्या मनांत आलें. अशी संधी पाहून राजारामाची आई सोयराबाई हिनें त्या प्रधानांच्या मदतीनें राजारामास गादीवर बसविण्याचा यत्न चालविला. हें संभाजीस समजतांच त्यानें त्या सर्वांचा मोड करून गादी मिळविली, आणि सोयराबाई व तिच्या पक्षाकडील मुख्य सरदार शिवाजीच्या वेळचा पंतसचीव अनाजी दत्तो, ह्या उभयतांस व आणखी कित्येकांस अत्यंत क्रूरपणानें ठार मारिलें. ह्या त्याच्या क्रूरपणामुळें तो लोकांच्या मनांतून फारच उतरला.

त्याची राज्य चालविण्याची रीति.

३. त्यानें आपल्या बापाच्या वेळच्या शहाण्या प्रधानांचा धिक्कार करून कलुशा नांवाचा एक कनोजी ब्राह्मण होता त्याजकडे सर्व राज्याचा कारभार सांगितला. तो ब्राह्मण राज्यकारभाराला योग्य नसतांही संभाजीनें त्याचें

माहात्म्य इतकें वाढविलें कीं, त्याच्याशिवाय तो कोणा- चेंच ऐकेनासा झाला; आणि स्वतां यथेच्छ वागूं लागला.

त्याच्या वाईट वागणुकीचा परिणाम. इ० स० १६८९.

४. संभाजीच्या अशा दुराचरणामुळें त्याच्या बापाच्या वेळचा जो बंदोबस्त होता तो अगदीं नाहींसा होऊन, राज्यांत फार अव्यवस्था सुरू झाली. ह्याखेरीज त्याच वेळेस ह्मणजे इ० स० १६८३ ह्या वर्षी अवरंगजेब बादशाह मोठी फौज घेऊन दक्षिण-देश घ्यावयाकरितां आला, आणि त्यानें इ० स० १६८९ ह्या वर्षापर्यंत बराच मुलूख काबीज केला. अशा प्रसंगीं आपल्या राज्याचा बचाव झटून करावा तो न करितां संभाजी दुर्व्यसनांत निमग्न राहिला आणि गैरसावधपणानें वागूं लागला. शेवटीं कोणे एके वेळीं तो संगमेश्वराजवळ निर्भयपणें शिकारीस गेला असतां त्याला व कलुशा ब्राह्मणाला मोंगलांनीं अकस्मात् धरून कैद केलें. तो कैदेंत असतां, तूं मुसलमान होशील तर तुला जीवदान देतों, असा अवरंगजेबानें त्यास निरोप पाठविला; तेव्हां त्यानें संतापून पैगंबराला पुष्कळ शिव्या दिल्या, आणि बादशाहास असा परत निरोप पाठविला कीं, तूं आपली कन्या मला देशील तर मी मुसलमान होतों. ह्या भाषणामुळें बादशाहास फार चीड येऊन त्यानें त्याला व कलुशा ब्राह्मणाला तुळापूर एथें हालहाल करून ठार मारिलें. ह्याप्रमाणें इ० स० १६८९ ह्या वर्षी त्याचा अंत झाला. त्यानें सुमारें ९ वर्षे राज्य केलें. त्याची बायको एसूबाई व पुत्र शिवाजी ह्यांस अवरंगजेबानें धरून आपल्या ताब्यांत ठेविलें.

# राजाराम ह्याचें वर्णन.

इ० स० १६८९ ह्या वर्षापासून इ० स० १७०८ ह्या वर्षापर्यंत.

राजाराम गादी-वर बसतो. इ० स० १६८९.

१. संभाजी मरण पावला त्या वेळीं त्याची बायको एसूबाई व पुत्र शिवाजी (त्यासच पुढें शाहूराजा असें नांव मिळालें) ह्या उभयतांस मोंगलांनीं कैदेंत ठेविलें होतें, ह्मणून संभाजीचा सावत्र भाऊ राजाराम ह्याजकडून राज्यकारभार चालवावा, असें कितीएक मराठे सरदारांनीं ठरविलें आणि त्याला राज्याभिषेक केला.

त्याच्या कारकीर्दींत झालेल्या गोष्टी.

२. राजारामानें सातारा एथें आपली गादी स्थापिली. त्याच्या कारकीर्दींत अष्टप्रधानांमध्यें बरीच बदलाबदल झाली. प्रल्हाद निराजी नांवाचा एक ब्राह्मण होता, त्याच्या अंगीं निस्पृहता व राजकीय कामांत चातुर्य हे गुण लोकोत्तर होते. त्यानें मराठे सरकारचीं फार मोठमोठीं कामें करून बिकट संकटांमध्यें राज्याचा बचाव केला होता; ह्मणून राजारामानें त्याला पंतप्रतिनिधि असा नवाच किताब देऊन तो अष्टप्रधानांपेक्षां वरिष्ठ केला. संताजी घोरपडे सेनापति ह्यानेंही पुष्कळ पराक्रमाचीं कृत्यें केलीं, त्यांबद्दल त्याचा सन्मान करण्याकरितां राजारामानें एक नवें निशाण करून त्याच्या स्वाधीन केलें. त्या निशाणाचें नांव जरीपटका असें ठेविलें होतें. तें मराठ्यांचें निशाण पिंवळ्या फडक्याचें होतें. त्यासच भगवा झेंडा असें ह्मणत.

मराठे लोकांचा उत्कर्ष.

३. संभाजीच्या कारकीर्दीत व तो मेल्यानंतर कांहीं दिवस राज्यामध्यें फारच बखेडा झाला होता. परंतु अशा प्रसंगीं धनाजी जाधव, खंडेराव दाभाडे, व दुसरे कितीएक महाप्रतापी सरदार उदयास येऊन त्यांनीं जो पराक्रम केला, व प्रल्हाद निराजी ह्यानें राज्यव्यवस्थेसाठीं जे शहाणपणाचे उपाय योजिले, त्यांच्या योगानें तो सारा बखेडा मोडला; इतकेंच नाहीं, तर अवरंगजेब आपल्या मोठ्या फौजेसहित स्वतः मराठ्यांशीं लढत असतांही त्या सरदारांनीं त्याला कितीएक प्रसंगीं फार जेरीस आणून मोंगल लोक अगदीं बलहीन करून सोडिले. त्यामुळें तर मराठे लोकांचा फारच उत्कर्ष झाला.

राजारामाचा मृत्यु (इ० स० १७००), व स्वभाव.

४. राजाराम अकरा वर्षे राज्य करून इ० स० १७०० ह्या वर्षी सिंहगडावर मृत्यु पावला. तो कांहींसा शूर होता; परंतु त्याच्या अंगीं राज्यकारभाराचें चातुर्य नव्हतें. त्याच्या गुणांमध्यें दया आणि दातृत्व हे दोन गुण मुख्य होते. त्याला दोन बायका होत्या; पहिली ताराबाई आणि दुसरी राजसबाई. त्यांपैकीं ताराबाइच्या पोटीं त्यास शिवाजी नामें पुत्र झाला होता.

राजारामाची बायको ताराबाई आणि पुत्र शिवाजी ह्यांची हकीकत

५. राजारामाच्या मरणानंतर ताराबाइ हिनें शिवाजी ह्यास राज्यावर बसवून त्याच्या नांवानें राज्यकारभार चालविला. त्या वेळेस त्याचें वय १० वर्षांचें होतें.

६. राजाराम मृत्यु पावतांच, अवरंगजेबास वाटलें

कीं, आतां मराठे लोकांत पुनः धामधुमी चालू होतील, ह्मणून त्यांस जिंकण्यास आपणास कठीण पडणार नाहीं. अशा समजुतीनें त्यानें मराठ्यांचें राज्य अगदीं बुडवून टाकण्याचा यत्न सुरू केला; परंतु तो सिद्धीस न जातां त्याला परत जावें लागलें. जातांना तो अहमदनगर एथें इ० स० १७०७ ह्या वर्षी फेब्रुवारी महिन्याच्या २१ व्या तारखेस मृत्यु पावला.

अवरंगजेबाचा मृत्यु. इ०स० १७०७.

---

# शाहूराजा ह्याचें वर्णन.

## इ०स० १७०८ ह्या वर्षापासून इ०स० १७४९ ह्या वर्षापर्यंत.

१. संभाजीची बायको एसूबाई व तिचा पुत्र शिवाजी ह्यांस अवरंगजेबानें कैदेंत ठेविलें होतें, असें पूर्वी सांगितलें. परंतु त्यानें त्या उभयतांस कोणत्याही प्रकारें जाच न करितां उलटें त्यांस आपल्या कुटुंबांतील माणसांप्रमाणें वागविलें. अवरंगजेबाची कन्या तर ह्या मायलेकांवर फारच प्रीति करीत असे. शिवाजीला कैदेंतून मुक्त करावें असा विचार करून अवरंगजेबानें आपल्या पदरचे मोठे मराठे सरदार—एक शिंदकेरचा जाधवराव व दुसरा कन्हेरखेडचा पाटील शिंदे[1]—ह्या दोघांच्या कन्यांशीं त्याचीं लग्नें केलीं, आणि त्याला कांहीं प्रांतांची जाहगीरही करून दिली. पुढें हा राज्यावर बसल्यावर ह्यानें आणखी दोन बायका केल्या. एक

शाहूराजाची कैदेंतील हकीकत व त्यास शाहू हें नांव पडण्याचें कारण.

---

१ ह्याच्यान वंशांतील पुरुष पुढें ग्वाल्हेरचे अधिपति झाले.

शिरक्यांची कन्या, व दुसरी मोहित्यांची. हा शिवाजी कैदेंत असतां, त्याच्या आजाच्या लुटारूपणामुळें आपलें जें नुकसान झालें होतें, त्याचें अवरंगजेबाला स्मरण झालें ह्मणजे तो त्या शिवाजीला 'शिवाजी लुटारू' आणि ह्याला 'शिवाजी साव' असें विनोदानें ह्मणे. ह्यावरून त्याचें नांव शाहू पडलें. अवरंगजेब मृत्यु पावल्यानंतर त्याचा पुत्र आजिमशाह ह्यानें शाहूला कैदेंतून सोडून दक्षिणेंत आपल्या राज्यावर जावयास आज्ञा दिली. त्यापूर्वी तो एकंदर सत्रा वर्षें कैदेंत होता.

शाहूस राज्याची प्राप्ति (मार्च इ० स० १७०८) व कोल्हापूरच्या राज्याची स्थापना (इ० स० १७०९).

२. सुटका होतांच शाहूराजा दक्षिणेंत येऊन पोहोंचला आणि ताराबाईपाशीं आपलें राज्य मागूं लागला. परंतु तिच्या मनांत तें त्याला द्यावयाचें नव्हतें, ह्मणून हा शाहू नव्हे, कोणी तोतया[१] आहे, असें ती ह्मणूं लागली. तेव्हां शाहूनें कांहीं मराठे सरदार वश करून घेऊन ताराबाईशीं युद्ध केलें, आणि तिचा पराभव करून चंदन वंदन किल्ले हस्तगत करून घेतले व साताऱ्याची गादी मिळविली. त्या वेळेस त्याचें वय २४ वर्षांचें होतें. पुढें ताराबाई आणि तिचा पुत्र शिवाजी ह्यांनीं कांहीं काळपर्यंत राज्यप्राप्तीकरितां उद्योग केला, परंतु तो सिद्धीस गेला नाहीं. शेवटीं त्या दोघांनीं, कोल्हापुराजवळ जो पन्हाळा-किल्ला आहे, तो हस्तगत करून घेऊन कोल्हापुरास एका नवीन स्वतंत्र राज्याची

१ अमुक मनुष्य तो मीच असें खोटेंच प्रसिद्ध करून राज्यादिकांस हक्क मागणाऱ्या माणसास 'तोतया' ह्मणतात.

स्थापना केली. कोल्हापुरास हल्लीं जो राजा आहे तो त्यांच्याच वंशजांपैकीं आहे.

अक्कलकोटच्या राजांचा मूळपुरुष.

३. शाहूराजा कैदेंतून सुटून सैन्यासहित ताराबाईशीं युद्ध करावयाकरितां मराठी राज्यांतून जात असतां, ताराबाईच्या पक्षाचे जे गांव होते त्यांपैकीं एका गांवच्या लोकांनीं त्याच्या सैन्यावर एकाएकीं हल्ला केला. तेव्हां शाहूनें लढून तो गांव घेतला. ह्या युद्धाच्या गर्दीत त्याच गांवची कोणीएक बायको आपला मुलगा शाहूच्या पायांवर टाकून ह्मणाली कीं, "हा मुलगा मीं तुमच्या सेवेस अर्पिला आहे." तेव्हां शाहूनें तो मुलगा ठेवून घेतला; आणि ह्या गांवीं आपला पहिल्यानें जय (फत्ते) झाला, हा उत्तम शकुन झाला, असें समजून त्यानें त्या मुलाचें नांव फत्तेसिंग भोंसले असें ठेविलें; तोच पुढें शाहूनें अक्कलकोटचा राजा केला. तो फत्तेसिंग हल्लींच्या अक्कलकोटच्या राजाचा मूळपुरुष होय. त्याचें मूळचें उपनाम लोखंडे असें होतें.

शाहूची राज्यव्यवस्था.

४. शाहूराजा राज्य करूं लागला, तेव्हां त्यानें पंतप्रतिनिधीचें काम गदाधर प्रल्हाद ह्याजकडे दिलें, व धनाजी जाधव ह्याजकडे सेनापतीचें व वसुलाचें अशीं कामें होतीं तीं त्याजकडेच कायम ठेविलीं. ह्या वेळीं मराठी राज्यांत फार अव्यवस्था असून वसूल घेण्याविषयीं कांहींच नियम नव्हता. धनाजी जाधव ह्यानें काम करण्याकरितां आबाजी पुरंदरे–सासवडचा कुळकरणी (हाच हल्लींच्या पुरंदऱ्यांचा मूळपुरुष,)–आणि बाळाजी विश्वनाथ भट, श्रीवर्धनचा कुळकरणी, असे दोन कारकून ठेविले

होते. हे दोघे पुढें फार प्रसिद्धीस आले. धनाजी जाधव वारल्यानंतर बाळाजी विश्वनाथ ह्यास त्याचें काम मिळालें व शाहूच्या दरबारांत राज्यप्रकरणीं मुख्यत्वें मसलत ह्याचीच घेऊं लागले. पेशवाईचें काम शिवाजीच्या वेळेपासून पिंगळे ह्यांच्या कुळाकडे होतें व त्या कुळांतला बहिरोपंत नांवाचा पुरुष हल्लीं पेशवा होता, त्याजकडून तें काम काढून शाहूनें बाळाजी विश्वनाथ ह्यास दिलें; आणि आबाजी पुरंदरे हा त्याचा मुतालीक* केला. बाळाजी विश्वनाथ हा पेशवाईचें काम करूं लागल्यापासून त्याच्या चातुर्यामुळें मराठे लोकांची सत्ता अधिकाधिक वाढत चालली.

शाहूचा मृत्यु. इ० स० १७४९.

५. शाहूराजा कैदेंतून सुटल्यानंतर ४२ वर्षें राज्य करून इ० स० १७४९ ह्या वर्षी मृत्यु पावला. त्या वेळीं त्याचें वय ६६ वर्षांचें होतें. त्यास संतान नव्हतें. त्यानें आपल्या अंतकाळीं बाळाजी बाजीराव पेशवा ह्यास अशी सनद करून दिली कीं, माझ्या पाठीमागें ताराबाईचा नातू रामराजा हा दत्तक घेऊन गादीवर बसवावा; आणि शिवाजी राजाच्या वंशजांचा सन्मान मात्र राखून तुह्मीं संपूर्ण राज्याचा अधिकार चालवावा.

त्याचा स्वभाव.

६. शाहूराजा लहानपणीं अवरंगजेबापाशीं कैदेंत असतां त्याचा काळ फारच ऐषआरामांत गेला होता. त्यामुळें मोठेपणींही

*अष्टप्रधानांपैकीं प्रत्येकाच्या हाताखालीं एक एक मुख्य कारभारी असे त्याला मुतालीक म्हणत. त्याला सरकारी कागदपत्रांवर धन्याच्या नांवाचा शिक्का करण्याचाही अधिकार असे.

तो राज्यावर बसला तेव्हां आपल्या राज्याचा सर्व कारभार प्रधानांवर सोंपवून आपण स्वच्छंदानें विलासांत काळ घालवूं लागला. त्याच्यामध्यें धार्मिकपणा हा एक विशेष गुण होता.

---

## रामराजा, दुसरा शाहू राजा, प्रतापसिंह राजा आणि शाहाजी राजा ह्यांचें वर्णन.

### इ० स० १७४९ ह्या वर्षापासून इ० स० १८४८ ह्या वर्षापर्यंत.

रामराजा. इ० स० १,७४९ पासून इ० स० १,७७७ पर्यंत.

१. शाहूराजा मरण पावल्यानंतर त्याच्या आज्ञेप्रमाणें पेशव्यांनीं रामराजाला गादीवर बसविलें, परंतु तो व त्याच्यामागून जे जे साताऱ्याच्या गादीवर बसले ते सारे नांवाचे मात्र राजे असत. पेशवे हे राजाप्रमाणें स्वतंत्रपणें सर्व राज्याचा कारभार करीत. रामराजा इ० स० १७७७ ह्या वर्षी मृत्यु पावला.

दुसरा शाहूराजा. इ० स० १,७७७ पासून इ० स० १,८०८ पर्यंत.

२. रामराजा निपुत्रिक होता; ह्मणून त्यानें आपल्या मरणापूर्वी शिवाजीचा चुलत आजा विठोजी ह्याच्या वंशांतील वावीकर पाटील त्रिंबकजी राजा भोंसले ह्याचा मुलगा दत्तक घेतला होता; तोच पुढें साताऱ्याच्या गादीवर बसला; त्याला शाहूमहाराज असें ह्मणत. तोही रामराजाप्रमाणेंच मरेपर्यंत परतंत्रपणांत काळ घालवून इ० स० १८०८ ह्या वर्षी मृत्यु पावला.

प्रतापसिंह. इ० स० १८०८ पासून इ० स० १८३९ पर्यंत.

३. शाहूमहाराज मेल्यानंतर त्याचा वडील पुत्र प्रतापसिंह हा साताऱ्च्या गादीवर बसला. तोही सुमारें १० वर्षेंपर्यंत साताऱ्च्या किल्ल्यांत पेशव्याच्या कैदेंत होता. पुढें इ० स० १८१८ ह्या वर्षीं इंग्रज लोकांनीं पेशव्यांचें राज्य घेतलें. त्या वेळीं शिवाजीच्या राज्यांतील कांहीं भाग ह्मणजे पूर्व-पश्चिम पंढरपुरापासून सह्याद्रीपर्यंत, आणि दक्षिणोत्तर वारणा-नदीपासून निरा-नदीपर्यंत मुलूख—त्यांनीं प्रतापसिंहाकडे ठेविला होता. परंतु इ० स० १८३९ ह्या वर्षीं त्यावर फितुराचा दोष शाबीत झाल्यामुळें त्यास इंग्रज सरकारानें राज्यावरून काढिलें.

शाहाजी. इ० स० १८३९ पासून इ० स० १८४८ पर्यंत.

४. प्रतापसिंहाच्यामागें त्याचा धाकटा भाऊ शाहाजी ह्यास इंग्रजांनीं साताऱ्च्या गादीवर बसविलें. तो इ० स० १८४८ ह्या वर्षीं मृत्यु पावला. त्याला संतान नव्हतें, व त्याच्या वंशांत दुसरा कोणीही राज्याचा अधिकारी नव्हता; ह्मणून तें राज्य इंग्रज सरकारानें खालसा केलें. ह्याप्रमाणें मराठी राज्याचा शेवट झाला.

मराठी ग्रंथ संग्रहालय,
ठाणे.

# प्रकरण दुसरें.

## पेशव्यांचें वर्णन.

# बाळाजी विश्वनाथ ह्याचें वर्णन.

### इ० स० १७१४ ह्या वर्षापासून इ० स० १७२० ह्या वर्षापर्यंत.

पेशव्यांचें मूळस्थान व त्यांस पेशवाईचा अधिकार (इ० स० १७१४) मिळाला त्याचीं कारणें.

१. बाळाजी विश्वनाथ हा पहिल्यानें, कोंकणामध्यें हप्साणांत श्रीवर्धन ह्मणून गांव आहे, तेथील कुळकरणी होता. शाहूराजाच्या कारकीर्दींत मराठी राज्याच्या वसुलाचें काम करणारा सेनापति धनाजी जाधव ह्यानें त्याला वसुलाच्या कामावर कारकून नेमिलें होतें. पुढें कांहीं दिवसांनीं धनाजी जाधव मृत्यु पावला. तेव्हां त्याचें काम बाळाजी विश्वनाथच पाहूं लागला. त्या कामांत त्याच्या अंगची विलक्षण अक्कल व पोंच शाहूराजाच्या नजरेस आल्यावरून त्याचें त्यावर प्रेम जडत चाललें. पुढें कृष्णराव खटावकर नांवाचा, मोंगलांच्या आश्रयानें वाढलेला कोणी ब्राह्मण शाहूच्या राज्यांत उपद्रव करूं लागला; सबब त्याच्या पारिपत्याकरितां शाहूनें बाळाजी विश्वनाथास सैन्यासुद्धां पाठविलें. तेव्हां त्यानें *कृष्णरावाचा अगदीं

* हा शाहूला शरण आल्यावरून त्यानें त्याला सातार-प्रांतांतील खटाव हा गांव इनाम दिला. त्याचा कांहीं भाग अद्यापि त्याच्या वंशाकडे चालत आहे.

मोड केला. ह्याच संधीस कोंकणामध्यें कान्होजी आंग्रे हा शाहूच्या मुलखावर स्वाऱ्या करीत होता; त्यावर शाहूनें आपला पेशवा बहिरोपंत पिंगळा ह्यास पाठविलें होतें. परंतु आंग्रे ह्यानें त्याचा पराभव करून त्यास कैद केलें; सबब आंग्रे ह्यांचा बंदोबस्त करून बहिरोपंताची सुटका करण्याकरितां शाहूनें बाळाजी विश्वनाथ ह्यास फौजेसुद्धां पाठविलें. तेव्हां बाळाजीनें आपल्या अकलेच्या बळानें शाहूराजाच्या इच्छेप्रमाणें तें काम शेवटास नेलें. त्या योगानें बाळाजी साताऱ्यास परत आल्यावर, शाहू फार संतुष्ट होऊन त्यानें त्याचा मोठा सन्मान केला, आणि बहिरोपंत पिंगळे ह्याजकडून पेशवाईचा अधिकार काढून तो इ० स० १७१४ ह्या वर्षी बाळाजी विश्वनाथास दिला, व रामचंद्रपंत भानू ह्यास त्याचा फडनवीस केलें. नानाफडनवीस ह्मणून जो पेशव्याचा मुत्सद्दी पुढें प्रसिद्धीस आला, तो रामचंद्रपंताच्याच वंशांतील होता.

बाळाजी विश्वनाथाच्या कारकीर्दींत मराठ्यांनीं नवीन मिळविलेला मुलूख.

२. बाळाजी विश्वनाथ पेशवाईचें काम चालवीत असतां, दिल्लीमध्यें असें झालें कीं, अबदुलखान सय्यद व हुसेनखान सय्यद ह्मणून दोघे बंधु मुसलमान सरदार होते, ते व दिल्लीचा बादशाह फरुक्शेर ह्यांच्यामध्यें बेबनाव झाल्यामुळें त्या सरदारांनीं बादशाहाशीं लढण्याकरितां मराठ्यांपाशीं मदत मागितली; आणि तीबद्दल मराठ्यांस दक्षिणेंतील चौथाई, सरदेशमुखी, शिवाजीनें पूर्वी मिळविलेला दक्षिणेंतील सारा मुलूख व आणखी कांहीं प्रांत, इतकें देण्याचें कबूल केलें. ह्मणून शा-

हूच्या आज्ञेनें बाळाजी फौज घेऊन सय्यदांस मिळाला. तेव्हां त्या सय्यदांनीं फेरुक्शेर बादशाहास ठार मारिलें; आणि त्याच्या कुळांतील वाटेल त्यास तक्तावर बसवून ते स्वतः साऱ्या राज्याचा कारभार पाहूं लागले. नंतर बाळाजी विश्वनाथ ह्यानें त्यांजपासून फौजेचा खर्च घेतला, व पूर्वीं कबूल केलेले हक्क आणि मुलूख हे मराठ्यांस दिल्याबद्दल सनदाही त्यांजपासून घेतल्या. इतकें करून तो दक्षिणेंत परत आला.

बाळाजी विश्वनाथाच्या कारकीर्दींत दक्षिणेंत स्वतंत्र राज्याची स्थापना.

३. बाळाजी विश्वनाथाच्या कारकीर्दींत निजामउल्मुल्क नामें सरदार दिल्लीच्या बादशाहाच्या ताब्यांतील गुजराथ व माळवा ह्या प्रांतांचा मुख्य अधिकारी होता. त्यानें त्या सय्यद बंधूंचीं, माळव्यामध्यें एक व अवरंगाबादेस एक अशीं दोन लष्करें होतीं, तीं जिंकून दक्षिण-देश बळकाविला. तेव्हां त्या दोघां बंधूंपैकीं धाकटा त्याच्या पारिपत्याकरितां येत असतां वाटेंत त्याला निजामउल्मुल्काच्या मित्रांनीं मारेकरी घालून ठार मारिलें; व थोरलाही त्यांनीं दिल्लीच्या बादशाहाकडून लढाईंत धरविला; तेव्हां निजामउल्मुल्कास दिल्लीच्या बादशाहाची वजिरी मिळाली. परंतु पुढें बादशाहाशीं त्याचा बेबनाव झाल्यामुळें तो तें काम सोडून दक्षिणेंत आला; आणि तेथें स्वतंत्रपणें वागूं लागला. हा निजामउल्मुल्क हैदराबाद एथील हल्लींच्या निजामशाही घराण्याचा मूळपुरुष होय. हा व ह्याच्यामागून जे पुरुष हैदराबादच्या गादीवर बसत आले आहेत, त्यांस इंग्रज लोक निजाम व मराठे लोक नवाब असें ह्मणतात.

४. बाळाजी विश्वनाथ दिल्लीहून परत आल्यावर थोडक्याच महिन्यांनीं सासवड एथें इ० स० १७२० ह्या वर्षी मृत्यु पावला. त्यानें सहा वर्षें पेशवाईचें काम केलें. त्याला दोन मुलगे होते. वडिलाचें नांव बाजीराव आणि धाकट्याचें नांव चिमणाजीआपा. बाळाजी विश्वनाथाच्यामागें त्याचा वडील पुत्र बाजीराव ह्यास शाहूराजानें पेशवाईचा अधिकार दिला.

बाळाजी विश्वनाथाचा मृत्यु ( इ० स० १७२० ) व त्याची संतति.

---

# पहिला बाजीराव ह्याचें वर्णन.

## इ० स० १७२० ह्या वर्षापासून इ० स० १७४० ह्या वर्षापर्यंत.

१. बाळाजी विश्वनाथ मरण पावल्यानंतर सुमारें सात महिन्यांनीं ह्मणजे इ० स० १७२१ ह्या वर्षाच्या एप्रिल महिन्याच्या सुमारास त्याचा वडील पुत्र बाजीराव ह्यास पेशवाईचीं वस्त्रें शाहूराजानें दिलीं.

त्याला पेशवाईचीं वस्त्रें मिळतात. इ० स० १७२१.

२. पेशवाईचें काम करूं लागल्यानंतर थोड्याच दिवसांनीं त्यानें लष्करासुद्धां खानदेशांत जाऊन तेथील *मोकासपणाचा वसूल घेतला. इ० स० १७३४ ह्या वर्षी माळव्यांतून बाजीरावाच्या पारिपत्याकरितां कोणी दाउदखान नांवाचा मुसलमान सरदार आला होता, त्याशीं व बऱ्हा-

माळव्यांत त्यानें केलेल्या स्वाऱ्या.

---

* एकंदर वसुलाच्या तीन चतुर्थांशास मोकासा म्हणत असत.

गपूरच्या सुभेदाराशीं युद्ध करून त्यांस त्यानें जिंकिलें. इ० स० १७२६–२७ ह्या वर्षी त्यानें माळव्यांत आणखी दोन स्वाऱ्या करून प्रत्येक वेळीं पुष्कळ द्रव्य लुटून आणिलें.

निजामउल्मुल्कावर पहिली स्वारी. इ० स० १७२८.

३. ह्याप्रमाणें मराठ्यांचें प्राबल्य वाढत चालल्यामुळें हैदराबादच्या निजामउल्मुल्क ह्याच्या मनांत भीति उत्पन्न झाली; तेव्हां मराठ्यांचा नाश करावा ह्या हेतूनें त्यानें शाहू व कोल्हापूरचा राजा संभाजी ह्यांच्यामध्यें तंटा उत्पन्न केला. हा त्याचा कावा बाजीरावास कळल्यावरून त्यानें शाहूच्या परवानगीनें त्यावर इ० स० १७२८ ह्या वर्षी स्वारी केली, व त्याला अगदीं जेर करून सोडिलें; तेव्हां निजामउल्मुल्कानें मराठ्यांशीं तह केला.

त्रिंबकराव दाभाडा ह्याशीं बाजीरावाचें युद्ध. इ० स० १७३१.

४. निजामउल्मुल्कानें मराठ्यांशीं तह केला, तरी त्याच्या मनांत बाजीरावाविषयीं वांकडें राहिलेंच होतें; सबब त्यानें त्याचा सूड उगविण्याची एक युक्ति योजिली. ती अशी कीं, सेनापति त्रिंबकराव दाभाडा ह्याचें आणि बाजीरावाचें पूर्वीपासून वैर होतेंच; हल्लीं बाजीरावाची प्रतिष्ठा फार वाढत चालल्यामुळें तर त्या उभयतांचें वैर ज्यास्ती होऊन बाजीरावाच्या नाशाकरितां दाभाडा गुजराथेंत फौज जमा करूं लागला होता. ही संधी पाहून निजामउल्मुल्कानें त्याला बाजीरावाचा मोड करण्याच्या कामांत भर देण्यासाठीं मदत करण्याचें कबूल केलें. तेव्हां दाभाडा इ० स० १७३१ ह्या वर्षी ३५,००० फौज घेऊन निजामापासून पुढें आपणास मदत मिळेल ह्या भरंवशावर, गुजराथेंतून दक्षिणेंत यावयास निघाला. हें वर्तमान

बाजीरावास समजतांच तोही पुण्याहून फौज घेऊन निघाला. नंतर त्या उभयतांची गांठ बडोदें आणि डभाई ह्यांच्यामध्यें पडून मोठी लढाई झाली; तींत बाजीरावाची फौज थोडी असतांही त्रिंबकराव युद्धाच्या गर्दींत गोळी लागून पडल्यामुळें बाजीरावाला जय मिळाला. ह्या लढाईमध्यें निजामानें दाभाड्याला मदत करण्याचें कबूल केलें होतें, असें बाजीरावाला कळून त्याचेंही पारिपत्य करण्यास तो उद्युक्त झाला. हें निजामास कळतांच तो फार भ्याला; परंतु त्यानें मोठ्या चातुर्यानें त्याचें मन दिल्लीचे मोंगल जिंकण्याकडे वळविलें; आणि इतःपर मी तुमच्या वाटेस जावयाचा नाहीं असें कबूल करून त्यानें बाजीरावाच्या मनांतला आपणावरचा राग दूर केला.

त्याची बुंदेलखंडांत स्वारी. इ० स० १७३३

५. इ० स० १७३३ ह्या वर्षी बुंदेलखंडाचा राजा चतुरसाल ह्यावर माळव्यांतील मोंगलांचा अधिकारी महंमदखानबंगष ह्यानें स्वारी केली. तेव्हां चतुरसालानें आपल्या रक्षणासाठीं बाजीरावाची मदत मागितली. त्या वेळीं त्यानें तेथें जाऊन मोंगलांचा पराभव केला; आणि त्यांस बुंदेलखंडांतून हांकून लाविलें. तेव्हां चतुरसालानें त्याला झांशीजवळ सवादोन लक्षांचा मुलूख जहागीर दिला, व पुढें त्यानें मरते समयीं आपल्या राज्याचा तिसरा हिस्सा बाजीरावास दिला.

त्याची जंजिऱ्याच्या शिदीवर स्वारी. इ० स० १७३५.

६. इ० स० १७३५ ह्या वर्षी जंजिऱ्याचा मुख्य अधिकारी शिदी याकुट ह्मणून होता, तो मरून त्याच्या मुलांमध्यें तेथल्या गादीविषयीं तंटा लागला. तेव्हां त्या शि-

द्दीचा एक विश्वासू सरदार याकूबखान नांवाचा होता, त्यानें त्याच्या मुलांपैकीं, शिद्दी रहिमान ह्याचा पक्ष धरून त्याला गादीवर बसविण्याकरितां शाहूपाशीं साहाय्य मागितलें. त्या वेळीं शाहूनें बाजीरावास तिकडे जाण्यास हुकूम दिला. तेव्हां बाजीरावानें जंजिऱ्यास जाऊन शिद्दीचा जो मुलगा त्याशीं लढावयास आला, त्याचा अगदीं मोड करून त्याला ठार मारिलें, आणि रहिमान ह्यास तेथील गादीवर बसविलें. ह्याबद्दल रहिमान ह्यानें मराठ्यांस आपल्या संस्थानापैकीं अकरा महालांचें अर्धें उत्पन्न देऊन, रायगड, तळें, घोसाळें, उचितगड, आणि विरवाडी हे किल्ले दिले. ह्यांचा सर्व अधिकार शाहूनें बाजीरावासदिला.

त्याची दिल्लीवर स्वारी. इ० स० १७३६.

७. इ० स० १७३६ ह्या वर्षीं तो जंजिऱ्याहून परत आल्यावर दिल्लीच्या बादशाहापाशीं आपल्या पराक्रमाच्या जोरावर मुलूख व पैसा मनस्वी मागूं लागला, तेव्हां बादशाहाला राग येऊन त्यानें बाजीरावाचें पारिपत्य करण्याचा बेत केला. हें बाजीरावास समजतांच तो मोठा पराक्रम करून फौजेसहित थेट दिल्लीच्या दरवाज्यापर्यंत गेला आणि तेथें मोंगलांचा पराभव केल्यानंतर बहुतेक आपल्या इच्छेप्रमाणें तह करून घेऊन त्यानें त्याशीं सल्ला केला. ह्यापूर्वीं त्यानें गुजराथ आणि माळवा ह्या दोन प्रांतांची चौथाई व सरदेशमुखी हे हक्कही बादशाहापासून मिळविले होते.

पोर्तुगीज लोकांशीं मराठ्यांनीं केलेल्या लढाया.

८. इ० स० १७३७ ह्या वर्षीं कोंकणांत पोर्तुगीज लोक आणि मानाजी आंग्रे ह्यांच्यामध्यें कांहीं तंटा उपस्थित झाल्यावरून ते लोक आंग्रे ह्यावर हल्ला करण्याची

तयारी करूं लागले. तेव्हां हे परके लोक आपला स्नेही अंग्रे ह्याचा नाश करितात, असें पाहून शाहूनें बाजीरावास त्या लोकांच्या पारिपत्याकरितां पाठविलें. त्यानें कोंकणांत जाऊन पोर्तुगीज लोकांचा पुष्कळ ठिकाणीं पराभव केला, व त्यांचे साष्टी वगैरे पुष्कळ किल्ले घेतले. इ० स० १६६१ ह्या वर्षी जेव्हां पोर्तुगीज लोकांनीं मुंबई-बेट इंग्रजांस दिलें, तेव्हां साष्टी-बेट हें मुंबई-बेटाखालचेंच असें समजून इंग्रजांनीं तेंही पोर्तुगीज लोकांपाशीं मागितलें; परंतु ते ह्मणाले कीं, साष्टी-बेटाचा मुंबई-बेटाशीं कांहीं संबंध नाहीं; सबब तें आह्मी देणार नाहीं. ह्यामुळें त्या वेळेस तें इंग्रजांस मिळालें नाहीं. परंतु तें घेण्याचा त्यांचा फार इरादा होता. पुढें वर सांगितल्याप्रमाणें मराठ्यांनीं तें बेट पोर्तुगीज लोकांपासून घेतलें तेव्हां ती गोष्ट इंग्रजांस फार आवडली, कारण त्यांस असें वाटलें कीं, मराठ्यांपासून तें घेण्यास आपणांस फारसें कठीण पडणार नाहीं. वर लिहिल्याप्रमाणें बाजीराव पोर्तुगीज लोकांस जिंकून त्यांजपासून घेतलेल्या मुलखाचा बंदोबस्त करीत आहे, इतक्यांत त्याला अशी खबर आली कीं, दिल्लीच्या दरबारांत त्याचें पारिपत्य करण्याचा विचार ठरून निजामउल्मुल्काची त्या कामावर नेमणूक झाली, व त्यानें ह्या कामाकरितां मोठें सैन्य जमा केलें. तेव्हां एकदम बाजीराव कोंकणांतील बहुतेक सैन्य घेऊन हिंदुस्तानांत गेला. ह्यामुळें पोर्तुगीज लोकांस पुनः कोंकणांत उपद्रव करावयास फावलें; आणि त्यांनीं मराठ्यांशीं तंटे आरंभिले. शेवटीं ता० १९ फेब्रुवारी इ० स० १७३९ ह्या वर्षी वसईच्या किल्ल्यास चिमणाजीआपानें वेढा घातला. त्या वेळीं

उभय पक्षीं लढण्याच्या कसबाची पराकाष्ठा झाली. अखेरीस पोर्तुगीज लोकांस तो किल्ला सोडून जाणें भाग पडलें. ह्या लढाईंत चिमणाजीआपा ह्यानें वर्णनीय पराक्रम केला, त्यामुळें तेव्हांपासून शूरपणाविषयीं त्याची कीर्ति फार झाली.

बाजीरावाची निजामउल्मुल्कावर दुसरी स्वारी. इ० स० १७३८.

९. इकडे बाजीराव सैन्यासुद्धां हिंदुस्तानांत जाऊन आपलें पारिपत्य करूं इच्छिणारा निजामउल्मुल्क ह्याच्या पाठीस लागला; आणि त्याला मनस्वी जेर करून त्यानें असा तह करून घेतला कीं, सारा माळवा-प्रांत व नर्मदा आणि चंबळा ह्या दोन नद्यांमधील सगळा मुलूख ह्यांचें पूर्ण आधिपत्य व हल्लींच्या स्वारीच्या खर्चाबद्दल पन्नास लाख रुपये इतकें निजामउल्मुल्कानें मराठ्यांस बादशाहाकडून देववावें. ह्याप्रमाणें विजयी होऊन बाजीराव दक्षिणेंत परत आला.

इराणच्या बादशाहाची हिंदुस्तानांत स्वारी इ०स० १७३९.

१०. बाजीराव निजामउल्मुल्काचा भोपाळ एथें पराभव करून परत आल्यावर फार दिवस झाले नाहींत, तोंच इ० स० १७३९ ह्या वर्षीं इराणचा बादशाह नादिरशाह ह्यानें दिल्लीवर स्वारी करून तेथील बादशाहास कैद केलें, व तें शहर लुटून सुमारें सत्तर कोट रुपयांची लूट जमा केली, आणि त्या शहरांतील सुमारें दहा हजार लोक ठार मारिले. तो दक्षिणेंत मराठ्यांवर येणार अशीही वदंता उठलेली बाजीरावाच्या कानावर आली; तेव्हां त्यानें सर्व मराठे जमा करून दिल्लीकडे जाण्याची तयारी केली. इतक्यांत त्याला अशी खबर लागली कीं, नादिरशाह तेथील बादशाहास स्वसंतोषानें पुनः तक्तावर बसवून

आपण इराणास निघून गेला; ह्यामुळें बाजीरावाचा तिकडे जाण्याचा बेत रहित झाला.

बाजीरावाचा मृत्यु (इ० स० १७४०) व त्याची संतति.

११. ह्याप्रमाणें बाजीराव मोठमोठीं पराक्रमाचीं व ख्यातीचीं कृत्यें करून ता० २८ एप्रिल, इ० स० १७४० ह्या वर्षी नर्मदेच्या कांठीं मृत्यु पावला. त्यानें २० वर्षें पेशवाईचें काम केलें. त्याला तीन पुत्र होते. त्यांतून वडील पुत्र बाळाजीपंत, त्यास लोक फार करून नानासाहेब ह्मणत असत. तोच बापाच्यामागें पेशवाईचें काम चालवूं लागला. दुसरा पुत्र रघुनाथराव; आणि तिसरा जनार्दनपंत ह्मणून होता, तो लहान असतांच मरण पावला. त्याला यवनीपासून झालेला समशेर बहादर नांवाचा आणखी एक मुलगा होता.

त्याचे गुण

१२. बाजीराव मोठा शूर असून राज्यकारभारामध्येंही अत्यंत निपुण होता. त्यानें एकादें काम एकदां शिरावर घेतलें ह्मणजे कितीही प्रयास पडले तरी तें शेवटास नेण्याविषयीं तो झटत असे. ह्या त्याच्या गुणांवरून शाहूराजानें राज्याचा सारा कारभार त्याजकडे दिला होता. त्याचा धाकटा भाऊ चिमणाजीआपा हाही त्याजप्रमाणेंच शहाणा व शूर असून लढायांच्या वगैरे कामांत फार उपयोगी पडत असे.

बाजीरावाच्या कारकीर्दीत प्रसिद्धीस आलेले सांप्रतचे मराठे सरदार.

१३. सांप्रतकाळीं हिंदुस्तानांत जे प्रसिद्ध मराठे सरदार आहेत त्यांपैकीं होळकर, शिंदे व गायकवाड, हे तिघे बाजीरावाच्या कारकीर्दीत नांवारूपास आले. मल्हारजी होळकर हा निरा-नदीच्या कांठीं

होळ ह्मणून खेडें आहे, तेथचा चौगुला*असून बाजीरावा-पाशीं †शिलेदारीचें काम करीत असे. बाजीरावानें माळ-व्यांत पहिली स्वारी केली, त्या वेळीं मल्हारजीनें आपला पराक्रम गाजविला, तेणेंकरून तो पुढें उदयास आला. ह्याच स्वारींत प्रसिद्धीस आलेला दुसरा मनुष्य राणोजी शिंदा. ह्याचे पूर्वज फार दिवसांपासून मोंगलांच्या पदरीं सरदार होते; व त्यांपैकींच कोणा एकाची कन्या पाहून अवरंगजेबानें शाहूराजाचें लग्न केलें होतें. हे शिंदे मूळचे साताऱ्याजवळ एक कन्हेरखेड ह्मणून गांव आहे तेथील पाटील होते. राणोजी शिंदा ह्यांनींही मोंगलांच्या दरबा-रांत मोठी अबरू मिळविली होती. परंतु दैवयोगानें त्यास गरिबी आल्यामुळें त्यानें बाळाजी विश्वनाथाजवळ ‡बारगिरीचें काम पतकरिलें होतें. पुढें कांहीं दिवसप-र्यंत तो बाजीरावाजवळ हुजऱ्या होता. तेव्हां त्याचे उत्तम गुण पाहून बाजीरावानें त्याला मोठ्या योग्यतेस चढविलें. बडोद्याच्या गायकवाडांचा मूळपुरुष दमाजी, हा सेनापति खंडेराव दाभाडे ह्याच्या हाताखालीं एक हलक्या प्रतीचा सरदार होता. त्याचें शौर्य पाहून शाहूराजानें त्याला मोठा अधिकार देऊन समशेर बहा-दर हा किताब दिला. ह्याप्रमाणें तो योग्यतेस चढला. वर सांगितलेल्या सरदारांखेरीज नागपूरच्या भोंसल्यां-

*गांवच्या पाटलाच्या हाताखालीं एक दुय्यम असतो त्याला चौगुला म्हणत.

† आपल्या खर्चानें घोडा बाळगून सरकारी फौजेंत स्वाराची चाकरी करणारास शिलेदार ह्मणत.

‡ फौजेंतील ज्या स्वारांस सरकारांतून घोडे मिळत, त्यांस बारगीर ह्मणत.

च्या पूर्वजांपैकीं परसोजी भोंसला ह्मणून कोणी पुरुष बाजीरावाच्या वेळीं कांहींसा प्रसिद्धीस आला होता. पुढें त्याच्या वंशांतील रघोजी भोंसला ह्मणून एक पुरुष शिकारीच्या कामांत हुशार व धीट होता; ह्यामुळें शाहूची त्यावर मर्जी बसून त्यानें आपली मेहुणी शिरक्यांची कन्या त्यास देवविली आणि त्याला सेनासाहेबसुभा हा किताब देऊन वऱ्हाड-प्रांताची सुभेदारी सांगितली. ह्यांचे वंशज नागपूरचे राजे आणि शिवाजीचे वंशज सातारचे राजे, ह्या दोन्ही वंशांचें उपनांव एकच आहे खरें, तरी त्यांचा परस्परांशीं कांहींएक संबंध नाहीं.

---

# बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशवा ह्याचें वर्णन.

## इसवी सन १७४० ह्या वर्षापासून इ० स० १७६१ ह्या वर्षापर्यंत.

त्याला पेशवाईचीं वस्त्रें मिळतात (इ० स० १७४०) व तो आणि रघोजी भोंसला ह्यांच्यामध्यें उत्पन्न झालेला कलह शाहूराजा मिटवितो.

१. पहिला बाजीराव मरण पावल्यानंतर रघोजी भोंसला ह्यानें, बाबूजी नाईक बारामतीकर नांवाचा कोणी फार संपन्न मुत्सद्दी होता, त्याला पेशवाईचा अधिकार मिळवून देण्याची पुष्कळ खटपट केली. परंतु ती सिद्धीस न जातां नानासाहेबालाच तो अधिकार मिळाला. हें रघोजीस आवडलें नाहीं, तशांत तो फार फौजबंदही होता, त्यामुळें त्यानें नानासाहेबाशीं उघडपणें वैर मांडिलें. हें नानासाहेबास समजल्यावर, जेव्हां रघो-

जीनें बंगाल-प्रांतावर स्वारी केली, तेव्हां त्यानें दिल्लीचा बादशाह महंमदशाह ह्याचा पक्ष धरून रघोजीचा लढाईंत पराभव केला. त्यामुळें तर उभयतांच्या मनांतील द्वेष वाढतच चालला; असें पाहून शाहूराजानें मध्यस्थी केली, आणि कांहीं ठराव करून दोघांचा तंटा मिटविला. तो ठराव असा कीं, बंगाल, बहार व अयोध्या ह्या तीन प्रांतांत जे मराठ्यांचे हक्क होते ते रघोजीनें घ्यावे; आणि माळवा-प्रांत व हिंदुस्तानच्या पश्चिमभागचे जे प्रांत त्यांतील मराठ्यांचे सारे हक्क पेशवे ह्यांनीं घ्यावे.

राज्याची व्यवस्था.

२. नानासाहेबानें आपला धाकटा भाऊ रघुनाथराव ह्याजकडे सर्व फौजेचें काम सांगून आपला चुलतभाऊ सदाशिवराव भाऊ ह्याजवर सर्व राजकीय काम सोंपविलें होतें. हा सदाशिवराव भाऊ त्याचा बाप चिमणाजीआपा ह्याप्रमाणें शूर असून शहाणा होता. ह्याला लोक भाऊसाहेब ह्मणत. ह्या भाऊसाहेबानें मुलखाचा बंदोबस्त करण्याकरितां, रामचंद्र बाबा ह्मणून एक शेणवाई होता, तो आपल्या मदतीस घेतला होता. तो शेणवाई व भाऊसाहेब ह्या उभयतांनीं शिवाजीच्या वेळेपासून राज्यांत जी अव्यवस्था झाली होती, ती मोडून टाकून नवीन उत्तम नियम ठरविले, तेणेंकरून प्रजेस पुष्कळ प्रकारें सुख होऊं लागलें.

अहमदशाह अवदाली ह्याची हिंदुस्तानांत दिल्लीवर स्वारी. इ० स० १७४८.

३. नानासाहेबाच्या कारकीर्दींत अहमदशाह अवदाली ह्मणून अफगाण लोकांचा बादशाह त्या वेळीं काबूल व पश्चिम इराण ह्या देशांचें राज्य करीत होता, त्यानें इ० स० १७४८ ह्या वर्षी हिंदु-

स्तानांत स्वारी केली, व पंजाब-प्रांत आपले हस्तगत करून दिल्लीपर्यंत चाल केली. तेव्हां दिल्लीच्या बादशाहानें आपला मुलगा अमेदशाह याजबरोबर फौज देऊन तो त्यावर पाठविला. त्यानें अहमदशाहाला काबुलापर्यंत मागें हटविलें.

निजामउल्मुल्काचा मृत्यु (इ० स० १७४८) व त्याच्या राज्याची व्यवस्था.

४. त्याच वर्षी निजामउल्मुल्क मृत्यु पावला. त्या वेळीं त्याचें वय १०४ वर्षांचें होतें असें ह्मणतात. तो मेल्यानंतर त्याच्या पुत्रांमध्यें त्याच्या गादीविषयीं तंटा लागून हैदराबादच्या राज्यांत सारी अव्यवस्था होऊन गेली. शेवटीं इ० स० १७५१ ह्या वर्षी त्याच्या मुलांपैकीं सलाबत्जंग ह्मणून एक होता, त्याला गादी मिळाली. पुढें त्याचा भाऊ निजामअल्ली ह्यानें इ० स० १७६२ ह्या वर्षी त्याला कैद करून हैदराबादची गादी बळकाविली; सलाबत्जंग जात्या दुर्बल असल्यामुळें त्यापासून ह्याला अपाय होण्याचा संभव नव्हता. असें असतांही निजामअल्लीनें गादी बळकावल्यानंतर सुमारें एका वर्षानें त्यास ठार मारिलें.

पुणें-शहर पेशव्यांची राजधानी होतें. इ० स० १७५०.

५. नानासाहेबाच्या कारकीर्दीपूर्वी साताऱ्च्या राजांचें स्वातंत्र्य कमी झालें नव्हतें. त्यामुळें तोंपर्यंत सातारा हींच मराठी राज्याची राजधानी होती. परंतु इ० स० १७४९ ह्या वर्षी शाहूराजा मरण पावल्यानंतर त्याच्याच सांगण्यावरून नानासाहेबानें कोल्हापूरच्या ताराबाईचा नातू रामराजा ह्यास नांवाचा मात्र राजा करून साताऱ्च्या गादीवर बसविलें; आणि इ० स० १७५० ह्या वर्षी तेथलि

सर्व जहागीरदार वगैरे पुण्यास बोलावून आणून तेथेंच त्यानें राज्याचा सारा कारभार चालविला. तेव्हांपासून पुणें-शहर हेंच मराठी राज्याच्या कारभाराचें मुख्य ठिकाण झालें.

नानासाहेबाची कर्नाटकांत स्वारी. इ० स० १७५३.

६. इ० स० १७५३ ह्या वर्षी नानासाहेबानें कर्नाटकावर स्वतः स्वारी करून तेथची व श्रीरंगपट्टणची खंडणी स्वस्थपणें जमा केली; आणि श्रीरंगपट्टणाजवळचा हुळी नामक किल्ला हस्तगत करून तो परत आला.

रघुनाथरावाची गुजराथेंत व अजमीर-प्रांतांत स्वारी. इ० स० १७५५.

७. कर्नाटकांतून पुण्यास परत आल्यावर नानासाहेबानें रघुनाथराव ह्यास बरोबर सैन्य देऊन गुजराथेंत स्वारी करावयास पाठविलें. त्यानें दमाजी गाईकवाड ह्याच्या मदतीनें इ० स० १७५५ ह्या वर्षी अमदाबादेपर्यंत गुजराथ-प्रांताची खंडणी घेतली. नंतर अमदाबाद-किल्लाही घेण्याविषयीं तो यत्न करूं लागला. तेव्हां मोठी लढाई होऊन शेवटीं किल्लेकऱ्यांनीं आपला निभाव लागत नाहीं असें पाहून तो किल्ला रघुनाथरावाच्या स्वाधीन केला. ह्याप्रमाणें गुजराथेची राजधानी अमदाबाद-शहर हें इ० स० १७५५ ह्या वर्षी एप्रिल महिन्यांत पुरतेपणीं मराठ्यांच्या ताब्यांत आलें. ह्यानंतर रघुनाथराव अजमीर-प्रांतापर्यंत मुलखाची खंडणी घेऊन पुण्यास आला.

आंग्रे ह्यावर स्वारी. इ० स० १७५५.

८. ह्याच सुमारास आंग्रे ह्यानें समुद्रतीरीं फार *चांचेपणा आरंभिल्यामुळें नानासाहेबानें त्याच्या पारिपत्याकरितां लढाऊ गल-

*गलबतें बाळगून समुद्रांत लुटारूपणा करणारांस चांचे लोक म्हणतात, आणि त्यांच्या ह्या धंद्यास चांचेपणा म्हणतात.

वतें तयार करून मुंबईंतील इंग्रज लोकांच्या मदतीनें आंग्रे ह्याचे समुद्रकिनाऱ्यावरचे विजयदुर्ग वगैरे बहुतेक किल्ले इ० स० १७५५ ह्या वर्षीं घेतले; आणि इंग्रजांनीं मदत दिल्याबद्दल त्यांस बाणकोट व त्याच्या भोंवतालचे नऊ गांव दिले.

रघुनाथरावाची पंजाबांत स्वारी. इ० स० १७५८.

९. आंग्रे ह्याचा बंदोबस्त झाल्यावर नानासाहेबानें कर्नाटकांत पुनः एकदोन वेळां सैन्य पाठवून खंडणी जमा केली, आणि रघुनाथरावास आणखी एक वेळ हिंदुस्तानांत स्वारीवर पाठविलें. तो इ० स० १७५८ ह्या वर्षीं पंजाब-प्रांतांत शिरला. अफगाण लोक (ह्यांसच मराठे लोक गिलचे ह्मणतात) ह्यांचा बादशाह अहमदशाह अबदाली ह्यानें इ० स० १७४८ ह्या वर्षीं तो प्रांत घेतला, त्या वेळीं तेथें त्यानें आपला सुभेदार ठेविला होता. त्याला रघुनाथरावानें हांकून देऊन मुलतान व लाहोर एथें आपला अंमल बसविला. परंतु तेथें त्याला कांहीं वसूल उत्पन्न न होतां फौजेस खर्च मात्र फार लागूं लागला. ह्यास्तव मल्हारराव होळकर व दत्तोजी शिंदा ह्यांस फौजेसुद्धां वसूल करावयास तेथें ठेवून तो पुण्यास परत आला. ह्याप्रमाणें रघुनाथरावास कांहीं लाभ न होतां तो कर्ज मात्र करून आला, हें सदाशिवरावास न आवडल्यामुळें फौजेच्या खर्चाच्या बाबतींत त्या उभयतांचा तंटा लागला. तो तंटा मिटण्याकरितां नानासाहेबानें असा ठराव केला कीं, रघुनाथरावानें पुण्यांत राहून मुलकी कामें करावीं, व सदाशिवरावानें लष्कर घेऊन स्वारीस जावें.

१०. ह्याप्रमाणें ठरल्यावर सदाशिवरावभाऊनें हिंदुस्तानांत स्वारी करण्याची तयारी केली. इतक्यांत अशी गोष्ट घडून आली कीं, त्यानें हैदराबादकरांच्या ताब्यांतील अहमदनगर-शहर हें कांहीं युक्तीनें हस्तगत करून घेण्याचा यत्न पूर्वीपासून चालविला होता; तो सिद्धीस जाऊन तें शहर तेथील मुसलमान किल्लेदारानें दगलबाजीनें भाऊसाहेबाच्या कारकुनाच्या स्वाधीन केलें. हें वर्तमान हैदराबादचा नवाब सलाबत्जंग व त्याचा भाऊ निजामअल्ली ह्या उभयतांस कळतांच त्यांस मोठा राग आला; आणि निजामशाही बादशाहीची पुरातन राजधानी आपल्या हातांतून जाऊं द्यावयाची नाहीं, अशा निश्चयानें तें शहर परत घेण्याकरितां ते दोघे युद्धाची तयारी करून निघाले. ही खबर भाऊसाहेबास लागतांच हिंदुस्तानांत जाण्याचा बेत रहित करून तो लष्करासहित हैदराबादेवर जाण्यास निघाला. ह्याप्रमाणें दोन्ही फौजा एकमेकींवर येत असतां ऊदगीर*एथें त्यांची गांठ पडून मोठी लढाई झाली. तींत मोंगलांचा अगदीं मोड झाला असें पाहून निजामअल्लीनें आपल्या अधिकाराचें मोर्तब भाऊसाहेबाकडे पाठविलें. हें करण्यांत त्याचा भावार्थ असा कीं, आतां तुमच्या इच्छेस येईल तशी तुम्ही तजवीज करा. हा भावार्थ समजून भाऊसाहेबानें त्याच्याशीं तह केला. ह्या तहाच्या योगानें मोंगलापासून मराठ्यांस दवलताबाद, शिवनेरी, अशिरगड, आणि विजापूर हे किल्ले मिळून, अहमदनगर त्यांनीं

हैदराबादचा नवाब आणि सदाशिवराव भाऊ ह्यांचें युद्ध होऊन मराठ्यांस मोठा लाभ होतो. इ० स० १७६०.

* हा गांव निजामाच्या राज्यांत मांजरा-नदीच्या कांठीं आहे.

घेतलें होतें तें त्यांजकडेसच रहावें असें ठरलें. ह्याखेरीज विजापूर-प्रांत, वेदनूर-प्रांताचा कांहीं भाग आणि अवरंगाबादप्रांतापैकीं अवरंगाबाद-शहर व हरसोळ आणि शिवारा हे परगणे शिवाय करून तो सारा प्रांत, हेही मराठ्यांस मिळाले. सारांश, ह्या प्रसंगीं मराठ्यांस सुमारें बासट लक्षांपेक्षां ज्यास्त वसुलाचा मुलूख मिळाला. ही गोष्ट इ०स० १७६० ह्या वर्षी घडली.

अहमदशाह अबदालीची हिंदुस्तानांत मराठ्यांवर स्वारी; इ० स० १७६०.

११. रघुनाथरावानें मुलतान व लाहोर हे प्रांत घेतल्याचें वर्तमान अहमदशाह अबदाली ह्यास समजतांच तो फार रागावून इ० स० १७६० ह्या वर्षी मराठ्यांशीं युद्ध करण्याकरितां मोठ्या सैन्यासहित हिंदुस्तानांत आला. त्यानें प्रथम, लाहोरामध्यें जे मराठ्यांचे लोक होते, त्यांस हांकून लाविलें; आणि त्यांच्या मदतीस आलेल्या दत्तोजी शिंद्याचा पराभव करून त्याला ठार मारिलें. हें वर्तमान पेशव्यास कळतांच त्यानें सदाशिवरावभाऊ व आपला थोरला पुत्र विश्वासराव ह्यांबरोबर वीस हजार निवडक स्वार, आणि पायदळ व इब्राहिमखान गारदी ह्याचे कवाईत शिकलेले लोक आणि तोफखान्याचे लोक मिळून दहा हजार, असें सैन्य देऊन त्यांस हिंदुस्तानांत पाठविलें. त्यांच्या सैन्यांत जे सरदार होते, त्यांत बळवंतराव गणपत मेहेंदळे, समशेर बहादर (हा पहिल्या बाजीरावास यवनीपासून झालेला पुत्र), नारोशंकर (ह्यालाच राजे बहादर ही पदवी होती), विठ्ठल शिवदेव विंचुरकर व त्रिंबक सदाशिव पुरंदरे हे मुख्य होते. ते चंबळा-नदीच्या कांठीं जाऊन पोहोंचता-

हेत तोंच पेशव्याच्या हुकुमावरून मल्हारराव होळकर जनकोजी शिंदा, दमाजी गाईकवाड, यशवंतराव पवार, आपाजीराव आठवले, अंताजी माणकेश्वर, गोविंदपंत बुंदेले वगैरे सरदार आपापल्या सैन्यासहित त्यांस येऊन मिळाले. त्या वेळीं भाऊसाहेबाच्या लष्कराचा सरंजाम अशा थाटाचा होता कीं, अवरंगजेब बादशाहाच्या वेळेपासून असा थाट कधीं कोणीं पाहिला नव्हता. ही मराठ्यांची हिंदुस्तानांतील तिसरी स्वारी. ह्या प्रसंगीं मराठ्यांचें एकंदर सैन्य ५५,००० स्वार व १५,००० पायदळ, इतकें असून २०० तोफा होत्या. ह्याखेरीज पेंढारी* व बाजारबुणगें[१] मिळून दोन लक्ष होतें. अहमदशाह अबदालीचें निवडक सैन्य ४१,८०० स्वार व ३८,००० पायदळ इतकें असून ७७ तोफा होत्या, व त्याखेरीज पुष्कळ स्वतंत्र शूर शिपाई त्याच्या मदतीस आले होते.

मराठ्यांच्या व अफगाण लोकांच्या सैन्याची गणना.

१२. भाऊसाहेबानें आपल्या साऱ्या सैन्यासहित पहिल्यानें दिल्लीवर जाऊन तें शहर हस्तगत केलें; परंतु पावसाळा आल्यामुळें तेथेंच त्याला छावणी करावी लागली. पुढें पर्जन्यकाळ संपल्यावर दिल्लीचा बंदोबस्त करून पुढें जाणार, इतक्यांत अहमदशाह अबदालीनें त्याशीं सल्ला करण्याचा घाट घालून त्याला न कळतां

सदाशिवराव दिल्ली घेऊन पानपतास येतो.

---

* लुटालूट करून निर्वाह करणारे लोक.

१ सैन्यांतील लढाऊ लोकांखेरीज त्यांच्या खाण्यापिण्याच्या वगैरे व्यवस्थेसाठीं जीं माणसें सैन्यांत असतात, त्या सर्वांच्या समुदायास 'बाजारबुणगें' ह्मणतात.

आपलें सारें सैन्य यमुनेच्या दक्षिणेस आणिलें. हें अबदालीचें कपटाचें कृत्य भाऊसाहेबाच्या सरदारांनीं त्याच्या कानावर घालून हिताच्या पुष्कळ युक्ति सुचविल्या; परंतु तो नुकताच निजामअल्लीशीं युद्ध करून जय पावल्यामुळें चढून गेला होता, तेणेंकरून त्याच्या बुद्धीस अंतर पडून त्यानें त्यांचें कांहींच ऐकिलें नाहीं. हेंच पुढें त्याच्या नाशाचें मुख्य कारण झालें. असो, ह्याप्रमाणें गिलचे लोक जवळ आले, तेव्हां मराठ्यांचें लष्कर मागें पानपताकडे हटलें. तेथें भाऊसाहेबानें आपल्या लष्कराभोंवतीं खंदक खणून बंदोबस्तानें तळ दिला. अबदालीनेंही त्यांच्या जवळच तळ दिला, आणि शत्रूस आपल्या सैन्यांत येण्यास कठीण पडावें ह्मणून सैन्याभोंवतीं मोठमोठालीं झाडें तोडून पाडिलीं.

पानपत एथील लढाई. तारीख ७ जानेवारी, इ० स० १७६१.

१३. ह्याप्रमाणें पानपत एथें दोन्ही सैन्यांचे तळ पडले असतां, उभयपक्षांचे सरदार परस्परांस भेटत होते. त्यावरून पहिल्यानें त्यांचा सल्ला होईल असें दिसलें. परंतु गोविंदपंत बुंदेले ह्यास गिलच्यांच्या धान्यादिकांचा नाश करण्याकरितां भाऊसाहेबानें पाठविलें असतां, त्याची आणि गिलच्यांच्या एका सरदाराची मोठी चकमक झडून गोविंदपंत ठार मेला, त्यामुळें तो सल्ल्याचा बेत विसकटला. तेव्हां उभयपक्षीं हळू हळू युद्धास आरंभ झाला, तरी इ० स० १७६० ह्या वर्षाच्या दिसेंबर महिन्याच्या २३ व्या तारखेपर्यंत तें फारसें वाढलें नव्हतें. परंतु त्या दिवशीं अबदालीचा वजीर कांहीं स्वार बरोबर घेऊन जवळच एका मशिदीकडे जात होता, हें पाहून मराठ्यांनीं एका-

एकीं त्यावर हल्ला केला. तेव्हां तो हातीं लागण्याचा बेत आला होता, परंतु त्या चकमकींत मराठ्यांकडील बळवंतराव मेहेंदळा पडला. त्यामुळें भाऊसाहेबास फार दुःख होऊन तो त्याचें प्रेत घेऊन परत आला. त्यामुळें त्या वजिराला पळून जाण्यास संधि सांपडून तो हातचा गेला. त्या दिवसापासून उभयपक्षीं टोळ्या टोळ्यांचीं युद्धें चालू झालीं. शेवटीं मराठ्यांच्या लष्करास धान्यादिकांचा फार तोटा पडून उपाशीं मरण्याची वेळ आ- ल्यामुळें, अन्नावांचून मरावें त्यापेक्षां लढाईंत मरणें बरें असा त्या सर्वांनीं निश्चय करून, इ० स० १७६१ ह्या वर्षाच्या जानेवारीच्या ७ व्या तारखेस एकदम शत्रूवर चाल केली. त्या वेळीं मराठ्यांकडील इब्राहिमखान गारदी व दमाजी गाइकवाड हे अघाडीस होते; त्यांनीं आपणासमोरच्या रोहिल्यांवर इतक्या वेगानें चाल केली कीं, त्यांची त्यांनीं अगदीं दाणादाण करून सोडिली. सैन्याचे मध्यभागीं भाऊसाहेब होता त्यानेंही अबदालीच्या वजिरावर चाल करून त्याच्या स्वारांची फळी फोडून टाकिली. तेव्हां दोन्ही सैन्यें अगदीं हातघाईवर येऊन इतकी गर्दी होऊन गेली कीं, तिच्या योगानें धुरळा मनस्वी उडून कांहीं दिसेनासें झालें; त्यामुळें स्वकीय किंवा परकीय हें उभयपक्षींच्या लोकांस समजेना. ते आपआपल्या लोकांसच मारण्याच्या बेतांत आले. त्या वेळीं मराठे लोक 'हरहर महादेव' ह्मणत, व मुसलमान 'दीन' 'दीन' ह्मणत, ह्या खुणेनें मात्र ते एकमेकांस ओळखीत. शेवटीं अफगाण लोक जरा मागें हटूं लागले. असें पाहतांच अबदालीच्या वजिरानें त्यांस धीर देऊन मागें

फिरविलें; आणि दुसरी दहा हजार स्वारांची टोळी घेऊन मराठ्यांवर मोठ्या वेगानें हल्ला केला. तेव्हां पुनः गर्दी होऊन हातघाई सुरू झाली. ह्याप्रमाणें अडीच प्रहर दिवसपर्यंत युद्ध चालल्यावर विश्वासरावास असाध्य जखम लागून तो पडला. हें वर्तमान भाऊसाहेबास कळतांच तो आपल्या हत्तीवरून उतरला आणि घोड्यावर बसून युद्धाच्या गर्दीत शिरला; व थोडक्याच वेळांत दिसेनासा झाला. हा प्रकार पाहून होळकर व दमाजी गाईकवाड युद्ध सोडून निघाले; तेव्हां इतर मराठ्यांचेंही अवसान सुटून ते सारे चोंहींकडे पळूं लागले. कितीएक खंदकाकडे पळाले, ते एकमेकांवर पडून मेले. कितीएक लोक आपल्या मुलांमाणसांसुद्धां पानपत-गावांत शिरले, त्यामुळें तेथें मोठी गर्दी होऊन गेली. तेव्हां गिलच्यांनीं त्या गांवास वेढा घालून दुसऱ्या दिवशीं त्यांतले सर्व लोक पकडले. त्यांपैकीं त्यांनीं सारे पुरुष ठार मारून बायकांस आपल्या दासी व मुलांस आपले गुलाम करून ठेविलें. मराठे लोक सांपडले कीं त्यांना ओळीनें उभे करून सर्वांचीं डोकीं एकदम कापावीं, आणि त्या डोक्यांचे ढिगांचे ढीग आपल्या डेऱ्यांपुढें रचून ठेवावे; अशा प्रकारें अत्यंत दुष्टपणाचें व मनुष्यजातीस बट्टा आणणारें कर्म करून गिलचे लोक आपल्या मुलखीं निघून गेले.

पानपतच्या लढाईत मेलेले व परत आलेले मराठ्यांचे सरदार वगैरे.

१४. विश्वासराव युद्धांत पडल्याचें वर लिहिलेंच आहे. भाऊसाहेब युद्धाच्या गर्दीत शिरला तो पुनः सांपडला नाहीं. गोविंदपंत बुंदेले आणि बळवंतराव मेहेंदळे हे पूर्वींच रणांत पडले होते. जनको-

जी शिंदा आणि इब्राहिमखान ह्यांस शत्रूनें धरून ठार मारिलें. मल्हारराव होळकर व दमाजी गाईकवाड हे पहिल्यानेंच पळून आले. तसेंच विंचुरकर व राजेबहादर हे दिल्लीच्या बंदोबस्ताकरितां ठेविले होते ते स्वस्थपणें स्वदेशीं परत आले. सारांश, मराठ्यांच्या सैन्यापैकीं सुमारें चतुर्थांश लोक मात्र माघारें आले. बाकीचीं सुमारें दोन लक्ष मनुष्यें ठार मेलीं. त्यांच्या शोकानें संपूर्ण महाराष्ट्र-देश व्यापून गेला.

नानासाहेबाचा मृत्यु (इ०स०१७६१) व त्याचे पुत्र.

१९. हें पराभवाचें वर्तमान पुणें मुक्कामीं नानासाहेबास कांहींसें समजतांच तो आपलें खासगींचें सैन्य व जानोजी भोंसल्याचें दहा हजार सैन्य ह्यांसहित आपल्या लोकांच्या मदतीकरितां निघाला. तो जानुआरीच्या १९ व्या तारखेच्या सुमारास नर्मदेच्या पलीकडे जात असतां अमदाबादच्या कोणा सावकाराचा जासूद तिकडून आलेला त्याच्या सैन्यास भेटला. त्यानें मराठ्यांचा अगदीं मोड झाल्याची पक्की बातमी सांगितली. त्या जासुदाजवळ एक पत्र सांपडलें, त्यांत सांकेतिक भाषेनें लिहिलें होतें कीं, दोन मोतीं गळून गेलीं, सत्तावीस मोहरा सांडल्या, आणि रुपये व खुर्दा किती हरवला ह्याची तर संख्याच लागत नाहीं. ह्या मजकुरावरून नानासाहेबास लढाईच्या परिणामाचें बहुतेक अनुमान झालें. इतक्यांत परत आलेल्या लोकांपैकीं बाळाजीपंत फडनवीस (तोच पुढें नाना फडनवीस ह्या नांवानें प्रसिद्ध झाला) त्याला पहिल्यानें भेटला; आणि त्यानें नानासाहेबास लढाईचें कचें वर्तमान सांगितलें. तेव्हां तो अत्यंत दुःखी होऊन पुण्यास परत

आला. त्या वेळेपासून दुःखामुळें तो एकसारखा झुरत चालला. शेवटीं पुण्याजवळ त्यानें बांधिलेल्या पर्वतीच्या देवालयांत इ० स० १७६१ ह्या वर्षी जून महिन्याच्या अखेरीस तो मृत्यु पावला. त्यानें २१ वर्षें पेशवाईचा अधिकार चालविला. त्याला एकंदर पुत्र तीन. त्यांपैकीं वडील विश्वासराव, हा पानपतच्या लढाईंत पडला. दुसरा **माधवराव** हा **नानासाहेबाच्यामागें** पेशवा झाला; आणि तिसरा **नारायणराव** हा **माधवरावाच्यामागें** पेशवा झाला.

नानासाहेबाच्या कारकीर्दींत मराठी राज्याची स्थिति.

१६. **नानासाहेबाच्या** कारकीर्दींत **पानपतच्या** लढाईच्यापूर्वी मराठे लोकांच्या प्राबल्याची अगदीं सीमा झाली होती. त्यांची सत्ता इतकी वाढली कीं, दिल्लीच्या दरबारींही कांहीं राज्यप्रकरणीं उलटापालट होऊं लागल्यास, ती मराठे लोकांच्या साह्यावांचून होईनाशी झाली. ही गोष्ट केवळ त्याच्याच चातुर्यामुळें झाली असें ह्मणतां येत नाहीं. त्याच्या वडिलांनीं जो पराक्रम करून ठेविला होता, तो त्याच्या कारकीर्दींत फळास आला असें ह्मटलें पाहिजे. **पानपतच्या** लढाईंत पराभव झाल्यामुळें मराठे लोकांची जी दुर्दशा झाली, तीपासून त्यांना पुनः पूर्व स्थितीवर येण्यास पुष्कळ वर्षें लागलीं.

त्याचे गुण.

१७. **नानासाहेब** हा मोठा उदार व दयाळू असे, तरी मोठा चैनबाज असून त्याला काम करण्याचा कंटाळा असे; तथापि त्याचा धाकटा भाऊ **रघुनाथराव** व चुलतभाऊ **सदाशिवराव** हे आपापल्या कामांत फार हुशार असून मोठे मेहनती असत, त्यामुळें पेशव्यांचें घराणें फार बलिष्ठ होऊन प्रजाही सुख पावूं लागली.

# पहिला (थोरला) माधवराव साहेब ह्याचें वर्णन.

## इ० स० १७६१ ह्या वर्षापासून इ० स० १७७२ ह्या वर्षापर्यंत.

त्यास पेशवाईचीं वस्त्रें मिळतात. इ० स० १७६१.

१. बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब मरण पावल्यानंतर त्याचा पुत्र माधवराव ह्यास इ० स० १७६१ ह्या वर्षी सप्तंबर महिन्याच्या अखेरीस सातारचा रामराजा ह्याजपासून पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं. त्या वेळीं त्याचें वय सत्रा वर्षांचें होतें.

माधवरावाचें रघुनाथरावाशीं वैमनस्य.

२. माधवराव पुरा वयांत आला नव्हता, ह्मणून आरंभीं कांहीं दिवस त्याचा चुलता रघुनाथराव हाच पेशवाईचा कारभार करीत होता. रघुनाथराव हा जरी राजकीय कामाच्या अगदीं उपयोगीं नव्हता, तरी तो मोठा शूर असून त्या वेळेस मुसलमानांशीं वगैरे मराठ्यांनीं ज्या लढाया केल्या त्यांत पुढारी होऊन त्यानें बहुत प्रसंगीं जय मिळविला होता; तेणेंकरून, व त्याची बायको आनंदीबाई हिनेंही त्याच्या मनांत भरवून दिल्यावरून, राज्याचा अर्धा हिस्सा आपणास असावा अशी तो इच्छा दर्शवूं लागला. ह्यामुळें त्याचें आणि माधवराव ह्याचें वैमनस्य पडलें; ह्मणून माधवरावानें तो व त्याचा स्नेही सखारामबापू (हा एक फार शहाणा मनुष्य होता) ह्या उभयतांस कारभारावरून दूर केलें. तेव्हां रघुनाथराव मोंगलांकडे जाऊन

त्यांच्या आश्रयानें माधवरावाशीं युद्ध करावयास आला; तथापि त्याशीं युद्ध न करितां माधवरावानें मोठ्या चातुर्यानें प्रथम आर्जव करून त्यास वश करून घेतलें; परंतु पुढें तो विथरला, तेव्हां माधवरावानें संधी साधून धोरप एथें इ० स० १७६८ त त्यावर हल्ला करून त्यास पकडलें आणि त्याच्या फौजेचा अगदीं मोड करून त्यास पुण्यांत आणून बंदोबस्तांत ठेविलें.

तो राज्याची व्यवस्था करितो.

३. ह्याप्रमाणें रघुनाथरावाचा बंदोबस्त केल्यावर माधवरावानें त्रिंबकराव मामा ह्या नांवाचा त्याचा एक संबंधी होता त्यास मुख्य कारभारी नेमून राज्याची व्यवस्था चालविली. त्यानें प्रजेच्या रक्षणाकरितां उत्तम कायदे केले, व रामशास्त्री प्रभुणे ह्या नांवाचा एक महाविद्वान्, न्याय करण्याच्या कामीं मोठा चतुर, अत्यंत निःपक्षपाती, व निस्पृह* असा माहुलीकर देशस्थ ब्राह्मण होता, त्यास त्यानें न्याय करण्याच्या कामावर नेमिलें; आणि गरीब लोकांची दाद लवकर लागावी व त्यांस सुख व्हावें ह्मणून त्यानें पुष्कळ तजविजी केल्या. त्याच्या कारभाऱ्यांमध्यें बाळाजीपंत भानू ह्मणून एक गृहस्थ फडनविशीच्या कामावर होता, तो आपल्या अकलेच्या

* त्याच्या निस्पृहतेचें एक ठळठळीत उदाहरण असें आहे कीं, नारायणराव पेशवा ह्यास मारविण्याचा दोष रघुनाथरावावर येतो असें रामशास्त्री ह्यास वाटून, रघुनाथराव पेशव्याच्या गादीवर असतांही त्याला त्यानें सांगितलें कीं, ह्याबद्दल तुम्हांस देहान्त प्रायश्चित्त पाहिजे; तुमच्या दुर्वर्तनामुळें तुमचें राज्य बुडेल; तर तुह्मी राज्य करीत आहां तोंपर्यंत मी पुण्यास येणार नाहीं. असें ह्मणून तो वांईजवळ एका लहानशा खेड्यांत जाऊन राहिला.

जोरावर पुढें फार प्रसिद्धीस आला. त्यास लोक नानाफडनवीस असें ह्मणत. त्याकडे हें काम बाळाजी बाजीरावाच्या वेळेपासून होतें.

हैदरअली ह्याशीं मराठ्यांच्या लढाया.

४. माधवरावाच्या कारकीर्दींत ह्मैसूर-प्रांतामध्यें हैदरअली ह्या नांवाचा मुसलमान एका स्वतंत्र राज्याची स्थापना करून मराठ्यांशीं लढाया करूं लागला. परंतु माधवरावाचें शौर्य व चातुर्य ह्यांपुढें हैदराचें कांहीं न चालतां बहुतेक लढायांत त्याचा पराभव होऊन त्याला मराठ्यांस खंडणी देणें भाग पडलें.

माधवरावाचा मृत्यु; इ० स० १७७२.

५. ह्याप्रमाणें माधवराव सर्वत्र विजयी होऊन रात्रंदिवस प्रजेच्या सुखासाठीं यत्न करीत असतां, मराठे लोकांच्या दुर्दैवामुळें त्यास अकालीं मृत्यूनें गांठलें. इ० स० १७७२ ह्या वर्षी तो नोवेंबर महिन्याच्या अठराव्या तारखेस थेऊर एथें मृत्यु पावला. त्या वेळेस त्याचें वय २८ वर्षांचें होतें. त्याला मूल मुलींच नव्हतें. त्याची बायको रमाबाई ही त्यावरोबर सती गेली.

त्याचा स्वभाव.

६. माधवरावाच्या कारकीर्दीचें जें वर संक्षिप्त वर्णन केलें आहे, त्यावरून त्याच्या शौर्याचें अनुमान होईलच. परंतु राजनीतींतही तो फार चतुर असून, प्रामाणिकपणा, धैर्य इत्यादि पुष्कळ गुण त्याच्या अंगीं वसत होते. गरीब लोकांच्या सुखाकडे त्याचें किती लक्ष्य होतें हें पुढील गोष्टीवरून सहज समजेल. त्या वेळेस गांवांतून गरीब लोकांस जबरदस्तीनें बेगारीस धरून नेण्याची चाल फार दिवस

पडली होती, ती त्यानें अगदीं मोडून टाकिली होती; हें माहीत असतांही वसईचा सुभेदार विसाजीपंत ह्यानें आपले कांहीं जिन्नस, बेगारी धरून त्यांजकडून नेवविले. हें वर्तमान माधवरावास कळतांच त्यानें त्या सर्व जिनसांची जप्ती केली आणि बेगारी लोकांचे रोज चुकवून दिले. सारांश, तो प्रजेचें पालन करणारा इतका उत्तम होता कीं, त्याचें अल्पवयांतील मरण मराठे लोकांना फार दुःखास कारण झालें.

त्याच्या मरणसमयीं मराठी राज्याचा वसूल.

७. माधवराव मृत्यु पावला त्या वेळीं शिंदे, होळकर, गाईकवाड व दुसरे लहान लहान सरदार ह्यांच्या मुलखांसुद्धां मराठी राज्याचा वसूल दहा कोट रुपये होता असें ह्मणत; परंतु वास्तविक पहातां सुमारें सात कोट रुपये होता.

---

## नारायणराव आणि रघुनाथराव ऊर्फ राघोबा दादा ह्यांचें वर्णन.

### इ० स० १७७२ ह्या वर्षापासून इ० स० १७७४ ह्या वर्षापर्यंत.

मराठी ग्रंथ संग्रहालय. ठाणे.

नारायणरावास पेशवाईचीं वस्त्रें मिळतात. इ० स० १७७२.

१. थोरला माधवराव मरण पावल्यानंतर त्याचा धाकटा भाऊ नारायणराव हा पेशवाईच्या गादीवर बसला. सातारच्या राजानें त्यास पेशवाईचीं वस्त्रें देते समयीं त्याच्या नांवास कारभारी असें नवेंच पद जोडिलें. ह्या वेळीं नारायणरावाचें वय सुमारें १७ वर्षांचें होतें.

२. माधवरावानें मरते समयीं रघुनाथराव आणि सखारामबापू ह्यांस जवळ बोलावून व त्यांचे अधिकार त्यांजकडे देऊन मोठ्या आर्जवानें त्यांस सांगितलें होतें कीं, तुह्मी सर्व कारभारी एकचित्त होऊन नारायणरावाचा सांभाळ करा. माधवरावाच्या ह्या सांगण्यावरून, नारायणरावास पेशवाईचें काम मिळाल्यावर, कांहीं दिवसपर्यंत त्या चुलत्यापुतण्यांचें सख्य होतें. परंतु रघुनाथरावाची बायको आनंदीबाई व नारायणरावाची आई गोपिकाबाई ह्या दोघींचीं मनें मिळेनात; त्यामुळें त्या दोघींमध्यें द्वेष उत्पन्न झाला. तेव्हां नारायणरावानें रघुनाथरावास पुण्यामध्यें आपल्या वाड्यांत एका खोलीमध्यें बंदोबस्तांत ठेविलें, आणि बजाबा पुरंदरे, नानाफडनवीस व हरीपंत फडके ह्यांच्या हातून राज्याचा कारभार चालविला.

त्याचें आणि रघुनाथरावाचें वैमनस्य.

३. नारायणरावानें पेशवाईचा कारभार सुमारें आठ महिने चालविल्यावर इ० स० १७७३ ह्या वर्षी आगष्ट महिन्याच्या ३० व्या तारखेस कांहीं गारदी लोक, त्यांचा पगार थकला होता तो मागण्याच्या निमित्तानें, त्याच्या वाड्यांत शिरून दांडगाई करूं लागले. त्यांपैकीं सुमेरसिंग नांवाचा एक गारदी नारायणरावास मारण्याकरितां त्याच्या अंगावर धांवून गेला. हें पाहतांच नारायणराव भिऊन रघुनाथरावापाशीं गेला. तेव्हां त्यास न मारण्याविषयीं रघुनाथरावानें त्या गारद्याची पुष्कळ विनवणी केली; परंतु ती न ऐकतां तो व रघुनाथरावाचा तुळ्या पवार नांवाचा दुजऱ्या ह्या उभयतांनीं नारायण-

मारेकऱ्यांच्या हातून त्याचा मृत्यु. इ० स० १७७३.

राव आणि त्याचा दुजऱ्या चाफाजी टिळेकर, जो आपल्या धन्याचा प्राण राखण्याकरितां त्याचे अंगावर पडला होता, ह्यांस ठार मारिलें.

४. हें घोर कृत्य रघुनाथरावानें करविलें असावें, असा सर्व कारभारी लोकांस संशय आला. परंतु पहिल्यानें निश्चय होईना; ह्मणून रघुनाथरावाच्या नशिबानें त्यास प्राप्त झालेली पेशवाईची पदवी त्यानें भोगावी असें त्यांनीं ठरविलें. त्याप्रमाणें तो पेशवाईचा कारभार करूं लागला. पुढें रामशास्त्री ह्यानें सुमारें दीड महिना त्या कृत्याची बारकाईनें चौकशी केली, तीवरून त्याची पक्की खातरी झाली कीं, हें कृत्य रघुनाथरावानेंच करविलें. मग त्यानें त्या प्रकरणीं त्यास समक्ष विचारिलें; तेव्हां त्यानें कबूल केलें कीं, नारायणराव धरावा असें मीं गारदी ह्यांस पत्र दिलें होतें खरें; परंतु धच्या ठिकाणीं मा कोणीं लिहिला हें मला माहीत नाहीं. तेव्हां हें कृत्य आनंदीबाईचेंच असावें असें सर्वांस वाटलें. ह्या सर्व कारणांनीं कांहीं कारभारी लोकांच्या मनांत रघुनाथरावाविषयीं फार द्वेष उत्पन्न झाला.

रघुनाथरावास पेशवाईचा अधिकार मिळतो. इ० स० १७७३.

५. पुढें कांहीं दिवसांनीं रघुनाथराव कर्नाटकामध्यें हैदराशीं युद्ध करण्याच्या मसलतींत गुंतला असतां त्याचे प्रतिस्पर्धी नानाफडनवीस, सखारामबापू, व दुसरे कांहीं कारभारी, ह्यांनीं त्याला पदच्युत करण्याची एक युक्ति योजिली. ती अशी; नारायणरावास मारिलें तेव्हां त्याची बायको गंगाबाई गरोदर होती, तिला त्या

रघुनाथरावास पदच्युत करण्याविषयीं यत्न.

कारभाऱ्यांनीं रघुनाथरावाच्या भयानें पुरंदरावर नेऊन ठेविलें, आणि त्याच्या पक्षाचे सर्व लोक कैद करून गंगाबाईच्या नांवानें राज्यकारभार चालविला. तेथें थोडक्या दिवसांनीं तिला पुत्र झाला; तेव्हां रघुनाथरावाच्या प्रतिपक्ष्यांनीं त्याचें नांव माधवराव असें ठेवून त्याच्या नांवाची चोहींकडे द्वाही फिरविली. त्या वेळीं नानाफडनवीस संपूर्ण राज्याचा कारभार चालवीत होता.

---

## धाकटा अथवा सवाई माधवराव साहेब ह्याचें वर्णन.

### इ० स० १७७४ ह्या वर्षापासून इ० स० १७९६ ह्या वर्षापर्यंत.

माधवरावास पेशवाईचीं वस्त्रें मिळतात. इ०स०१७७४.

१. माधवराव नारायण इ० स० १७७४ ह्या वर्षी एप्रिल महिन्यांत जन्मला. त्यानंतर चाळिसाव्या दिवशीं त्यास साताऱ्याहून पेशवाईचीं वस्त्रें आलीं; ह्मणून त्याच्या जन्मापासूनच त्याची कारकीर्द सुरू झाली असें ह्मटलें पाहिजे. त्याला लोक सवाई माधवराव असें ह्मणत.

रघुनाथराव इंग्रजांपाशीं मदत मागतो.

२. सवाई माधवरावाला पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं हें ऐकून रघुनाथरावानें तो अधिकार आपणास मिळावा ह्मणून पुनः प्रयत्न चालविला. तो असा. त्या वेळीं इंग्रजसरकारचीं ठाणीं कलकत्ता, मुंबई आणि मद्रास ह्या तीन ठिकाणीं होतीं; त्यांपैकीं मुंबईच्या मुख्य इंग्रज अ-

धिकाऱ्यांशीं त्यानें असें बोलणें लाविलें कीं, जर तुह्मी मला पुन्हा पेशवाईच्या गादीवर बसवाल, तर साष्टी-बेट, वसई-गांव व गुजराथेंतील कांहीं प्रांत हीं मी तुह्मांस देईन. हें साष्टी-बेट पूर्वीं पोर्तुगीज लोकांच्या ताब्यांत असून मराठ्यांनीं बलात्कारानें त्यांजपासून घेतलें होतें; तें आपणास मिळावें अशी मुंबईसरकारास फार इच्छा होतीच, त्यामुळें तें रघुनाथरावाचें बोलणें कबूल करण्याच्या बेतांत होतें. परंतु रघुनाथरावानें पुनः बोलणें फिरवून साष्टी-बेट देण्याचें नाकबूल केलें; आणि तो दुसरें कांहीं बोलणें लावणार, इतक्यांत साष्टी वगैरे संस्थानें हिंदु लोकांपासून माघारीं घेण्याकरितां पोर्तुगीज लोकांच्या बादशाहाकडून गोव्यास फौज येऊन पोहोंचली, अशी वार्ता उठली. तेव्हां मुंबईसरकारानें रघुनाथरावाच्या अनुमोदनाची वाट न पाहातां त्वरा करून तें बेट तत्काळ आपल्या हस्तगत करून घेतलें.

मुंबईसरकाराला रघुनाथरावाचा पक्ष सोडण्यास कारणें झालीं तीं.

३. मुंबईसरकारानें साष्टी-बेट घेतल्यानंतर रघुनाथरावानें पुनः त्याजपाशीं मदत मागण्याकरितां बोलणें लाविलें. तेव्हां उभयतांचा कांहीं ठराव होऊन मुंबईसरकारानें किटिङ्ग साहेब फौजेसहित रघुनाथरावाच्या मदतीस पाठविला. ह्याच वेळेपासून मराठे व इंग्रज ह्यांच्यामध्यें लढायांची सुरुवात झाली. रघुनाथरावास पेशवाईच्या गादीवर बसविण्याचा मुंबईसरकारचा उद्देश सिद्धीस जातो, असा त्या वेळच्या लढायांवरून रंगही दिसूं लागला. इतक्यांत एक विघ्न उत्पन्न झालें. तें असें कीं, मुंबई, मद्रास आणि इतर कांहीं

ठिकाणें एथें जीं इंग्रज लोकांचीं ठाणीं होतीं, त्या सर्वांवर कलकत्त्याचा गव्हर्नरजनरल व त्याचे मंत्री ह्यांची देखरेख असावी, असा विलायतेहून ठराव होऊन आला. तेव्हां मुंबईसरकारानें हत्त्या करणारा रघुनाथराव ह्यास मदत केली, ही गोष्ट कलकत्तासरकारास नापसंत होऊन, त्याच्या कुमकेस पाठविलेलें आपलें लष्कर परत बोलाविण्याविषयीं त्यांनीं मुंबईसरकारास लिहिलें; आणि पेशव्याशीं स्नेह करण्याच्या उद्देशानें पुण्यास आपला वकील पाठविला. तेव्हां पुरंदर मुक्कामीं पेशवे आणि इंग्रज ह्यांचा असा तह झाला कीं, साष्टी इंग्रजांकडेसच रहावी, व त्यांनीं इतःपर रघुनाथरावाचा पक्ष स्वीकारूं नये; आणि रघुनाथरावास हा तह मान्य होईल तर त्यानें खर्चाकरितां दरमहा पंचवीस हजार रुपये घेऊन कोंपरगांवीं स्वस्थ रहावें. परंतु रघुनाथरावास ती तहांतली अट न पटल्यामुळें तो मुंबईस येऊन राहिला. तेथें इंग्रजांनीं त्याला दरमहा दहा हजार रुपये देऊन आपल्या आश्रयास ठेविलें.

सदाशिवरावभाऊचें सोंग घेणारा मनुष्य सदोबा ह्याचा परिणाम. इ.स.१७७६.

४. पुणें-प्रांतीं वर लिहिल्याप्रमाणें रघुनाथरावाच्या योगानें धामधूम चालली असतां, कोंकणामध्यें एक विघ्न उत्पन्न झालें. तें असें. पानपतची लढाई झाल्यानंतर सुमारें आठ नऊ वर्षांनीं ह्मणजे थोरला माधवराव ह्याच्या कारकीर्दीत सदोबा ह्या नांवाचा कोणीएक कनोजा ब्राह्मण सदाशिवरावभाऊ तो मीच असें प्रसिद्ध करूं लागला. तेव्हां माधवरावानें त्याची पुरी चौकशी करून तो खोटा ठरल्यामुळें त्यास कैदेंत ठेविलें

होतें. तो ह्या वेळीं रत्नागिरी एथें कैदेंत असतां तेथील सुभेदार रामचंद्र नाईक परांजपे ह्यानें पुण्यांतील कारभारी लोकांत वैमनस्यें पडलेलीं पाहून, ह्या प्रसंगीं त्याला सोडिलें असतां आपणास मोठा लाभ होईल, अशा बुद्धीनें त्याला बंदींतून मुक्त केलें; आणि हाच खरा सदाशिवरावभाऊ असें लोकांस सांगून त्याला वीस हजार फौज मिळवून दिली. तेव्हां त्यानें कोंकणांतील सुमारें वीस किल्ले घेतले; व घाटावरील राजमाची किल्ला घेतला. ह्यामुळें मुंबईसरकारासही तो खरा सदाशिवरावभाऊ वाटून त्यानें त्याकडे वकील पाठविला, आणि त्याचा मोठा सन्मान केला. ह्याप्रमाणें तो प्रबल होऊं लागला, तेव्हां पुण्यांतील कारभारी लोकांनीं पहिल्यानें त्याशीं तह करावयाचा, असें बाह्यात्कारें दर्शवून एकाएकीं राजमाची एथें त्यावर हल्ला केला; तेव्हां तो तेथून कुलाब्यास पळून गेला. तेथें रघूजी आंग्रे ह्यानें त्याला कैद करून पुण्यास पाठविलें. तेव्हां पेशव्यानें त्यास हत्तीच्या पायाशीं बांधून मारिलें, असें ह्मणतात. ही गोष्ट इ० स० १७७६ ह्या वर्षी झाली.

रघुनाथरावाचा पक्ष इंग्रज लोक पुनः धरितात आणि वडगांवच्या लढाईंत पराभव पावतात. ता० १३ जानेवारी इ० स० १७७९.

५. मुंबईसरकारानें सदोबाचा सन्मान केला, व रघुनाथरावाला आपल्या आश्रयास राहूं दिलें हें त्याचें आचरण पुरंदरच्या तहाविरुद्ध झालें, अशी सबब दाखवून मुख्य कारभारी नानाफडनवीस हा पुरंदरच्या तहासंबंधी इंग्रजांचें कांहीं देणें राहिलें होतें तें लांबणीवर टाकूं लागला. तसेंच युरोपामध्यें फ्रेंच आणि इंग्रज ह्यांचें युद्ध चाललें असतांही

फ्रेंचांचा वकील पेशव्यांच्या दरबारीं आला होता, त्यास नानानें पुष्कळ दिवस ठेवून घेतलें. ह्या दोन कारणांनीं इंग्रजांच्या मनांत वैषम्य उत्पन्न झालें. ह्याच संधीस पुण्यांतील कारभारी लोकांत वैमनस्यें पडून नानाचा चुलतबंधु मोरोबादादा फडनवीस ह्यानें मुंबईसरकारच्या मदतीनें पुनः रघुनाथरावास गादीवर बसविण्याचा यत्न चालविला. मुंबईसरकारानेंही वर सांगितलेल्या दोन कारणांनीं त्याच्या मदतीस फौज पाठविली. ती व रघुनाथरावाची फौज मिळून पुण्यावर येत असतां, वाटेंतच वडगांव मुक्कामीं महादजी शिंदे व हरीपंत फडके ह्यांनीं इ० स० १७७९ ह्या वर्षीं जानेवारीच्या १३ व्या तारिखेस त्यांचा पराभव केला, त्यामुळें त्यांस तहाचें बोलणें लावून परत मुंबईकडे जाणें भाग पडलें. तेव्हांपासून पुढें तीन वर्षेपर्यंत मराठे व इंग्रज ह्यांच्यामध्यें लढाई चालूच होती, परंतु तींत कांहींएक निष्पन्न झालें नाहीं. शेवटीं इ० स० १७८२ च्या मे महिन्याच्या १७ व्या तारखेस सालपे मुक्कामीं तह होऊन उभयतांचा कलह संपला.

रघुनाथरावाचा मृत्यु (इ० स० १७८४) व त्याचे पुत्र.

६. राज्यप्राप्तीविषयीं आपला सर्व उद्योग व्यर्थ गेला, असें पाहून रघुनाथरावानें तो नाद सोडून दिला, आणि पेशव्याच्या पूर्वींच्या ह्मणण्याप्रमाणें तो कोपरगांवीं जाऊन स्वस्थ राहिला. तेथें तो इ० स० १७८४ ह्या वर्षीं मृत्यु पावला. त्याला दोन औरस पुत्र होते. त्यांत वडील बाजीराव (तोच पुढें पेशवाईच्या गादीवर बसला,) आणि धाकटा चिमणाजी आपा. ह्यांखेरीज अमृतराव ह्मणून त्यास एक दत्तक पुत्र होता.

टिपू सुलतान.

७. इंग्रज व मराठे ह्यांचा ज्या वेळेस वर सांगितलेला तह झाला, त्याच वेळेस म्हैसूरचा टिपू सुलतान हा पेशव्याच्या मुलखांत फार उपद्रव करूं लागला; व इंग्रज लोकांचा मित्र त्रावणकोरचा राजा ह्याशींही त्यानें युद्ध केलें. ह्या कारणांवरून इंग्रज व पेशवे ह्यांनीं त्याचें पारिपत्य करण्याचा विचार ठरविला. कांहीं दिवसांपूर्वी निजामअल्ली आणि पेशवे ह्यांचा असा तह झाला होता कीं, प्रसंगीं परस्परांनीं परस्परांस साह्य करावें. त्या तहाप्रमाणें निजामअल्लीही त्या उभयतांस मिळाला. नंतर त्या तिघांनीं आपल्या फौजा एकत्र करून प्रथम धारवाड-किल्ला घेतला, व श्रीरंगपट्टणास घेरा घालून तेथें टिपूला पकडण्याचा बेत आणिला. तेव्हां टिपूनें तह करून आपल्या मुलखापैकीं अर्धा मुलूख व तीन कोटी तीस हजार रुपये देण्याचें कबूल केलें; पैकीं निमे ऐवज लागलींच देऊन बाकी निमेची फेड एका वर्षांत तीन हप्त्यांनीं करावी असें ठरलें. ह्या ऐवजाचा भरणा होई तोंपर्यंत त्यानें आपले दोघे पुत्र ओलीस पाठविण्याचेंही पतकरलें. नंतर तो मुलूख व रोकड हीं तिघांनीं करारा‍प्रमाणें सारखीं वांटून घेतलीं. त्यांत मराठ्यांच्या वांटणीस वर्धा आणि कृष्णा ह्या दोन नद्यांच्या मधील बहुतेक मुलूख व बलारीपाशीं सोंडूर नामें खोरें आहे तें इतकें मिळून सुमारें चाळीस लक्षांचा मुलूख आला.

महादजी शिंद्या-चा मृत्यु. इ० स० १,७९४.

८. ह्याप्रमाणें टिपूचा बंदोबस्त झाला तोंच नानाफडनविसास दुसरी एक चिंता उत्पन्न झाली. ती अशी; महादजी शिंदा ह्यानें दिल्ली-प्रांतांत रजपूत व मोंगल ह्यांशीं

मोठमोठ्या लढाया करून जय मिळविले; तेणेंकरून दिल्लीच्या दरबारीं त्याची मोठी ख्याती झाली. पुढें पुण्यांतील सर्व कारभारी लोकांमध्येंही आपणास मोठेपणा मिळावा अशा हेतूनें तो नानाफडनविसाशीं आंतून द्वेष करूं लागला. ह्याखेरीज सवाई माधवरावानें आपल्या मतानें वागावें ह्मणून पुण्यांत राहून त्यानें पुष्कळ खटपट आरंभिली, व दिल्लीच्या बादशाहापासून पेशव्याकरितां वकील *मुतलक ही पदवी मिळवून पुण्यामध्यें मोठ्या समारंभानें ती माधवराव ह्यास दिली. ह्याप्रमाणें पेशव्यास वश करण्याकरितां याचा प्रयत्न चालला असतां नानानें पेशव्याशीं एकांत करून त्याचें मन पुन्हा आपणाकडे वळविलें. इतक्यांत महादजी शिंदा ह्यास मोठा ज्वर येऊन तो इ० स० १७९४ च्या फेब्रुआरी महिन्याच्या १२ व्या तारखेस पुण्याजवळ वानवडी मुक्कामीं मृत्यु पावला. महादजीस संतान नव्हतें, ह्मणून त्याच्या भावाचा नातू दवलतराव[†] शिंदा हा त्याच्या पाठीमागें त्याचा अधिकार चालवूं लागला.

९. महादजी शिंदा जिवंत असतां निजामअल्लीपासून चौथाई व सरदेशमुखी ह्यांबद्दल पुष्कळ दिवसांचा थकलेला पैसा मागून घ्यावा असा सर्व मराठ्यांचा विचार ठरला होता. परंतु महादजी एकाएकीं मेल्यामुळें तें काम मुख्यत्वेंकरून एकट्या नानावर पडलें. तेव्हां त्यानें

खर्ड्याची लढाई. ता० ११ मार्च इ० स० १७९५.

---

* ह्या पदवीचा अर्थ 'मोंगलांच्या राज्यांतील मुख्य कारभाऱ्याचा दुय्यम' असा दिसतो.

* महादजीचा भाऊ तुकोजी ह्याचा मुलगा आनंदराव ह्याचा मुलगा दौलतराव हा महादजीस दत्तक दिला होता.

आपले दोन वकील निजामाच्या दरबारीं बाकी मागावयाकरितां पाठविले. परंतु ती बाकी न देतां उलट निजामाचा कारभारी मशीरउल्मुल्क हा भरदरबारांत त्या वकिलांच्या समक्ष नानाची निंदा करून कांहीं धमकीचीं भाषणें बोलला. तेव्हां अर्थातच उभयपक्षीं युद्धाची तयारी झाली. त्या प्रसंगीं मराठे सरदारांची एके ठिकाणीं जमलेली फौज सुमारें एक लक्ष तीस हजारांवर होती. निजामाची फौजही एक लक्ष दहा हजार होती. इ० स० १७९५ ह्या वर्षीं मार्च महिन्याच्या ११ व्या तारखेस निजामाच्या राज्यांतील खरडें ह्या गांवाजवळ त्या दोन लष्करांची गांठ पडून त्या दिवशीं थोडें युद्ध झालें. त्यांत निजामाचा जय झाल्यासारखा दिसला; परंतु दुसऱ्या दिवशीं युद्धांत त्याचा बराच मोड होऊन त्याला मागें हटावें लागलें. पुढें त्याच दिवशीं रात्रीस अंधारामध्यें मराठ्यांचे दहा बारा स्वार आपल्या घोड्यांकरितां पाणी शोधित असतां चुकून निजामाच्या एका टोळींत शिरले. तेव्हां शत्रूचा छापा आला अशा भ्रांतीनें निजामाच्या लष्करास मोठी भीति पडून ज्यास जिकडे वाट सांपडली तिकडे तो पळूं लागला. ह्याप्रमाणें निजामाच्या फौजेची दाणादाण झाली; तेव्हां तोही भिऊन खरड्याच्या किल्ल्यांत शिरला. त्या वेळीं त्याच्याजवळ त्याच्या फौजेपैकीं सारी दशांश फौज राहिली होती. हें मराठ्यांस कळतांच, त्यांनीं त्या किल्ल्यास वेढा घालून दोन दिवस युद्ध केलें. शेवटीं मार्च महिन्याच्या १५ व्या तारखेस निजामानें तहाचें बोलणें लाविलें. त्यांत मराठ्यांनीं आपली बाकी तीन कोटी रुपये, स्वारीचा खर्च व कांहीं

मुलूख, इतकें मागून मशीरउल्मुल्क ह्यास आमच्या स्वाधीन करावें, असा आग्रह धरिला. तेव्हां त्यांचें सारें मागणें कबूल करून निजामानें मशीरउल्मुल्कास त्यांजकडे पाठविलें. सवाई माधवरावापुढें मशीरउल्मुल्कास आणिलें, त्या वेळेस माधवरावाचें तोंड सुकलें. हें पाहून कोणी त्याचें कारण त्यास पुसलें; तेव्हां तो ह्मणाला कीं, मोंगलांनीं भित्रेपणानें व्यर्थ आपली एवढी अमर्यादा करून घेतली; व आमच्या लोकांस यत्नावांचून जय मिळाला असतांही ते उगेच फुशारकी मारितात, असे उभयपक्षांचेही लोक अप्रयोजक पाहून माझें मन फार खिन्न होतें. असो, खरड्याच्या लढाईचा शेवट ह्या रीतीनें झाला. मशीरउल्मुल्क ह्यास ह्या वेळीं पेशव्यांनीं बंदींत ठेविलें होतें; परंतु पुढें बाजीरावाच्या कारकीर्दींत कांहीं राज्यकारणामुळें त्यास त्यांनीं सोडून दिलें.

सवाई माधवरावाचा मृत्यु. इ० स० १७९५.

१०. ह्याप्रमाणें सवाई माधवरावाच्या कारकीर्दींत मराठ्यांचा उत्कर्ष झाला. परंतु त्या यशाचा वांटा माधवरावास कांहींच मिळाला नाहीं. कारण पहिल्यानें तो अल्पवयाचा असल्यामुळें नानाफडनवीसच्या मुकत्यारीनें वागत होता; आणि पुढें त्यास कांहीं समजूं लागलें तेव्हांही नानानें आपलें महत्व जाईल ह्या भीतीनें त्यास अगदीं आपल्या कबज्यांत ठेविलें होतें. अशा परतंत्रपणामुळें माधवरावास फार त्रास उत्पन्न होऊं लागला. पुढें रघुनाथरावाचा वडील पुत्र बाजीराव हा शिवनेरी-किल्ल्यामध्यें बंदींत होता. हा मोठा गुणवान् आहे असें माधवरावाच्या कानीं आल्यावरून बाजीरावाशीं आपला स्नेह असावा असें

त्यास वाटूं लागलें. परंतु ही गोष्ट नानास आवडत नव्हती; ह्मणून त्यांनीं परस्परांशीं गुप्तरूपें पत्रव्यवहार चालविला. हें वर्तमान नानास कळतांच त्यानें माधवरावाची फार निर्भर्त्सना करून, ज्याच्या द्वारें त्या उभयतांचें दळणवळण चाललें होतें त्याच्या पायांत बिड्या घातल्या; आणि बाजीरावाच्या भोंवतालचा बंदोबस्त ज्यास्त केला. ह्या गोष्टीमुळें तर माधवरावास फारच त्रास येऊन तो आपल्या जिवास अगदीं कंटाळला. तेव्हां इ० स० १७९५ ह्या वर्षी अक्टोबर महिन्याच्या अठ्ठाविसाव्या तारखेस ह्मणजे शके १७१७ ह्या वर्षी दसऱ्याच्या दिवशीं त्यानें आपल्या वाड्यांतील तिसऱ्या मजल्यावरून कारंज्यावर उडी टाकिली. त्यामुळें तो तिसऱ्या दिवशीं मृत्यु पावला.

---

## दुसरा बाजीरावसाहेब ह्याचें वर्णन.

### इ० स० १७९६ ह्या वर्षापासून इ० स० १८१८ ह्या वर्षापर्यंत.

बाजीरावास पेशवाईची वस्त्रें मिळतात. इ० स० १७९६.

१. सवाई माधवराव ह्यानें मरते समयीं आपला संबंधी व परम मित्र बाजीराव ह्यास पेशवाईची गादी देण्याविषयीं सांगितलें होतें. परंतु तसें करणें नानाफडनाविसास इष्ट नव्हतें; कारण तेणेंकरून आपलें महत्व कमी होऊन कदाचित् जिवासही धक्का पोंचेल, असें त्यास भय होतें. ह्यामुळें त्यानें इतर बहुतेक कारभारी लोक वश करून घेऊन असें ठरविलें कीं, सवाई माधवरावाच्या बायकोच्या मांडीवर दत्तक देऊन तो पेशवा करावा. हें वर्तमान

बाजीरावास कळतांच त्यानें शिंद्याचा मुख्य कारभारी बाळोबा तात्या कुंजर ह्याच्या द्वारें गादी मिळविण्याचा यत्न चालविला. तो नानास समजला तेव्हां, ही गोष्ट बाळोबा तात्या ह्याच्या हातून होण्यापूर्वी आपणच करावी हें बरें, असें त्यास वाटून त्यानें बाजीरावास शिवनेरीहून पुण्यास आणविलें, आणि आपणाकडे मुख्य कारभार राखण्याविषयीं त्याजपासून करार करून घेऊन त्याला गादीवर बसविण्याची तयारी चालविली. इतक्यांत ही गोष्ट आपल्या सल्लयावांचून होते हें बाळोबा तात्यास समजतांच, त्याला राग आला; आणि त्यानें बाजीरावास कैद करून त्याचा धाकटा भाऊ चिमणाजी आपा ह्यास इ० स० १७९६ च्या मे महिन्यांत गादीवर बसविलें, व परशुरामभाऊ पटवर्धन ह्यास त्याचा कारभारी केलें. पुढें नानानें महाप्रयासेंकरून दवलतराव शिंदा वश करून घेतला; आणि त्याजकडून त्याचा कारभारी बाळोबा तात्या ह्यास कैद करवून दवलतरावाच्या मदतीनें बाजीरावास इ० स० १७९६ च्या दिसेंबरांत गादीवर बसविलें. नंतर नाना पुनः मुख्य कारभार करूं लागला.

नानाफडनवीस कैदेंत पडतो, व शिंदा पुणें शहर लुटतो. ता० ३१ दिसेंबर, इ० स० १७९७.

२. बाजीरावास पेशवाईचा अधिकार प्राप्त झाला तेव्हां, जरी त्यानें नानाला मुख्य कारभारावर नेमिलें होतें, तरी पुढें नाना व नानाच्या पक्षाचे लोक ह्यांस राज्यकारभारांतून काढून टाकावें, अशी त्याला फार इच्छा उत्पन्न होऊन त्यानें त्याविषयीं प्रयत्न चालविला. तो प्रकार असा:-प्रथमतः त्यानें, दवलतराव शिंद्याचा सासरा सर्जेराव घाडगा ह्या नामें होता, त्याचें

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

आणि नानाचें वैमनस्य पाडिलें; आणि शिंद्याकडून नानाला कैद करविण्याविषयीं त्याला सुचविलें. तेव्हां [illegible] सांगण्यावरून शिंद्यानें इ० स० १७९७ ह्या वर्षी [illegible] महिन्याच्या ३१ व्या तारखेस नानास कैद करून अहमदनगरच्या किल्ल्यांत नेऊन ठेविलें. त्याच वेळीं सर्जेरावानें आपले लोक नाना व त्याचे पक्षपाती ह्यांचीं घरें लुटावयास पाठविले. तेव्हां ज्याप्रमाणें एखाद्या शत्रूचें शहर लुटावें त्याप्रमाणें त्यांनीं पुणें-शहर लुटून तेथें एक रात्र आणि एक दिवस एकसारखी दाणादाण करून सोडिली. ह्याप्रमाणें नान्याची दुर्दशा करून बाजीराव शिंद्यालाही त्याच्या देशीं घालविण्याची मसलत करूं लागला. परंतु आपणास गादीवर बसविण्याच्या कामीं शिंद्यानें मदत करावी ह्मणून बाजीरावानें त्याला पूर्वीं दोन कोटी रुपये देण्याचें गुप्तरूपें कबूल केलें होतें; तो ऐवज मिळाल्याशिवाय तो पुणें सोडीना इतकेंच नाहीं, तर त्या ऐवजाकरितां तो तगादा करूं लागला; आणि बाजीरावाला तर त्या प्रसंगीं एवढी रकम देण्याचें सामर्थ्य नव्हतें. तेव्हां त्यानें मूर्खपणानें शिंद्याला अशी मसलत दिली कीं, तुह्मीं सर्जेराव घाडग्याकडून बाळोजी कुंजर ह्याच्या माहितीनें पुण्यांतील सावकार लोकांपासून बलात्कारानें द्रव्य उत्पन्न करावें. तें शिंद्यानें कबूल करून घाडग्यास त्या कामावर पाठविलें. ह्या वेळीं घाडग्यानें आपल्या क्रूरपणाची सीमा केली. नानाच्या पक्षाचे जे लोक बंदींत घातले होते त्यांपासून व इतर सावकार वगैरे श्रीमंत लोकांपासून द्रव्य काढण्याकरिनां त्यानें त्यांचे मनस्वी हाल केले. ते हाल न सोसल्यामुळें कितीएक लोकांनीं प्राणही सोडिले

३. नाना कैदेंत पडल्यानंतर बाजीरावानें आपला भाऊ अमृतराव ह्यास मुख्य कारभारी केलें. वरील क्रूरकर्मास बाजीरावाचें अनुमोदन होतें, तें अमृतरावास माहीत नव्हतें, सबब शिंद्याचाच तो अपराध समजून त्यानें बाजीरावाच्या मतानें त्याला पकडण्याची मसलत केली. परंतु बाजीरावाच्या भित्रेपणामुळें ती फसून बाजीरावाचें आणि शिंद्याचें वैमनस्य पडलें. तेव्हां त्याला भय उत्पन्न करण्याकरितां शिंद्यानें नानाफडनविसास इ० स० १७९८ ह्या वर्षी कैदेंतून मुक्त केलें. त्यामुळें बाजीरावास वास्तविक भीति उत्पन्न होऊन त्यानें शिंदा व नाना ह्यांचा स्नेह आरंभिला; आणि नानाला मोठ्या आर्जवानें पुण्यांत आणून इ० स० १७९८ त अक्टोबर महिन्याच्या १५ तारखेस पुनः मुख्य कारभारी नेमिलें, परंतु हें बाजीरावाचें सारें कृत्य मायावीपणाचेंच होतें; कारण पुढें नानाशीं तो एकसारखा कपटानेंच वागत होता. तथापि नानानें राज्यकारभारांत किमपिही दुर्लक्ष्य केलें नाहीं. शेवटीं इ० स० १८०० ह्या वर्षी मार्च महिन्याच्या १३ व्या तारखेस नानाफडनवीस मृत्यु पावला.

नानाफडनविसाची कैदेंतून सुटका (इ० स० १७९८) व त्याचा मृत्यु (इ० स० १८००.)

४. नानाचें वय लहानपणापासून राजकीय कामें करण्यामध्येंच गेल्यामुळें तो त्या कामांत इतका निपुण झाला होता कीं, त्या वेळीं साऱ्या हिंदुस्तानामध्यें त्याच्या इतका राजनीतींत प्रवीण दुसरा पुरुष नव्हता. तो मृत्यु पावला त्या वेळीं मराठी राज्यांतील चातुर्य आणि प्रामाणिकपणा हीं त्याबरोबरच गेलीं, असें लोक ह्मणूं लागले. त्याची

नानाफडनविसाचे गुण.

स्मरणशक्तिही अपूर्व होती; व तो दिवसामध्यें इतकें काम आटोपी कीं, तें कोणास सांगितलें असतां आश्चर्यच वाटेल.

यशवंतराव होळकराच्या उपद्रवामुळें बाजीराव पळून जाऊन इंग्रजांची मदत मागतो. इ० स० १८०२.

९. नानाफडनवीस मृत्यु पावल्यानंतर बाजीरावानें त्याच्या पक्षाच्या लोकांना छळावयास आरंभ केला, त्यामुळें दक्षिणेंत चोंहीकडे धामधूम होऊन गेली. अशा समयीं यशवंतराव होळकर शिंद्याच्या मुलखांत लुटालूट करूं लागल्यामुळें शिंद्याला आपली बहुतेक फौज घेऊन आपल्या मुलखीं जाणें भाग पडलें. तेव्हां तर बाजीरावास आपल्या दुष्टवासना पूर्ण करायास चांगली संधी सांपडली. त्यानें, आपणास व आपल्या बापास ज्यांनीं ज्यांनीं त्रास दिला होता, त्यांस फार हाल करून जिवें मारिलें. त्यांपैकीं यशवंतरावाचा भाऊ विठोजी होळकर ह्याला त्यानें हत्तीच्या पायाशीं बांधून मारविलें. इतक्यांत हिंदुस्तानामध्यें यशवंतराव हा शिंद्यापासून पराभव पावल्यामुळें तो पुण्याच्या आसमंतात् लुटालूट करण्याच्या बेतानें दक्षिणेंत आला. त्याला आपला भाऊ मारिल्याचें वर्तमान समजतांच तो लष्करासुद्धां पुण्यावर आला, आणि त्यानें पुण्यांत शिंद्याचें जें लष्कर राहिलें होतें तें व बाजीरावाचें लष्कर ह्यांचा ता० २८ अक्टोबर इ० स० १८०२ ह्या रोजीं अगदीं मोड केला. हें पाहतांच बाजीराव सात हजार लोक घेऊन सिंहगडास पळून गेला. पुढें तेथूनही रायगडास जाऊन त्यानें मुंबईसरकारचें आर्जव आरंभिलें. तेव्हां इंग्रजांनीं त्याला वसईस आपल्या आश्रयाखालीं नेलें. इकडे होळकरानें अमृतरावाचा पुत्र विनायकराव ह्यास

पेशव्याच्या गादीवर बसविलें. तेव्हां बाजीरावानें इंग्रजांशीं तहाचें बोलणें लावून पुनः गादी मिळविण्याकरितां त्यांची मदत मागितली.

वसईचा तह, ता० ३१ दिसेंबर. इ० स० १८०२.

६. इंग्रजांनीं बाजीरावास गादीवर बसविण्याचें कबूल करून असा तह ठरविला कीं, इंग्रजांचें आठ हजार सैन्य उभयतांच्या शत्रूंच्या निवारणार्थ बाजीरावानें नेहमीं आपल्या राज्यांत राहूं द्यावें, व त्या सैन्याच्या खर्चाकरितां वीस लक्षांचा मुलूख इंग्रजांस द्यावा. ह्याखेरीज दुसरीं कांहीं किरकोळ कलमें त्या तहांत होतीं. हा तह इ० सन १८०२ ह्या वर्षी दिसेंबर महिन्याच्या ३१ व्या तारखेस झाला. तो वसई मुक्कामीं झाला, ह्मणून त्याला वसईचा तह ह्मणतात.

बाजीरावास पुनः राज्य मिळतें. ता० १३ मे इ०स०१८०३.

७. ह्याप्रमाणें मराठ्यांचें स्वातंत्र्य नाहींसें करणारा तो तह उभयपक्षीं कबूल झाल्यावर इंग्रज लोक बाजीरावाला गादीवर बसविण्याकरितां पुण्यास घेऊन येऊं लागले. हें यशवंतराव होळकरास समजतांच पुणें-शहरांतून लुटीच्या योगानें पुष्कळ द्रव्य उत्पन्न करून तो माळव्याकडे पळून गेला. नंतर इंग्रजांचें सैन्य पुण्यास पोहोंचलें, तेव्हां त्यांनीं बाजीरावाला इ० स० १८०३ ह्या वर्षी मे महिन्याच्या १३ व्या तारिखेस मोठ्या समारंभानें पुनः गादीवर बसविलें; आणि यशवंतरावानें पूर्वी ज्याच्या पुत्रास गादीवर बसविलें होतें, त्या अमृतरावास प्रतिवर्षी खर्चाकरितां आठ लक्ष रुपयांची नेमणूक करून देऊन त्याला त्याच्या पुत्रासहित काशीस नेऊन ठेविलें. नंतर तहांत ठरविल्याप्रमाणें इंग्रजांनीं आपलें सैन्य आणून घोडन-

दीच्या कांठीं छावणी केली. त्या छावणीमुळें तेथें एक गांवच वसला; त्या गांवाला मराठे लोक घोडनदी ह्मणतात, व इंग्रज लोक शिरूर ह्मणतात. त्या छावणींतील लोक पुढें इ० स० १८१८ ह्या वर्षी निघून गेल्यानंतर तेथील वस्ती कमी झाली.

बाजीरावाचें दुर्वर्तन व इंग्रजांशीं गुप्तरूपें कृतघ्नपणाचें आचरण.

८. बाजीरावानें इंग्रजांशीं सख्य केलें खरें, परंतु ही गोष्ट त्यानें आपणावर महत्संकट पडल्यामुळें निरुपाय होऊन केली होती, असें त्याच्या कृतघ्नतेच्या आचरणावरून पुढें दिसून आलें. गादीवर वसतांच त्यानें आपलें दुर्वर्तन सुरू केलें. रास्ते वगैरे कितीएक जाहगीरदारांच्या जाहगिरी त्यानें कपटानें बळकाविल्या. त्रिंबकजी डेंगळा नामें कोणी जासूद होता, तो बाजीरावास फार आवडून त्यानें त्याला इतक्या योग्यतेस चढविलें कीं, पेशव्याच्या दरबारांत त्याच्यावांचून कोणतेंच काम होईनासें झालें. तो त्रिंबकजी तर क्रूरपणाची मूर्त्तिच होता. मक्त्यानें मामलती वगैरे करणारांकडून मक्त्याच्या कामांत कांहीं अंतर पडल्यास तो बाजीरावाच्या देखत त्यांना पराकाष्ठेची हाणमार करी. कांहीं प्रसंगीं तर त्यानें मक्तेदारांस जिवेंही मारिलें. तरी त्याचें बाजीरावास बिलकूल वाईट वाटलें नाहीं ह्याप्रमाणें ह्या उभयतांच्या दुष्टपणामुळें पुष्कळ लोक त्रासून गेले. तथापि बाजीरावाला वसईच्या तहांत ठरल्याप्रमाणें इंग्रज लोकांची मदत असल्यामुळें फारशीं बंडें वगैरे न होतां इ० स० १८१७ ह्या वर्षापर्यंत त्याचें राज्य सुरक्षितपणें चाललें. शेवटीं त्रिंबकजी डेंगळ्याच्या मसलतीनें तो महाकृतघ्न

पुरुष इंग्रजांसही घालवून देण्याचा विचार करूं लागला. त्यानें प्रथम शिंदा व रघूजी भोंसला ह्यांजकडे वकील पाठवून गुप्तरूपें त्यांच्याशीं तह केला कीं, तुह्मी व आह्मी एक होऊन इंग्रजांस हांकून देऊं; आणि लुटालूट करून आपला निर्वाह करणारे जे पेंढारी लोक ते हिंदुस्तानांत व दक्षिणेंत बरेच प्रबळ झाले होते, त्यांची अनुकूलता करून घेण्याकरितां बाजीराव कोंपरगांवास जाऊन त्यांच्या मुख्यांच्या भेटी घेऊं लागला. ही गोष्ट इंग्रजांच्या समजण्यांत आली; परंतु तीविषयीं त्यांना पक्का शोध लागेना, त्यामुळें त्यांनीं ती मनावर घेतली नाहीं; तथापि त्यांचा बाजीरावावरील विश्वास नाहींसा होण्यास आणखी एक कारण झालें. तें असें कीं, गाईकवाडाकडे पेशव्यांची कांहीं खंडणीबद्दल वगैरे बाकी राहिली होती, तीसंबंधी बोलणें करावयाकरितां गाईकवाडानें आपला गंगाधर शास्त्री पटवर्धन नामें वकील पेशव्यांच्या दरबारीं पाठविला होता. परंतु त्यास रवाना करण्यापूर्वी त्रिंबकजी डेंगळ्याच्या हातून त्याला कांहीं इजा होणार नाहीं, अशाविषयीं इंग्रजांचें त्यानें अभयवचन घेतलें होतें. तथापि बाजीरावानें पंढरपूर मुक्कामीं इ० स० १८१५ ह्या वर्षी जुलई महिन्याच्या १९ व्या तारखेस त्रिंबकजीच्या हातूनच गंगाधर शास्त्री ह्यास मारविलें. ही गोष्ट इंग्रजांस समजतांच त्रिंबकजीला आपल्या स्वाधीन करण्याविषयीं त्यांनीं बाजीरावास निक्षून सांगितलें. त्यांनीं सांगितल्याप्रमाणें न केल्यास त्यांच्याशीं युद्धास उभें रहावें लागणार, असें पाहून बाजीरावानें त्रिंबकजीला इंग्रजांच्या स्वाधीन केलें. तेव्हां त्यांनीं त्याला ठाण्याच्या किल्ल्यामध्यें बंदींत ठेविलें.

परंतु सुमारें एक वर्षानें एका मोतद्दारानें कांहीं संकेतानें चुटके गाऊन त्याला पळून जाण्याची युक्ति सुचविली, तिच्या योगानें तो तेथून पळून जाऊन नाशिकाच्या आसपास भिल्ल व रामोशी ह्यांच्या आश्रयानें दंगा करूं लागला. पुढें बाजीरावाचें आणि त्याचें गुप्तरूपें दळणवळण सुरू होऊन इंग्रज लोकांच्या नाशाकरितां नवीन फौज ठेवण्यास बाजीरावानें त्याकडे पैसा पाठविला; आणि शिंदे, होळकर, भोंसले व पेंढारी, ह्यांशीं पत्रद्वारें ऐक्य ठेवून स्वतःही नवीन फौज ठेवण्यास त्यानें आरंभ केला. हें इंग्रजांस समजतांच त्यांनीं प्रथमतः त्रिंबकजी डेंगळ्यास धरून देण्याविषयीं बाजीरावाला सांगितलें. तेव्हां आह्मांला त्याचा ठिकाण मुळींच लागत नाहीं, असें त्यानें उत्तर दिलें. परंतु इंग्रजांनीं पुनः त्याला लढाईची धमकी दिल्यामुळें त्यानें त्रिंबकजीस धरण्याकरितां जाहिरनामे लाविले; आणि तो इंग्रजांच्या स्वाधीन होई तोंपर्यंत सिंहगड, पुरंदर व रायगड हे किल्ले त्यांजकडे ठेवण्याचेंही त्यानें कबूल केलें.

बाजीरावाचा इंग्रजांशीं नवा तह, इ० स० १८१७.

९. ह्याखेरीज इंग्रजांनीं त्याजपासून नवा तह करून घेतला. त्यांतील मुख्य कलमें हीं कीं, गाईकवाडाकडे जें कांहीं पेशव्यांचें येणें असेल त्याबद्दल तो दरसाल चार लाख रुपये देईल, ते पेशव्यांनीं मुकाट्यानें घ्यावें; वसईच्या तहांत ठरल्याप्रमाणें इंग्रजांचें जें ८००० सैन्य पुण्यास राहिलें होतें त्याच्या खर्चाकरितां चवतीस लक्षांचा मुलूख पेशव्यांनीं इंग्रजांस तोडून द्यावा; ह्याखेरीज अहमदनगरचा किल्ला व नर्मदेच्या उत्तरेकडील प्रांतांतले पेशव्यांचे सारे हक्क हे इंग्रजांस द्यावे; तुंगभद्रा आणि नर्मदा ह्यांच्या

मधला जो आपला मुलूख तो शिवाय करून इतर कोणत्याही मुलखावर कोणत्याच प्रकारचा हक्क पेशव्यांनीं सांगूं नये; आणि परराष्ट्रांशीं कोणत्याच प्रकारचें दळणवळण ठेवूं नये. ह्याखेरीज आणखी कांहीं किरकोळ कलमें होतीं. हा तह इ० स० १८१७ त मे महिन्याच्या १० व्या तारखेस झाला. ह्या तहाच्या योगानें अर्थातच वसईच्या तहापेक्षां बाजीरावाचें स्वातंत्र्य पुष्कळ कमी झालें.

१०. वर सांगितलेल्या नव्या तहामुळें इंग्रजांविषयीं बाजीरावाच्या मनांतील वैषम्य ज्यास्त वाढून त्यांच्या नाशाची तयारी तो फारच झटून करूं लागला. ह्या प्रसंगीं त्याला मुख्य मसलत देणारा बापू गोखला नांवाचा कोणी गृहस्थ कर्नाटकच्या सरसुभेदाराचा पुतण्या होता. तो स्वभावानें फार क्रूर होता, तरी मोठा पराक्रमी असे, ह्यामुळें तो बाजीरावास आवडून त्यानें त्याला आपल्या सैन्याचा अधिकार दिला होता. ह्या उभयतांनीं असा बेत केला कीं, आपली सर्व तयारी झाली ह्मणजे इंग्रजांवर एकाएकीं हल्ला करावा. ह्या त्यांच्या बेतास अनुकूल अशी दुसरी एक गोष्ट घडून आली. ती ही कीं, ह्याच समयास चोंहींकडे पेंढाऱ्यांचा दंगा फार उसळला. ह्यामुळें गव्हर्नर-जनरल ह्यानें कलकत्ता, मुंबई व मद्रास ह्या तिन्ही ठिकाणच्या लष्करांनीं जाऊन तो मोडून टाकावा, असा हुकूम केला. त्यावरून घोडनदी एथील लष्करही त्या कामास चालतें झालें. ह्यामुळें पुणें मुक्कामीं जी कांहीं इंग्रजांची थोडीशी फौज होती, तेवढीच जिंकली ह्मणजे आपलें काम होईल, असें बाजीरावास वाटलें. सबब त्यानें पुण्याजवळ लष्कर जमविण्यास आरंभ केला.

बाजीराव इंग्रजांशीं उघडपणें वैर करितो.

११. बाजीरावाच्या लष्कराची बहुतेक सिद्धता झाली; तरी पुण्यांतील इंग्रजांच्या लष्करापैकीं पलटणी लोकांत फितूर करण्याचा आपण उद्योग करावा असें त्याच्या मनांत होतें, सबब तो एकदम लढाईस आरंभ करीना. इतक्यांत मुंबईहून कांहीं गोरे लोक त्या लष्कराच्या मदतीस येऊन पोहोंचले व घोडनदीकडचेंही राहिलेलें लष्कर यात्रयास निघालें. हें समजतांच बाजीरावानें युद्धास आरंभ करण्याविषयीं आपल्या लोकांस हुकूम दिला. तेव्हां बापू गोखल्यानें खडकी मुक्कामीं इंग्रज लोकांवर इ० स० १८१७ ह्या वर्षीं नोवेंबर महिन्याच्या पांचव्या तारखेस हल्ला केला. इंग्रजांचें सैन्य २८०० असून पेशव्याचें १८००० स्वार व ८००० पायदळ इतकें होतें. त्या दिवशीं कांहीं काळपर्यंत युद्ध होऊन शेवटीं मराठ्यांचा कांहींसा मोड झाला. दुसरे दिवशीं घोडनदीचें पलटण पुण्यास येऊन दाखल झालें. तेव्हां बापू गोखला युद्धास उभा राहीना. इकडे जनरल स्मिथ साहेब पेंढाऱ्यांच्या पारिपत्यास गुंतला होता, त्याला हें लढाईचें वर्तमान कळतांच घोडनदीचें लष्कर पेंढाऱ्यांवर गेलें होतें तें बरोबर घेऊन तो पुण्यास आला. तेव्हां बाजीराव इंग्रजांशीं युद्ध करणें सोडून साताऱ्याकडे पळत सुटला; व स्मिथ साहेब त्याच्या पाठीस लागला.

खडकीची लढाई. ता० ५ नोवेंबर इ० स० १८१७.

१२. बाजीराव पळतां पळतां साताऱ्याहून पंढरपुरास आला व तेथें साताऱ्याच्या राजालाही आपणाबरोबर पळावयाकरितां आणवून त्यासहित जुनराजवळ ब्राह्मणवाड्यांत गेला. तेथें त्रिंबकजी डेंगळाही कांहीं लोकांसहित त्याला

कोरेगांवची लढाई. ता० १ जानेवारी इ० स० १८१८.

येऊन मिळाला. परंतु इतक्यांत स्मिथ साहेब बाजीरावाचा पाठलाग करीत आला; तेव्हां तो लष्करासुद्धां पुण्याकडे परतला. हें वर्तमान पुण्यांतील इंग्रजांच्या लष्करास कळतांच त्याच्या अधिकाऱ्यानें आपल्या मदतीकरितां घोडनदीहून पुनः सैन्य बोलाविलें. तें सैन्य पुण्याकडे येत असतां भिमेच्या कांठीं कोरेगांव मुक्कामीं इ० स० १८१८ च्या जानेवारीच्या १ ल्या तारखेस त्याची व बाजीरावाच्या सैन्याची गांठ पडून युद्धास आरंभ झाला. त्या वेळीं बाजीरावाचें सैन्य ३०,००० असतांही इंग्रजांच्या सुमारें ९०० लोकांनीं गांवांत शिरून शत्रूस गांवांत येऊं न देतां मोठ्या शौर्यानें एक दिवसपर्यंत आपलें रक्षण केलें. त्या लढाईंत इंग्रजांचे सुमारें ३०० शिपाई व वीस गोरे लोक पडले; आणि मराठ्यांकडील सुमारें पांच सहाशें लोक पडले. ह्या ठिकाणीं इंग्रजांकडील फक्त ९०० लोकांनीं मराठ्यांचें एवढें मोठें सैन्य असतांही त्याचें कांहीं चालूं दिलें नाहीं, ह्या त्यांच्या विलक्षण पराक्रमाचें स्मरण सर्वांस राहण्याकरितां इंग्रजांनीं त्या ठिकाणीं रणस्तंभ बांधून ठेविला आहे.

अष्ट्याची लढाई व बापू गोखल्याचा मृत्यु; ता० १९ फेब्रुआरी इ० स० १८१८.

१३. ज्या दिवशीं कोरेगांवची लढाई झाली, त्याच्या दुसऱ्या दिवशीं बाजीरावास कळलें कीं, स्मिथ साहेब जवळ येऊन पोहोंचला. तेव्हां तो तेथून छावणी उठवून पुनः पळत सुटला. तो पळतां पळतां अष्टें मुक्कामीं जाऊन उतरला. इतक्यांत स्मिथ साहेब अकस्मात् तेथें दाखल झाला. तेव्हां त्या उभयतांची लढाई सुरू होऊन मराठ्यांचा अगदीं मोड झाला. ह्या

लढाईंत बापू गोखला रागानें ३०० स्वारांसहित जिवावर उदार होऊन इंग्रजांच्या एका पलटणीवर जाऊन पडला. तेव्हां त्यांनीं त्याचा पराभव करून त्यास ठार मारिलें. ह्या ठिकाणींच सातारचा राजा आपल्या परिवारासुद्धां इंग्रजांच्या हातीं लागला.

पेशवा इंग्रजांच्या हातीं सांपडून राज्यास मुकतो. ता० ३ जून इ० स० १८१८.

१४. बाजीराव अष्टयाहून पळून नागपूरकराचा आश्रय करण्याकरितां त्याच्या मुलखांत शिरला. तेथेंही इंग्रजांच्या एका टोळीची गांठ पडून तिनें त्याजवळ राहिलेल्या लोकांची वाताहत केली. तेव्हां त्याच्याबरोबरचे बहुतेक जाहगीरदार त्याला सोडून आपापल्या ठिकाणीं गेले. ह्याप्रमाणें त्याचे सारे उपाय थकल्यामुळें माल्कम साहेब हा पेंढाऱ्यांचा बंदोबस्त करून लष्करासुद्धां इंदुराजवळ राहिला होता, त्यास तो इ० सन १८१८ ह्या वर्षीं जून महिन्याच्या तिसऱ्या तारखेस शरण जाऊन त्याच्या स्वाधीन झाला; आणि राज्याची आशा सोडून इंग्रज लोक ठेवितील त्याप्रमाणें राहण्यास कबूल झाला.

बाजीरावाची व त्याजपासून घेतलेल्या राज्याची इंग्रजांनीं केलेली व्यवस्था.

१५. बाजीराव हातीं लागल्यावर इंग्रजांनीं त्याला दरसाल आठ लक्ष रुपयांची नेमणूक करून देऊन ब्रह्मावर्तांत नेऊन ठेविलें. ह्याच सुमारास त्यांनीं त्रिंबकजी डेंगळा ह्याला खानदेशांत पकडून काशी-प्रांतांत चुनारगड नामें बळकट किल्ला आहे तेथें जन्मपर्यंत कैदेंत ठेविलें. सातारचा राजा इंग्रजांच्या हातीं लागला ह्मणून मागें सांगितलें, त्यास त्यांनीं मोठ्या समारंभानें सातारच्या गादीवर बसवून नि

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे.

मधील पश्चिमेस सह्याद्रीपासून पूर्वेस पंढरपुरापर्यंत प्रदेश त्याच्या स्वाधीन केला. बाकीचा संपूर्ण प्रदेश इंग्रजांनीं आपणाकडे ठेवून, पूर्वी पेशव्यांच्या दरबारीं त्यांचा एल्फिन्स्तन् नामें वकील होता, तोच त्या जिंकलेल्या प्रांताच्या बंदोबस्ताकरितां नेमिला. तो साहेब फार चतुर व मराठी राज्याचा माहीतगार होता. त्यानें असा बंदोबस्त केला कीं, पेशवे सरकारच्या पदरचे सरदार, मुत्सद्दी, व आश्रित वगैरे लोक ह्यांस आपला धनी गेल्याचें दुःख न व्हावें, आणि त्यांचा प्रतिष्ठितपणानें निर्वाह होऊन अब्रू कायम राहवी, ह्मणून त्यानें कितीएकांस जाहगिरी दिल्या, कितीएक बडे लोकांस पेनशनें करून दिलीं, आणि कितीएकांस वर्षासनें करून दिलीं. इनामें, देवस्थानें, व धर्मादाय हे खर्च पहिल्यापासून जसे चालत आले होते, तसेच त्यानें पुढें चालविले; लहानसहान बंडें मोडून टाकिलीं; आणि रयतेस सुख होण्यासाठीं न्यायमनसुबी चांगली व्हावी व कोणावर विनाकारण जुलूम होऊं नये असा बंदोबस्त करून ठेविला. त्यानें केलेली व्यवस्था अद्यापि बहुतेक तशीच चालली आहे. त्या साहेबानें लोकोपकारार्थ जीं मोठमोठीं कृत्यें केलीं त्यांचें स्मरण करून अद्यापि लोक त्याची कीर्ति गात आहेत.

समाप्त.

# सातारचे राजे.

राज्य कोठून कोठपर्यंत केलें.

| | | |
|---|---|---|
| १ | शिवाजी ............. | इ० स० १६७४–१६८० |
| २ | संभाजी. ( शिवाजीचा मुलगा ) | ,, १६८०–१६८९ |
| ३ | राजाराम ,, (संभाजीचा सावत्र भाऊ)...... | ,, १६८९–१७०० |
| ४ | शिवाजी व ताराबाई ( राजारामाचा मुलगा व बायको ) .... | ,, १७००–१७०८ |
| ५ | शाहू ( संभाजीचा पुत्र ) ... | ,, १७०८–१७४९ |
| ६ | रामराजा ( शाहूचा दत्तक ) ( ताराबाईचा नातू ) ...... | ,, १७४९–१७७७ |
| ७ | शाहू महाराज ( रामराजाचा दत्तक) ............. | ,, १७७७–१८०८ |
| ८ | प्रतापसिंह ( शाहू महाराजाचा वडील पुत्र)............. | ,, १८०८–१८३९ |
| ९ | शाहाजी ऊर्फ अप्पासाहेब महाराज ( शाहू महाराजाचा धाकटा पुत्र)............. | ,, १८३९–१८४८ |

## पेशवे (बाळाजी विश्वनाथापासून).

| | | |
|---|---|---|
| १ | बाळाजी विश्वनाथ ( ज्यानें पेशवाई मिळविली तो ) ... | इ० स० १७१४–१७२० |
| २ | थोरला बाजीराव* (बाळाजी विश्वनाथाचा वडील पुत्र ).... | ,, १७२०–१७४० |

* ह्याचा धाकटा भाऊ चिमणाजी अप्पा, व चिमणाजी अप्पाचा पुत्र सदाशिवराव भाऊ.

कोठून कोठपर्यंत कारकीर्द.

३ बाळाजी बाजीराव† ऊर्फ ना-
नासाहेब ..............इ० स० १७४०–१७६१

४ थोरला माधवराव (नानासाहे-
बाचा पुत्र) ............. ,, १७६१–१७७२

५ नारायणराव, (नानासाहेबाचा
पुत्र) ................ ,, १७७३ महिने ८

६ राघोबादादा (थोरल्या बाजीरा-
वाचा पुत्र) व गंगाबाई (नारा-
यणरावाची बायको) ...... ,, १७७३–१७७४

७ सवाई माधवराव (नारायण-
रावाचा पुत्र) .......... ,, १७७४–१७९५

८ धाकटा बाजीराव‡ (राघोबादा-
दाचा पुत्र) ............ ,, १७९६–१८१८

---

† राघोबादादा व जनार्दनबावा असे ह्यास दोन भाऊ होते.

‡ ह्याशिवाय, राघोबादादास भास्करराव, अमृतराव (दत्तक) व चिमाजी अप्पा असे तीन मुलगे होते.

## महाराष्ट्र-देशाच्या इतिहासांत लिहिलेल्या प्रसिद्ध गोष्टींचें कालानुक्रमाप्रमाणें टिपण.

---

इ०स०

१३०० चे अखेरीस-अल्लाउद्दिनाची दक्षिणेंत स्वारी.

१३४७—ब्राह्मणी राज्याची स्थापना.

१३९६—दुर्गादेवी नांवाचा दुष्काळ.

१४७८—ब्राह्मणी राज्यास उतरती कळा.

१४९७—वास्कोदिगामा कालिकोट-बंदरांत येतो.

१५००—ब्राह्मणी राज्याचा शेवट.

१५१०—आल्बुकर्क गोवें-शहर घेतो.

१६२६—मलिकंबराचा मृत्यु.

१६२७—शिवाजीचा जन्म.

१६३७—अहमदनगरच्या राज्याचा शेवट.

१६४६—शिवाजी तोरणा-किल्ला घेतो.

१६४७—दादोजी कोंडदेवाचा मृत्यु.

१६४८—शिवाजी कल्याणचा सुभा घेतो.

१६५६—शामराजपंतास पेशवाईचा अधिकार मिळतो.

१६५९—अफजुलखानाचा मृत्यु.

१६६०—रुस्तुमजमान व शिद्दी जोहार शिवाजीवर येतात.

१६६१—पोर्तुगीज लोक इंग्रजांस मुंबई-बेट देतात.

१६६२—शिवाजीच्या मोंगलांच्या मुलुखावर स्वाऱ्या.

१६६४—शाहाजीचा मृत्यु.

" —शिवाजी सुरत लुटतो.

" —शिवाजी आपणास राजा ह्मणवितो व आपल्या नांवाचें नाणें पाडतो.

१६६५—शिवाजी मलबार-किनाऱ्यावरील बारशीलोर शहर लुटतो.

१६६६—दिल्लीस शिवाजीची अवरंगजेबाशीं भेट, शिवाजीची कैद व सुटका.

१६६७—शिवाजीस अवरंगजेबाकडून राजा हा किताब मिळतो.

१६७३—शिवाजी हुबळी लुटतो, व अजीमतारा-किल्ला घेतो.

१६७४—शिवाजीस राज्याभिषेक.

१६७७—शिवाजीची कर्नाटकावर स्वारी.

१६८०—शिवाजीचा मृत्यु व संभाजीस राज्याभिषेक.

१६८७—गोवळकोंडें व विजापूर ह्या राज्यांची अखेर.

१६८९—संभाजीचा अंत व राजारामाची गादीवर स्थापना.

१७००—राजारामाचा मृत्यु व त्याच्या पुत्राची गादीवर स्थापना.

१७०७—अवरंगजेबाचा मृत्यु.

१७०८—शाहूस राज्यप्राप्ति.

१७०९—कोल्हापूरच्या राज्याची स्थापना.

१७१४—बाळाजी विश्वनाथ पेशवा होतो.

१७२०—बाळाजी विश्वनाथाचा मृत्यु.

१७२१—थोरल्या बाजीरावास पेशवाईचीं वस्त्रें मिळतात.

१७२६-२७—बाजीरावाच्या माळव्यांत स्वाऱ्या.

१७२८—बाजीरावाची निजामउल्मुल्कावर पहिली स्वारी.

१७३१—त्रिंबकराव दाभाडा ह्याजबरोबर बाजीरावाचें युद्ध.

१७३३—बाजीरावाची बुंदेलखंडांत स्वारी.

१७३५—त्याची जंजिऱ्याच्या शिद्दीवर स्वारी.

१७३६—त्याची दिल्लीवर स्वारी.
१७३७—त्याची पोर्तुगीज लोकांवर स्वारी.
१७३८—त्याची निजामउल्मुल्कावर दुसरी स्वारी.
१७३९—नादीरशाहाची दिल्लीवर स्वारी.
१७४०—बाजीरावाचा मृत्यु. नानासाहेब पेशवा होतो.
१७४८—अहमदशाह अबदालीची दिल्लीवर स्वारी व निजामउल्मुल्काचा मृत्यु.
१७४९—शाहूराजाचा मृत्यु व रामराजाची गादीवर स्थापना.
१७५०—पुणें पेशव्यांची राजधानी होतें.
१७५३—नानासाहेबाची कर्नाटकांत स्वारी.
१७५५—रघुनाथरावाची गुजराथेंत व अजमीर-प्रांतांत स्वारी.
,, —नानासाहेब आंग्र्यांचे किल्ले घेतो.
१७५८—रघुनाथरावाची पंजाबांत स्वारी.
१७६०—उदगीरची लढाई, अहमदशाह अबदालीची हिंदुस्तानांत दुसरी स्वारी.
१७६१—{ पानिपतची लढाई व भाऊसाहेब व विश्वासराव ह्यांचा मृत्यु.
,, —नानासाहेबाचा मृत्यु व थोरले माधवरावास पेशवाईचा अधिकार.
१७७२—थोरले माधवरावाचा मृत्यु व नारायणरावास पेशवाईचा अधिकार.
१७७३—नारायणरावाचा खून. रघुनाथराव पेशवा होतो.
१७७४—सवाई माधवरावाचा जन्म व त्यास पेशवाईचीं वस्त्रें.

१७७६—तोतया सदाशिवरावभाऊ व त्याचा परिणाम
१७७७—रामराजाचा मृत्यु. दुसरा शाहू राज्यावर बसतो
१७७९—वडगांवची लढाई.
१७८४—राघोबादादाचा मृत्यु.
१७९४—महादजी शिंद्याचा मृत्यु.
१७९५—खरड्याची लढाई.
,, —सवाई माधवरावाचा मृत्यु.
१७९६—चिमणाजी अप्पाची कांहीं वेळ गादीवर स्थापना.
,, —दुसरा बाजीराव गादीवर बसतो.
१७९७—नानाफडनवीस कैदेंत पडतो व दौलतराव शिंदा पुणें लुटतो.
१७९८—नानाफडनविसाची कैदेंतून सुटका.
१८००—नानाफडनविसाचा मृत्यु.
१८०२—बाजीरावाचा पळ. विनायकरावाची थोडा वेळ गादीवर स्थापना.
,, —वसईचा तह.
१८०३—बाजीरावाची पुनः गादीवर स्थापना.
१८०८—दुसऱ्या शाहूचा मृत्यु.
,, —प्रतापसिंहास राज्याभिषेक.
१८१५—गंगाधर शास्त्री ह्याचा खून.
१८१७—बाजीरावाचा इंग्रजांशीं नवा तह.
,, —खडकीची लढाई.
१८१८—कोरेगांव व अष्टें एथील लढाया.
,, —इंग्रज [illegible] होतात.
१८३९-प्रतापसिंह पदच्युत होतो व शाहजी गादीवर बसतो.
१८४९—शाहजीचा मृत्यु. सातारचें राज्य खालसा होतें.

BOMBAY : PRINTED AT THE EDUCATION SOCIETY'S PRESS, BYCULLA